
३० वे

# श्रीसाईलीला

26



जुलै, ऑगष्ट, सप्टेंबर १९५३

# श्रीसाई शिवमंदिराचा स्थापनोत्सव

चिंचणी येथील श्रीसाई शिवमंदिराचा स्थापनोत्सव दि० १९ व २० मे रोजीं थाटानें साजरा झाला. आदले दिवशीं म्हणजे सोमवार ता. १८ ला विश्वस्त श्रीपाद बा. देव यांचें मंदिरांत रात्रीं ९॥ वाजतां कीर्तन झालें. नानासाहेब चांदोरकरांचें आख्यान कीर्तनांत लावलें होतें. मंगळवारीं ह. भ. प. पिळुबुवा वडूजकर यांचें कीर्तन झालें. बुधवारीं लघुरुद्र, महाप्रसाद व कीर्तन असा कार्यक्रम झाला. प्रत्येक कार्यक्रमाला खूप गर्दी जमत असे. उत्सवाला विश्वस्त आणि इतर भक्त यांनीं अत्यंत उत्साहानें सर्वतोपरि साहाय्य केल्यामुळें उत्सव मोठ्या यशस्वीपणें पार पडला.

—x—

**वाचकांच्या माहितीसाठीं :—**

श्रीसाईलीलेच्या गेल्या रामनवमी विशेषांकांत 'रंगू आत्माराम चाळकर' या लेखिकेचा 'साईबाबांचें भक्तप्रेम' हा लेख प्रसिद्ध झाला आहे. त्या लेखांत श्रीसाईबाबा आपल्या घरीं आले होते व त्यांचीं दोन पावलें आपल्या घरांत उमटलेलीं आहेत; अशी माहिती होती. त्या लेखिकेच्या घरचा पत्ता विचारणारीं अनेक पत्रें आमच्याकडे आलीं आहेत, तो पत्ता पुढीलप्रमाणें आहे :—

रंगू आत्माराम चाळकर,
चाळकरांचा बंगला,
दहिसर, पोस्ट बोरिवली.

**आभार :—**

श्री. व्यंकटेश मधुसूदन कांबळी यांनीं श्रीसाईबाबांचा रंगीत चित्राचा ब्लॉक विनामूल्य दिला. तो या अंकांत छापला आहे. श्री. कांबळी यांचें आम्ही आभारी आहोंत.

—संपादक

दादर भागांत

फॅशनेबल व टिकाऊ

शिलाईचे कपडे व्यवस्थित

व किफायतशीर दरानें शिवून मिळण्याचें

: प्रख्यात ठिकाण :

– रावळ टेलरिंग फर्म –

मोहमद बिल्डिंग चित्रा सिनेमाजवळ, व्हिन्सेंट रोड दादर, मुंबई १४

RAWAL TAILORING FIRM

TAILORS & OUTFITTERS

Mohamad Building (Near Chitra Cinema)

Vincent Road, Dadar, Bombay 14.

A TRIAL ORDER WILL SATISFY YOU

FOR BEST STYLES

AT MODERATE RATES

MADE WELL

WEAR WELL


## श्रीसाईबाबा शिरडी संस्थानांत विक्रीस असलेलीं पुस्तकें

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (१) | श्रीसाईसच्चरित | (मराठी) | किंमत रु. | ७–०–० |
| (२) | सच्चरित | (इंग्रजी) | ,, ,, | ४–०–० |
| (३) | दासगणूकृत श्रीसाईनाथ–स्तवनमंजरी | | ,, ,, | ०–२–० |
| (४) | ,, | (अध्याय ४) | ,, ,, | ०–८–० |
| (५) | सगुणोपासना | | | ०–३–० |
| (६) | प्रधानकृत पुस्तक (इंग्रजी) | | ,, ,, | १–०–० |

वरील पुस्तकें खालील पत्त्यावर मिळतील:—

(१) सर कारकून, श्रीसाईबाबा शिरडी संस्थान,
पोस्ट–शिरडी, जि. अहमदनगर.

(२) श्रीसाईबाबा शिरडी संस्थान,
२५, बँक स्ट्रीट, फोर्ट, मुंबई १.



★

संगीत, नृत्य, शिल्प, साहित्य आणि चित्र—यांपैकीं कुठल्याहि उच्च कलाकृतींत एक प्रकारची तालबद्धता असते, एक लय असते, एक ठेका असतो !

★

यथार्थ चित्रदर्शनासाठीं—

# डी. डी. नेरॉय

हाफ-टोन, लाईन, थ्री अँड फोर कलर ब्लॉक्स
अँड ऑफसेट प्लेट मेकर्स, स्टीरियो टाइपर्स
अँड कॅलेंडर मॅन्युफॅक्चरर्स

५३४ सँडहर्स्ट ब्रिज
चौपाटी
मुंबई *

: टेलिफोन :
७१०४७

: शाखा :
नं. १९ 'कमलराज'
गणेशवाडी,
फर्ग्युसन कॉलेज रोड,
पुणें नं. २

[ स्थापना १९२१ ]

गेलीं सतत ३२ वर्षें सोन्या–चांदीचें, जड जवाहिरार्चे मनपसंत काम करून जनतेच्या विश्वासास पात्र झालेल्या आमच्या दुकानास, दसरा–दिवाळी सणाआधीं अवश्य भेट द्या, आणि मनपसंत घाटदार, सुंदर दागिने तयार करून घ्या.

अगर

घाटदार, सुंदर तयार असलेल्या दागिन्यांतून आपल्या पसंतीची निवड करा.

•



## आमच्या दुकानीं

:श्री साईबाबांच्या सोन्याचांदीच्या सुंदर मूर्ती, आंगठ्या, लॉकेटस्, फ्रेमसहित फोटो व पूजेचीं चांदीचीं भांडीं, देव्हारे, सिंहासनें तयार मिळतात.

•

लग्न, मुंज आणि वाढदिवस, या शुभ प्रसंगीं भेट देण्यालायक सुंदर व सुबक वस्तू नेहमीं तयार असतात.

•

# ई. आर. मालपेकर

जितेकर चाळ

ठाकुरद्वार, मुंबई २

ग्रामपंचायती, सर्वोदय केंद्रें, सार्वजनिक वाचनालयें, धनिक लोक संस्थांचे ट्रस्टीज यांना जनता-जनार्दनांत आपल्या पूज्य साधु-संतांची वाणी ग्रंथरूपें अव्याहतपणें चालू ठेवण्यास उत्तम संधि !

# निर्णयसागरांतील चौदा रत्नें

| | | | |
|---|---|---|---|
| १. नवनाथ भक्तिसार | ... ग्लेज ... | किं. | १६–०–० |
| २. भक्तिविजय | ... ,, ... | ,, | १८–०–० |
| ३. रामविजय | ... ,, ... | ,, | १६–०–० |
| ४. हरिविजय | ... ,, ... | ,, | १४–०–० |
| ५. दासबोध | ... पोथी ... | ,, | ५–०–० |
| ६. शिवलीलामृत | ... गुटका ... | ,, | ४–०–० |
| ७. शिवलीलामृत | ... ,, ... | ,, | २–८०० |
| ८. तुकारामचरित्र | ... ... | ,, | ७–०–० |
| ९. द्रौपदीस्वयंवर | ... ... | ,, | २–०–० |
| १०. ज्ञानेश्वरीसारामृत | ... ... | ,, | २–४–० |
| ११. कीर्तनसुधाधारा भाग १ ला | ... | ,, | ४–०–० |
| १२. कीर्तनसुधाधारा भाग २ रा | ... | ,, | ६–०–० |
| १३. गीता सार्थ ( सुबोध चंद्रिका ) | ... | ,, | १–८–० |
| १४. भक्ति-सुधा-धारा भाग १ ला | ... | ,, | १–८–० |
| | | | ९९–४–० |

वरील पुस्तकांचा संपूर्ण सेट आमच्या ग्राहकांस

आम्ही रु. ७५–०–० या किंमतीस देऊं

( टपाल खर्च वेगळा )

इतर पुस्तकांसाठीं कॅटलॉग मागवा.

## निर्णयसागर प्रेस,

२६–२८ कोलभाट स्ट्रीट, मुंबई नं. २

( टे. नं. २२२९० )

# जीवनाचें ध्येय काय असावें ?

## आध्यात्मिक कीं आधिभौतिक



त्रिवेणी चित्राची ही अनुपम कलाकृती
हिंदी व मराठी भाषेंत लौकरच येत आहे

: कलाकार :

गजानन जागीरदार, ललिता पवार, राजा परांजपे, दुर्गा खोटे इ. इ.

: संगीत :

मास्टर कृष्णराव, वसंत देसाई, सुधीर फडके आणि स्नेहल भाटकर

: पार्श्वगीतें :

लता मंगेशकर, आशा भोसले, मास्टर कृष्णराव, इ. इ.

: दिग्दर्शक :

रॉय किणीकर व चित्रकार दिनानाथ दलाल

लिहा : त्रिवेणी फिल्म्स लि., ५५, गिरगांव, मुंबई ४.



# श्रीसाई लीलामृत

गोष्टीरूपांत संस्थान कमिटीतर्फे श्रीसाईनाथ पुण्यतिथीच्या सुमुहूर्तावर प्रसिद्ध होणार आहे. या पुस्तकांत श्री साईबाबांचीं व त्यांच्या निरनिराळ्या, वास्तव्याच्या जागेचीं छायाचित्रें असतील. पृष्ठसंख्या १७५ ते २०० पर्यंत असून किंमत फक्त रु. २ आहे. ट. ख. निराळा.

## श्रीसाईबाबा शिरडी संस्थानांत विक्रीस असलेलीं पुस्तकें

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| (१) | श्रीसाईसच्चरित | (मराठी) | किंमत | रु. | ७–०–० |
| (२) | सच्चरित | (इंग्रजी) | ,, | ,, | ४–०–० |
| (३) | दासगणूकृत श्रीसाईनाथ–स्तवनमंजरी | | ,, | ,, | ०–२–० |
| (४) | ,, | (अध्यायं ४) | ,, | ,, | ०–८–० |
| (५) | सगुणोपासना | | | | ०–३–० |
| (६) | प्रधानकृत पुस्तक (इंग्रजी) | | ,, | ,, | १–०–० |
| (७) | श्री साई लीलामृत | | ,, | ,, | २–०–० |

**वरील पुस्तकें खालील पत्त्यावर मिळतील:—**

(१) सर कारकून, श्रीसाईबाबा शिरडी संस्थान,
पोस्ट–शिरडी, जि. अहमदनगर.

(२) श्रीसाईबाबा शिरडी संस्थान, मुंबई ऑफिस
२५, बँक स्ट्रीट, फोर्ट, मुंबई १.

श्रीसाईबाबा संस्थान, शिरडी, या संस्थेनें चालविलेलें

# श्रीसाई लीला त्रैमासिक

संपादक

श्री. नागेश आत्माराम सावंत

व्यवस्थापक

श्री. रामचंद्र महादेव राणे

साहाय्यक मंडळ

श्री. वसंतराव नारायण गोरक्षकर

प्रो. गोपाळ वामन भागवत, एम्. ए.

श्री. बाळकृष्ण सखाराम पाताडे

श्री. कृष्णराव जयराम भट

वार्षिक वर्गणी
रु. २-४-० (ट. खं. स.)

किरकोळ अंक
दहा आणे

## अनुक्रमणिका


| अ. नं. | विषय | लेखकांचें नांव | पृष्ठांक |
| --- | --- | --- | --- |
| १ | श्रीसाई वाक्सुधा | | ७ |
| २ | प्रिय वाचक | संपादकीय | ८ |
| ३ | बाबांचें महानिर्याण | पुरुषोत्तम मराठे | १२ |
| ३ | बाबांची लीला | आमचे प्रतिनिधि | १८ |
| ५ | श्रीसाईबाबा पुण्यतिथि महोत्सव | जिज्ञासु | ४३ |
| ६ | साधूंचे चमत्कार | प्र. मुं. आगासकर | ४६ |
| ७ | संतांची जात | खं. स. त्रिलोकेकर | ४९ |
| ८ | आत्मविद्या | ना. वा. गुणाजी | ५३ |
| ९ | संतांचा हास्यविनोद | द. पां. खांबेटे | ६३ |
| १० | वांचकांचे विचार | गं. रा. भट | ६९ |
| ११ | पुस्तक परीक्षण | गाधिज | ७१ |
| १२ | शिरडी-वृत्त | | ७६ |


# श्रीसाईलीला मासिकासंबंधीं

* श्रीसाईलीला त्रैमासिकाचे अंक दर वर्षी मार्च, जून, सप्टेंबर व डिसेंबर या महिन्यांत ३० तारखेस प्रसिद्ध होतात.
* किरकोळ अंकास दहा आणे.
* वार्षिक वर्गणी ट. ख. सह रु. २-४-०
* वर्षारंभ जानेवारीपासून असला तरी वर्गणीदार कोणत्याही महिन्यापासून होतां येतें.
* मागणी केल्यास वर्षारंभापासूनचे अंक शिल्लक असल्यास पाठविले जातात.
* वर्गणी मनिऑर्डरनें 'संपादक, श्रीसाईलीला त्रैमासिक कार्यालय, २५ बँक स्ट्रीट, फोर्ट, मुंबई १' या पत्त्यावर पाठवावी.
* या मासिकांत प्रामुख्यानें धार्मिक व तत्त्वज्ञानात्मक स्वरूपाचेच विषय येतात.
* आलेले लेख प्रसिद्ध करणें अगर न करणें व त्यांत जरूर तो फेरबदल करणें याबद्दल सर्व हक्क संपादकांकडे आहेत.

—संपादक

(श्रीसा... ) शिर्डी

# श्री साई लीला





## श्री साई वाक्सुधा

“जो प्रेमानें माझें नामसंकीर्तन करील त्याच्या सर्व मनकामना मी परिपूर्ण करीन. माझें चरित्र जो आवडीनें गाईल त्या माझ्या भक्ताच्या चाऱ्ही बाजूंस मी उभा आहें. माझें चरित्र जे जे श्रद्धेनें श्रवण करताल त्यांना सर्वतोपरी आनंद लाभेल. अनन्य भावानें जो माझी पोथी वाचील, माझ्या भजनांत रंगून जाईल, माझें अखंड ध्यान करील अशा माझ्या भक्तास मी कृतांताच्या दाढेंतून बाहेर काढीन, त्याच्या सर्व रोगांचें व संकटांचें निवारण करीन. अनन्य भक्तीनें मला एक लोटांगण घातल्यास अनंत जन्मींच्या अविद्येचा मळ नाहींसा होऊन माझ्या भक्तांचें मी अखंड कल्याण करीन. माझ्या या बोलांवर पूर्ण श्रद्धा ठेवून याची प्रचीती घ्या.”

(श्री साईसच्चरित-अध्याय ३)

# प्रिय वाचक—

चालू अंक हा पुण्यतिथि–विशेषांक आहे. या अंकांतील विषयांची विविधता आणि मनोरमता वाचकांचें अंतःकरण वेधून घेतील असा मला विश्वास वाटतो. श्री. ना. वा. गुणाजी, श्री. खं. स. त्रिलोकेकर, श्री. द. पां. खांबेटे, श्री. प्र. सुं. आगासकर इत्यादि सिद्धहस्त लेखकांचें साहाय्य या अंकाला मिळालें आहे. या सर्व लेखकांचे मी मनःपूर्वक आभार मानतों. चालू अंकांत बाबांच्या अतर्क्य लीलांचे भक्तांना आलेले अनुभव नेहमींहून अधिक देण्यांत आले आहेत. असे अनुभव पाठविणाऱ्या भक्तांना एक विनंती करावीशी वाटते. आपले अनुभव प्रसिद्ध करतांना आपलें नांव प्रसिद्ध करूं नये अशी इच्छा कांहीं भक्तांनीं व्यक्त केली आहे. परंतु नांव व पत्ता संपूर्ण प्रसिद्ध न करतां अनुभव दिल्यास, स्वाभाविकच वाचणाऱ्याच्या मनांत त्या अनुभवाच्या सत्यतेविषयीं थोडी शंका राहते. यासाठीं ज्यांना आपलें नांव व पत्ता प्रसिद्ध करावयाचा नसेल त्यांनीं कृपा करून आपले अनुभव पाठविण्याची तसदी घेऊं नये.

× × ×

चालू अंकांतील 'साधूंचे चमत्कार' या लेखाचे लेखक श्री. प्र. सुं. आगासकर यांनीं बाबांच्या लीला वर्णन करणारें एक पुस्तक लिहिलें असून तें 'श्रीसाई-लीलामृत' या नांवानें येत्या दसऱ्याला प्रसिद्ध होणार आहे. श्री. आगासकर यांनीं गुप्त पोलिसांच्या कथांचीं अनेक पुस्तकें लिहिलीं आहेत. त्यांच्या अंतःकरणांत जिव्हाळा आहे आणि लेखणींत गोडवा आहे. बाबांचे ते निःसीम भक्त आहेत. बाबांच्या चरित्राचें वर्णन करणारीं इंग्रजी पुस्तकें अनेक आहेत, ओंवीबद्ध पोथ्याहि आहेत; परंतु गद्यांत लिहिलेलें अधिकृत व सुटसुटीत असें मराठी एकहि पुस्तक नाहीं असें पाहून, श्री. आगासकरना 'आपण असें एखादें पुस्तक लिहावें' अशी तीव्र इच्छा झाली. त्याप्रमाणें कांहीं काळ इतर लेखन–वाचन बाजूस ठेवून त्यांनीं या चरित्र–कार्याला संपूर्णतः वाहून घेतलें. त्यांच्या श्रमांचा परिपाक असलेलें हें 'श्रीसाईलीलामृत' लवकरच वाचकांच्या हातीं पडेल. बाबांचा भक्तवृंदच नव्हे तर सर्वसामान्य वाचकवर्गहि 'श्रीसाई-लीलामृता'चें सोत्साह स्वागत करील यांत मला किमपि संदेह वाटत नाहीं.

× × ×

अलीकडे 'श्रीसाईबाबा प्रसन्न' या मथळ्याखालीं निनांवी पोस्टकार्डें कोणाच्या तरी पत्त्यावर पाठविण्याची एक टूम कोणा महाभागानें सुरू केली आहे ! या पत्रांत सामान्यतः पुढील मजकूर असतो.—

'तुम्हांस श्रीसाईबाबा प्रसन्न झाले आहेत. या वर्षी तुम्हांस धनलाभ होईल.

तरी ९ दिवसांचे आंत ९ पत्रें पाठवावीं. पत्रांत नांव गांव घालूं नये. या पत्राप्रमाणें मजकूर लिहावा. या पत्राचा अनमान करूं नये. अनमान केल्यास नुकसान होईल.'

असलें पत्र लिहून पाठविण्याची कल्पना कोणातरी अर्ध–वेड्याच्या मेंदूतून प्रथमतः निघाली आणि त्यानें पाठविलेल्या पत्रांमुळें कांहीं घाबरट लोकांनीं तशीं पत्रें पुढें पाठवून ही सांखळी चालू ठेवली असें दिसतें. अनेकांना अशीं पत्रें आलीं असून श्रीसाई–संस्थान, शिरडी, याचा कांहीं या पत्रांशीं संबंध आहे कीं काय अशी अनेकांकडून आमच्याकडे विचारणा आली आहे. यासाठीं हें स्पष्टपणें लिहितों कीं, ह्या पत्रांचा सारा प्रकार म्हणजे वेडगळपणाचा मासलेवाईक नमुना आहे. शिर्डीच्या साई–संस्थानचा याच्याशीं यत्किंचितहि संबंध नाहीं.

× × × ×

गेल्या वर्षीं श्रीसाईलीलेच्या पुण्यतिथि–विशेषांकांत 'बाबांची द्वारकामाई' या मथळ्याखालीं श्री. ना. वा. गुणाजी यांचा एक लेख प्रसिद्ध झाला होता. यंदांच्या रामनवमी विशेषांकांत 'श्रीबाबांची द्वारकामाई' या शीर्षकाचा लेख आला होता. या दोन्ही लेखांतील कांहीं विधानांना आक्षेप घेणारा एक लेख डॉ. श्रीनिवास बाळकृष्ण देव यांच्याकडून आमच्याकडे प्रसिद्धीसाठीं आला आहे. द्वारकामाईसंबंधीं डॉ. श्री. बा. देव यांचे वडील कै. बा. वि. देव यांनीं संशोधनपर असा एक लेख लिहून श्रीकृष्ण आणि साईबाबा यांचें साम्य दाखविलें होतें. त्यांच्या लेखांतील विधानांबाबत शंका घेणारा लेख गेल्या रामनवमी विशेषांकांत प्रसिद्ध झाला होता. त्यांतील कांहीं उल्लेख डॉ. श्री. बा. देव यांना आवडले नाहींत. 'पण श्री. देव हे बाबांना कृष्ण बनविण्यांत कां गुंग झाले हें समजत नाहीं.' असा एक उल्लेख त्या लेखांत आहे. त्याबाबत डॉ. देव लिहितात–'यांत लेखकाला आश्चर्याचा धक्का कां बसावा हें मलासुद्धां समजत नाहीं. लेखक स्वतःच कबुली देतात कीं बाबा हे परमात्मस्वरूप होते, कोणत्याहि देवतेचें स्वरूप ते धारण करूं शकले असते...आमचे वडिलांनीं बाबांना कृष्णच काय परंतु श्रीराम, ब्रह्मा, हरिहर, दत्त आदि सर्व कांहीं बनविलें आहे. मग बाबांना कृष्ण बनविल्याबद्दल श्री. देवांवर एवढा रोष कां ? का लेखकमहाशयांना कृष्णाचें वावडें आहे ?'

संशोधनपर लेखांत एकमेकांचीं मतें खोडून काढण्याचा प्रयत्न प्रत्येक संशोधक हा करणारच. तें करतांना त्यानें दुसऱ्याच्या मनाला लागेल असे शब्द न वापरणें हें सर्वस्वीं इष्ट आहे हें खरें. परंतु क्वचित् प्रसंगीं एखादा शब्द कमी अधिक पडला तर त्यामुळें विरुद्ध बाजूचें मत धारण करणाऱ्यांनीं लगेच प्रक्षुब्ध होणें हेंहि इष्ट नव्हे. डॉ. देव यांच्या अंतःकरणाला आपल्या वडिलांच्यासंबंधीं किंचित् अधिक्षेपयुक्त उद्गार दुःखकर ठरावेत. हें स्वाभाविकच आहे. परंतु त्यांच्या मनाची व्यथा व्यक्त करणारा लेख छापला म्हणजे आक्षेप व प्रत्याक्षेप यांना परत भरती येण्याचा संभव. यासाठीं आम्हीं तो लेख छापलेला नाहीं. सर्वसामान्यपणें श्रीसाईलीलेंत अनुदार व अधिक्षेपयुक्त उद्गारांनीं युक्त असा लेख प्रसिद्ध न करण्याचा आमचा कटाक्षानें प्रयत्न असतो. तरीहि एखाद्या

लेखांत स्वमतप्रतिपादनाच्या भरांत लेखकाकडून एखादा अधिक-उणा शब्द राहून गेला तर तो वाचकांनी आणि संबंधित लोकांनी क्षम्य मानावा, अशी माझी विनंती आहे.

× × ×

श्रीसाईलीला त्रैमासिक विविध भाषांतून प्रसिद्ध करावें अशी सूचना कांहीं भक्तांकडून आली आहे. गुजराती, हिंदी, तामिळ, कानडी इत्यादि भाषा बोलणारे अनेक लोक साईबाबांचे भक्त आहेत. त्यांच्यासाठीं त्या त्या भाषांतून साईलीला प्रसिद्ध व्हावी अशी इच्छा अनेकांनीं व्यक्त केली आहे. ही सूचना अर्थातच विचारार्ह आहे याबद्दल दुमत नाहीं. परंतु इच्छा आणि ती पार पाडण्याचें सामर्थ्य हीं सम प्रमाणांत असलेलीं क्वचितच आढळतात. तसेंच आमचें झालें आहे. तूर्त मराठी त्रैमासिक आबालवृद्धांना प्रिय करण्याचा आमचा प्रयत्न चालू आहे. या त्रैमासिकाचें मासिकांत रूपांतर करण्याचा संकल्पहि मनाशीं धरलेला आहे. मराठी नियतकालिक सुस्थिर व सुस्थित झालें म्हणजे इतर भाषांतूनहि 'साईलीला' चालू करण्याचा विचार व्यवहारांत उतरविण्याचा आम्ही अवश्य प्रयत्न करूं. अंतीं हें कार्य आमच्या इच्छेचें केवळ नसून बाबांच्या स्वाधीनचें आहे. त्यांची तशी इच्छा असली तर अनेक भाषांतून 'साईलीला' प्रसिद्ध करण्याचें सामर्थ्य ते आम्हांला खास देतील.

× × ×

श्रीसाईलीलेंत जाहिराती घेतल्या जातात, त्या घेऊं नयेत व निर्भेळ मजकुराचें तें नियतकालिक असावें अशी आपली इच्छा कांहीं भक्तांनीं कळविली आहे. जाहिराती न घेतां साईलीला स्वतःच्या पायांवर उभी राहूं शकली असती तर तसें करणें हाच उत्तम पक्ष ठरला असता. परंतु शक्य त्या कमी किंमतींत अनेक छायाचित्रांसह श्रीसाईलीला भक्तांना सादर करायची तर जाहिराती स्वीकारणें अपरिहार्य आहे, असें दिसून आल्यावरूनच हा गौणपक्ष आम्हीं तूर्त धरला आहे. रंगीत किंवा साधीं छायाचित्रें न देतां व पृष्ठें फार न वाढवितां कमी मजकुराचें नियतकालिक देणें, किंवा जाहिराती स्वीकारून वाचकांना अधिकांत अधिक मजकूर व छायाचित्रें यांनीं युक्त असें नियतकालिक देणें, असे दोन पर्याय आमच्यापुढें होते. त्यांतील दुसरा आम्हीं पत्करलेला आहे. जाहिराती देतांना अर्थातच कोणत्या स्वरूपाच्या जाहिराती द्यावयाच्या यांचा विवेक आम्ही कटाक्षानें बाळगूनच त्या देऊं.

× × ×

'एका भक्ताच्या बाबतींत बाबा त्वरेनें धांवून येऊन त्याचें संकट निवारण करतात आणि दुसऱ्या एखाद्या भक्ताच्या प्रार्थनेकडे बहिरे कान करून त्याला दुःखांत खितपत ठेवतात...एवढेंच नव्हे तर एकाच भक्ताला बाबा पावतात तर कधीं पावत नाहींत, या विसंगतीचा अर्थ काय?' असा शंकर नांवाच्या एका भक्ताचा प्रश्न गेल्या अंकीं देण्यांत आला होता. त्यावर आलेल्या उत्तरांपैकीं एक मार्मिक उत्तर चालू अंकांत 'वाचकांचे विचार' या सदरांत छापलें आहे.

अनेकांना अनेक वेळां हा प्रश्न पुरातन कालापासून पडत आलेला आहे. या प्रश्नाशीं

संबद्ध असा एक संवाद 'एम्.' 'यांच्या धि गॉस्पेल ऑफ् श्रीरामकृष्ण' या पुस्तकांत मला आढळला. सुरेंद्र नांवाच्या एका भक्तानें श्रीरामकृष्ण परमहंस यांना एकदां असें म्हटलें कीं 'ईश्वर न्यायी आहे. त्यानें आपल्या भक्तांची काळजी अवश्य घेतली पाहिजे.' त्यावर श्रीरामकृष्ण म्हणाले, 'शास्त्रांत असें सांगितलेलें आहे कीं पूर्वजन्मांत औदार्य व दानशौर्य दाखविणाऱ्या लोकांना चालू जन्मांत धनप्राप्ति होते. पण तुला खरें सांगायचें तर हें जग म्हणजे ईश्वराची माया आहे. या मायेच्या साम्राज्यांत मनाचा गोंधळ उडवून देणाऱ्या अनेक गोष्टी आहेत. माणसाला त्यांचा उलगडा होणें अशक्यप्राय आहे. ईश्वराचे मार्ग खरोखरी आकलन होणें असंभवनीय आहे. भीष्माचार्य हे शरपंजरीं पडलेले असतांना एकदां श्रीकृष्णासह पांडव त्यांना भेटायला गेले. बोलतां बोलतां भीष्माला एकदम रडूं कोसळलें. पांडव कृष्णाला म्हणाले, 'कृष्णा ! ही किती नवलाची गोष्ट आहे! भीष्माचार्य हे अष्ट वसूंपैकीं एक आहेत. यांच्याइतकें शहाणपण अंगीं असलेला पुरुष सबंध जगांत दुसरा आढळावयाचा नाहीं, असें असून त्यांच्यावरहि मायेचा प्रभाव पडावा. आणि आगामी मृत्यूच्या कल्पनेनें त्यांना रडूं कोसळावें हें किती विलक्षण आहे !' त्यावर श्रीकृष्ण म्हणाला, 'पण भीष्म कांहीं त्यासाठीं शोक करीत नाहीं. तुम्ही त्याला विचारा ना त्याच्या दुःखाचें कारण !'

'पांडवांनीं भीष्माला त्याच्या शोकाचें कारण विचारलें. त्यावर भीष्म म्हणाला, 'कृष्णा ! मला ईश्वराच्या मायेचा कणभरहि उलगडा होऊं शकत नाहीं. ईश्वराचा अवतार स्वतः पांडवांच्या सदोदित सांनिध्यांत आहे, त्यांचा प्रियसखा आहे; असें असूनहि त्यांच्या आपत्तींना सीमा नाहीं. यासाठीं मला रडूं येतें. मी या गोष्टीवर जों जों विचार करतों तों तों मला अधिकाधिक जाणवतें कीं ईश्वराच्या मार्गांचें यत्किंचितहि आकलन होणें कोणाला कधीं शक्य नाहीं.'

ईश्वरावतार साईबाबांच्या अनुग्रहाची गोष्टहि अशीच आहे. आपल्या आपत्प्रसंगीं त्यांना शरण जाणें व त्यांची करुणा भाकणें इतकाच आपला अधिकार. त्यांनीं एखाद्या वेळीं आपल्यावरील संकटाचें निवारण केलें नाहीं तर 'हें तुम्हीं असें कां केलेंत ?' हा प्रश्न विचारण्याचें धाष्टर्य कोणामध्यें आहे ? आपली प्रार्थना अत्यंत तळमळीनें व अंतःकरणापासून असली आणि तरीहि आपलें दुःखनिवारण झालें नाहीं, तर आपल्याला न समजतां आपल्या प्रार्थनेंत कांहीं उणीव राहिली आहे असें मानावें, किंवा जी परिस्थिति आपल्यावर आहे ती तशी ठेवणें हेंच साईबाबांच्या मनांत आहे असें समजावें.

ईश्वराची अनन्य भक्ति केली म्हणजे माणसाचें कल्याण होतें हा सिद्धान्त निरपवाद खरा आहे; कारण पूर्णत्व पावलेल्या सर्व संतांनीं व अवतारांनीं तो अधिकारी वाणीनें उद्घोषित केला आहे. परंतु 'कल्याण होणें' म्हणजे आपल्या संसारांतील विपत्ती दूर होणें असा याचा अर्थ नव्हे. तुकारामांनीं आपल्या विठ्ठलभक्तीनें आपलें आत्यंतिक कल्याण करून घेतलें, पण म्हणून तुकाराममहाराजांचा लौकिक संसार, हा अत्यंत सुखासीनपणाचा झाला नाहीं किंवा संसारांतल्या आपत्ति त्यांच्यावर कमी आल्या

असेंहि झालें नाहीं. पण संसारांतील लौकिक दुःखें नाहींशीं झालीं नाहींत म्हणून तुकाराममहाराजांनीं विठ्ठलाला कधीं जाब विचारला काय?

प्रत्यक्ष ईश्वराचेच अवतार अशा पूर्ण पुरुषाकडे जाऊन आध्यात्मिक उन्नतीचा व परम कल्याणाचा मार्ग दाखविण्याची त्याच्याकडे प्रार्थना करण्याऐवजीं, 'माझें अमकें संकट निवार, मला तमुक दे' अशी क्षुद्र प्रार्थना करणें हें वस्तुतः किती वेडगळपणाचें! कल्पतरूखालीं बसलेल्या बुभुक्षित माणसानें पंचपक्वान्नाची इच्छा करण्याऐवजीं आमटी भाताची आक्रोशानें मागणी करण्यासारखेंच आहे हें. परंतु ईश्वराकडे परमसुखाची प्रार्थना करण्यासहि अंगीं धैर्य असावें लागतें, 'सबुरी' असावी लागते. ती आम्हां दुबळ्या माणसांत नसते. तेव्हां संसारांतल्या दुःखांच्या निवारणासाठीं ईश्वरचरणाशीं धांव घेणें हें गौण असलें तरी अनिष्ट नव्हे. पण अशी प्रार्थना करतांना आपल्या या 'भक्ती'चा 'हिशेब' ठेवणें हें मात्र अनिष्ट आहे. 'मीं इतकी प्रार्थना केली मला देव पावला; मीं तितकीच प्रार्थना केली पण देव पावला मात्र नाहीं. असें कां?' हा हिशोब भक्तीचा द्योतक नव्हे. या बाबतींत जितका विचार करावा तितकें आपलें मन वृथा संशयांच्या भोवऱ्यांत सारखें गिरक्या घेत राहील. संतांचे मार्ग त्यांचे त्यांनाच ठाऊक. त्यांच्या चरणाशीं लीन होणें, त्यांच्या कृपेची याचना करणें आणि संसार-ताप नाहींसा करण्यासाठीं त्यांची करुणा भाकणें एवढीच आपली शक्ति, एवढीच आपली योग्यता.

× × ×

चालू अंकावरील तिरंगी चित्राचा ब्लॉक आणि अंकांतील बाबांच्या तिरंगी छायाचित्राचा ब्लॉक हे श्री. जी. एम्. मेहता यांनीं विनामूल्य करून दिले. त्यांचे आम्ही ऋणी आहोंत. गिरगांवांतील सन प्रोसेस वर्क्स लि. या कंपनीचे श्री. जी. एम्. मेहता हे मॅनेजिंग डायरेक्टर आहेत. त्यांनीं दिलेल्या सहकार्याबद्दल त्यांचे आभार मानतों व पुढेंहि ते 'श्रीसाईलीले'वर असाच लोभ ठेवतील अशी आशा बाळगतों.

या अंकांतील बाबांचें तिरंगी चित्र सुप्रसिद्ध चित्रकार दलाल यांनीं विनामूल्य काढून दिलें. त्यांचे आम्ही आभारी आहोंत.

—संपादक

साहिब जिनके उर बसै, झूट कपट नहिं अंग,
तिनका दरसन न्हान है, कहँ परबी फिर गंग ॥

भावार्थः—ज्याच्या अंतःकरणांत ईश्वराचें वास्तव्य आहे, असत्य आणि कपट याचा ज्याच्या हृदयांत लवलेशहि नाहीं, त्याचें दर्शन हेंच तीर्थस्नान होय. त्यापुढें तुमचें पर्व किंवा गंगास्नान याचांहि मातब्बरी नाहीं.

—गरीबदास

आलें व तें यांना (सिनेमा–नट) दाखविलें. नंतर या धंद्यांत होणाऱ्या फायद्याचें भडक चित्र यांचेपुढें रंगविण्यांत आलें व धंद्यांत एक भागीदार होण्याबद्दल फार गळ घालण्यांत आली. मित्रांच्या बोलण्यावर यांचा विश्वास बसला व ४००० रुपये रोख भरून व १००० रु. ची प्रॉमिसरी नोट लिहून देऊन ते या कंपनीचे एक भागीदार झाले. परंतु अगदीं अल्पावधींतच त्या कंपनीचा बोजवारा उडण्याचा रंग दिसूं लागला. कंपनीतर्फें यांचेवर प्रॉमिसरी नोटेप्रमाणें १००० रु. रोख ताबडतोब भरण्यांत यावेत अशी कोर्टांत फिर्याद करण्यांत आली. तेव्हां कंपनीच्या सर्व भानगडी यांना कळल्या. या संकटांतून सोडविण्याबद्दल त्यांनीं श्रीसाईबाबांची अत्यंत कळकळीनें प्रार्थना केली व सुदैवानें या खटल्याचा निकाल यांचे बाजूनें झाला. तेव्हां धीर येऊन यांनीं कंपनीवर आपले ४००० रुपये परत देण्यांत यावेत म्हणून कोर्टांत दावा केला. ह्या दाव्याचा निकालहि यांचेच बाजूनें झाला.

बाबांच्या कृपेची ही प्रचीती पाहतांच यांना शिर्डीस जाऊन बाबांचें दर्शन ताबडतोब घेण्याची अत्यंत तळमळ लागून राहिली. परंतु जवळ पुरतेसे पैसे नव्हते. कोर्टाचा निकाल जरी यांचे बाजूनें झाला होता तरी प्रत्यक्ष पसे पदरांत पडले नव्हते. ते मिळण्यास साहजिकच पुष्कळ वेळ लागणार होता. परंतु इतकें थांबण्याची आतां यांची तयारी नव्हती. बाबांच्या भेटीचा त्यांना एकसारखा ध्यास लागला. शेवटीं कर्ज काढून शिर्डीस जाण्याची त्यांच्या मनाची तयारी झाली आणि त्याच वेळेस बाबा यांचे मदतीस धांवले.

कारण या भक्तांनीं आपले गांवाहून ४ ऑगष्ट १९५२ या दिवशीं निघून शिर्डीस ६ तारखेस जाऊन पोहोंचण्याचा नक्की बेत केला व पैशांची व्यवस्था ३।४ दिवस अगोदरच करावयास पाहिजे म्हणून ३१ जुलैस कर्ज काढण्याचा निश्चय केला व त्याप्रमाणें बाहेर जाणयस निघणार, तोंच दारांत ३।४ जण यांची चौकशी करीत उभे. हे इसम अगदीं अनोळखी होते परंतु थोड्याच वेळांत ते सिनेमाधंद्यांतील लोक होत असें यांना कळून आलें. या लोकांनीं एक नवीन सिनेमा कंपनी स्थापन केली होती व तींत काम करण्याबद्दल या भक्तांस विनंती करण्यास ते आले होते. यांना शिर्डीचा प्रवास–खर्च व इतर खर्च (बाबांना दक्षिणा रूपानें कांहीं देणगी, वस्त्रें, वगैरे) मिळून सुमारें ५०० रुपये हवे होते. आश्चर्याची गोष्ट अशी कीं या लोकांनीं यांना त्यांचे कंपनींत फक्त ३ च दिवस काम करण्यास (व तेंहि ताबडतोब) सांगितलें व त्यांचे मोबदला ५०० रु. देऊं केले. आपली इच्छा बाबांनीं पुरविली असें वाटून कोणत्याहि प्रकारची घासाघीस न करतां त्यांनीं या लोकांची विनंती मान्य केली व त्याप्रमाणें करार होऊन लगेच त्याच दिवसापासून त्यांनीं काम केलें व तें ३ दिवसांत पुरें केलें. पुढें ठरल्याप्रमाणें ते ४ तारखेस संध्याकाळीं मद्रासहून निघाले व ५ तारखेस कोपरगांवास रात्रीं येऊन ६ तारखेस शिर्डीस आले. मग बाबांचें दर्शन घेतल्यावर त्यांस किती आनंद झाला असेल याची कल्पना ज्याची त्यानेंच करावी. त्यांचे डोळ्यांतून सारखे आनंदाश्रू ओघळत होते व हें दृश्य येथील कित्येकजणांनीं पाहिलें आहे.

श्रीबाबा हे कर्जाच्या विरुद्ध असत. त्यांच्या अनेक शिकवणीपैकीं एक शिकवण अशी होती कीं, लोकांचीं कर्जें काढून आपल्या गरजा भागवूं नयेत. कर्जाचा परिणाम मोठा वाईट असतो. त्यामुळें आपला भक्त कर्ज काढून शिर्डीस निर्याणीनें येतो आहे असें पाहतांच ते त्याचे मदतीस धांवून गेले व त्यास कंपनीच्या लोकांतर्फे रोख ५०० रुपयांची मदत करून त्यांचे डोक्यावर कर्जाचा भार चढूं दिला नाहीं व त्यांची शिर्डीस येण्याचीहि इच्छा पूर्ण केली.

★

## ( २ ) राहिलें मी एकली, आधार साईमाउली

सौ. सुशिलाबाई दत्तात्रय हजारे ( रामवाडी, पोष्टाजवळ, मालेगांव कॅम्प, जिल्हा-नाशिक ) यांनीं सांगितलेला अनुभवः—

आम्हीं साईभक्त आहोंत. बाबांच्या फोटोची आमच्या घरीं नित्य पूजाअर्चा होतच असते. त्यांच्या कृपेचा नुकताच आम्हांस खालीलप्रमाणें अनुभव आला.

'ऑक्टोबर १९५२ मधील गोष्ट. त्यावेळीं आम्ही भिंगार ( नगर जिल्हा ) येथें होतों. माझी मुलगी चि. कुंदा, वय वर्षें ९, हिला एके रात्रीं पहाटे ४ च्या सुमाराला स्वप्न पडलें. स्वप्नांत तिला एक दिवाणखाना दिसला. त्या दि..णखान्यांत एक कोच असून त्यावर ती एकटीच बसली आहे, जवळच रेडियो आहे, व तिचें सर्व लक्ष रेडियोकडे आहे. कारण रेडियो लवकरच सुरू होणार अशी तिची कल्पना. इतक्यांत तिच्या डाव्या बाजूच्या दरवाजाकडून एक चोर आंत आला व तिचे अंगावर त्यानें सुरा उगारला. त्याबरोबर ती घाबरली व 'धांवा', 'धांवा' असें ओरडली. अगदीं त्याच वेळेस रेडियोंतून अत्यंत मंजुळ व लयबद्ध आवाजांत खालील गाणें सुरू झालें,

'राहिलें मी एकली, आधार साईमाऊली '

'रेडियोंतून गाण्याचे स्वर निघाले मात्र, तो चोर ताबडतोब नाहींसा झाला. गाण्याची वरील ओळ संपतांच माझी मुलगी जागी झाली व तिनें मला झोपेंतून उठवून ताबडतोब सर्व स्वप्न सांगितलें. पुढील संकटाची मला ती सूचनाच वाटली; पण तें संकट कोणत्या प्रकारचें येईल याची कल्पना येईना. परंतु तें बाबाच निवारण करतील याची मात्र मला पूर्ण खात्री होती. कारण त्यांनीं याची जाणीव माझ्या मुलीस पडलेल्या स्वप्नांतच दिली होती.

'आणि या स्वप्नाची प्रचीति अवघ्या एक तासांतच आली. माझ्या यजमानांना त्या दिवशीं दौऱ्यावर लवकर जावयाचें होतें. म्हणून ते ५–५। चे सुमारास उठले आणि त्यांनीं दिवा लावला. दिवा लावतांच त्यांना चि. कुंदाच्या पांघरुणांतून सुमारें ४–५ इंच लांबीचा जाड पिवळसर असा विंचू बाहेर पडलेला दिसला. त्या बरोबर त्यांनीं त्यास बुटानें ठार मारलें. माझ्या मुलीवरचें मोठें संकट दूर झालें. कारण तो विंचू जहाल विषारी होता व तो माझ्या मुलीचे पांघरुणांत किती वेळ होता याची कांहीं कल्पनाच

करवत नाहीं. बाबांनींच तिचें रक्षण केलें यांत शंकाच नाहीं. सर्प विंचू यांना चोर अग्नी सेंश आहे. पण भक्तांना साईमाउलीचाच आधार असल्यावर अशा चोरांचें काय चालणार! भक्तांचेंच नव्हे तर त्यांच्या मुलांबाळांचीहि इतक्या कळकळीनें काळजी घेणाऱ्या माझ्या साईमाउलीस माझें अनंत प्रणाम!

★

## (३) उदीनें विंचवाचें विष उतरलें

श्री. यशवंत अप्पाजी शिवडेकर, रिटायर्ड नाझर, डि. कोर्ट, धुळें (राहण्याचा पत्ता–म्हस्के गल्ली, बाळकृष्ण–भुवन, अंमळनेर, जि. पू. खा.) यांचा अनुभवः–

'साईबाबांची माहिती मला बरेच वर्षांपासून आहे, परंतु शिर्डीस जाऊन समाधीचें प्रत्यक्ष दर्शन घेण्याचा योग ता. १७–२–५३ रोजीं आला. त्यानंतर मार्च महिन्यांत दोनदां दर्शन घडलें. ता. १२–३–५३ रोजीं बाबांचें दर्शन घेऊन आणि बरोबर उदी, फोटो वगैरे घेऊन मी अंमळनेरास परतलों.

'बुधवार ता. २५–३–५३ ची गोष्ट. त्या दिवशीं नित्याप्रमाणें मी पहांटेसच आमच्या देवाची पूजा करूं लागलों. वेळ ५ वाजण्याची असावी. देवावरचें निर्माल्य मी ताम्हनांत काढूं लागलों. कांहीं ताम्हनाच्या बाहेर पडलें. तेव्हां तें गोळा करून पुन्हां ताम्हनांत टाकूं लागलों, तों उजव्या हाताचे तर्जनीस कांहीं तरी डंसल्यासारखें वाटलें म्हणून हात झटकला तों विंचू दिसला. तेव्हां मीं माझ्या मुलास हांक मारली. मुलगा धाब्यावर निजला होता; तो ताबडतोब खालीं आला. त्यानें विंचवास चपलेनें ठार मारलें. इतक्यांत माझी बहिणहि तेथें आली. विंचवाच्या वेदनांची आतां मला जाणीव होऊं लागली, कारण विंचवाचें विष मनगटापर्यंत ह्या वेळपावेतों चढलें होतें. शिवाय ज्या ठिकाणीं विंचू चावला होता त्या ठिकाणीं फार झणझण होत होती. माझ्या घरांत विंचवाचें औषध होतें. तें लावण्यास माझ्या बहिणीनें व मुलानेंहि सांगितलें. परंतु मीं स्पष्ट नकार दिला. माझी बाबांवर पूर्ण श्रद्धा होती. मीं मुलास सांगितलें, कीं वृश्चिकदंशाच्या वेदनांवर बाबांची उदी हें मोठें अमोघ औषध आहे. व बाबांच्या भक्तांस याची माहिती पूर्वीपासूनच आहे. माझें औषध म्हणजे उदीच असें म्हणत, मीं बोटास पाणी लावलें आणि ज्या डबींत बाबांची उदी ठेवली होती त्या डबींत बोट खुपसलें. तें बोट मीं तसेंच कांहीं वेळ उदींतच बुडवून ठेवलें. आश्चर्याची गोष्ट अशी, कीं, अवघ्या ५ मिनिटांतच वेदना कमी झाल्या. थोडी झणझण मात्र राहिली. मुलगा म्हणाला कीं ही झणझण २४ तास राहील. परंतु मीं सांगितलें कीं उदीचें औषध हें सामान्य औषध नव्हे; ही झणझणसुद्धां दुपारीं १ वाजेपर्यंत नाहींशी होईल. त्यानंतर मीं माझे नित्य कार्यक्रम केले आणि जेवण वगैरे होऊन झोंप घेतल्यावर पाहतों तों झणझणही थांबली व विंचू चावला होता कीं नाहीं याची शंकाच वाटूं लागली. बाबांच्या या उदीप्रभावाचें मला व माझ्या घरांतील मंडळींना आश्चर्यमिश्रित कौतुक वाटलें. कारण

बाबा ह्यात असतांना लोकांच्या प्रत्ययास जे उदीचे चमत्कार आले तसेच चमत्कार आजहि आमच्या सारख्याच्या अनुभवास येतात ही कांहीं सामान्य गोष्ट खात्रीनें नव्हे.

★

## ( ४ ) अश्रद्धाचीहि श्रद्धा कशी बसली....

उदीप्रभावाची कुटाळी करणाऱ्या गृहस्थाचे मुलीस वृश्चिकदंश कसा झाला आणि त्या दंशाच्या वेदनांचा उपशम उदीनेंच होऊन त्या गृहस्थाची बाबांवर श्रद्धा कशी बसली, याबाबतचा श्री. यशवंत अप्पाजी शिवडेकर यांनीं सांगितलेला दुसरा अनुभव खालीं देत आहे.

श्री. शिवडेकर म्हणतात—

त्याच दिवशीं म्हणजे बुधवार ता. २५–३–५३ रोजीं मी दुपारीं ३॥ चे सुमारास नित्याप्रमाणें माझ्या एका स्नेह्यांचे घरीं गप्पागोष्टी करण्यासाठीं गेलों. वे. शा. सं. मुरलीधरशास्त्री पाठक हे त्या वेळीं तेथें बसलेले होते. उदीप्रभावाचा मला नुकताच आलेला अनुभव (वर दिला आहे) मीं त्यांना सांगितला. त्या वेळीं माझे स्नेही मला म्हणाले, 'अहो, काय थापा मारतां यशवंतराव! अहो तुम्हांस चावला तो विंचूच नसेल मुळीं. एखादा किडामिडा असेल आणि अंधारांत त्याला तुम्हीं विंचू समजलांत झालं. आणि यदाकदाचित् जरी तुम्हांला विंचू चावला असेल तरी कांहीं माणसांना विंचू चढतच नाहीं. तुम्हीहि त्यापैकींच असाल.' अशा तऱ्हेनें त्यांनीं कुटाळी करण्यास आरंभ केला. मला वाईट वाटलें. मला आलेला प्रत्यक्ष अनुभव मी त्यांना सांगत होतों; ती कांहीं कल्पित गोष्ट नव्हती. त्यामुळें त्यांच्या कुटाळकीचा सहाजिकच मला राग आला. बैठकींतून उठल्यावर रस्त्यानें घरीं जातांना मीं मनांत म्हटलें कीं यांच्याकडे कोणास तरी विंचू डंसावा आणि बाबांनीं आपल्या उदीचा प्रभाव त्यांना दाखवावा, म्हणजे तरी त्यांची कुटाळी करण्याची प्रवृत्ती नाहींशी होऊन बाबांवर श्रद्धा बसेल.

अत्यंत आश्चर्याची गोष्ट अशी कीं, अगदीं दुसरेच दिवशीं म्हणजे गुरुवार ता. २६–३–५३ रोजीं पहाटे ४॥ चे सुमारास माझ्या स्नेह्यांच्या मुलीस (वय ८।९ वर्षें) विंचू चावला. विंचू पायाच्या बोटाजवळ चावला होता. मला त्यांनीं ताबडतोब बोलावणें पाठविलें. तेव्हां मीं लगेच उदीची डबी घेतली आणि बाबांचे फोटोस नमस्कार करून त्यांचेकडे गेलों. पाहतों तों मुलीस असह्य अशा वेदना होत होत्या, ती झोकांडे खात होती. विंचवाचें विष तिचे कंबरेपर्यंत चढलें होतें. आई वडील अगदीं घाबरले होते. मीं त्यांना सांगितलें कीं आतां घाबरण्याचें कारण नाहीं. कारण, उदीरूपानें साक्षात् बाबाच येथें आले आहेत व ते सर्व ठीक करतील. आणि असें म्हणत असतां नाच मीं मुलीचे पायास बोटाजवळ ज्या ठिकाणीं विंचू चावला होता त्या ठिकाणीं प्रथम पाणी लावलें व नंतर उदीचा थोडासा लेप दिला आणि तीर्थ म्हणून पाण्यांत उदी कालवून ती तिला पाजली. हें सर्व चालू असतांना तोंडानें मी अर्थातच बाबांचें नांव घेत होतों.

५।१० मिनिटांनीं मुलीनें आपणहून सांगितलें कीं वेदना नाहींशा झाल्या असून ज्या ठिकाणीं विंचू चावला होता त्या ठिकाणीं फक्त झणझण होत आहे. मग मी घरीं गेलों. पुन्हां ८ वाजतां त्यांचेकडे विचारपूस करण्यास गेलों असतांना सर्वांनीं सांगितलें कीं विंचवाच्या वेदना उदीच्याच योगानें नाहींशा झाल्या, आतां फक्त झणझण आहे; पण आतां आम्हांला त्याची काळजी नाहीं. कारण ही झणझण २४ तास राहतेच व नंतर आपोआप नाहींशी होते असें म्हणतात. मी म्हणालों कीं उदी हें कांहीं सामान्य औषध नव्हे. 'वैद्यांचे वैद्य निर्धार' असें बाबांचें ते औषध आहे. ह्या वेदनाहि दुपारीं ३ वाजेपर्यंत नाहींशा होतील. त्याप्रमाणें झालें. तेव्हां सर्वांस मोठा आनंद झाला. या प्रसंगानंतर अर्थातच या कुटुंबाची बाबांवर श्रद्धा बसली.

★

## (५) नवसाच्या मुंजीची हकीकत

श्री. चितांबर नारायण कुळकर्णी, (धंदा–शेतकी, राहणार मु. –त्रिकोळी, तालुका–उमरगा, जिल्हा–उस्मानाबाद–निझाम स्टेट) यांनीं आपले मुलाची मुंज शिर्डी संस्थानांत ता. १–४–५३ रोजीं केली. ही नवसाची मुंज होती. याबाबतचा त्यांचा अनुभव विचारतां श्री. कुळकर्णी म्हणाले,—

माझ्या मुलाचीच काय पण आम्हा सर्व भावांच्याहि मुंजी शिर्डी संस्थानांतच झाल्या. आमच्या वडिलांना साईबाबांच्या कृपेनें झालेलीं आम्हीं मुलें आहोंत. माझे वडील नु. तेच ४।५ वर्षांपूर्वी वारले. बाबा हयात असतांना ते शिर्डीस वारंवार बाबांचे दर्शनास येत असत. माझे आई वडिलांना पाहिलें अपत्य म्हणजे मुलगी. मग ७।८ वर्षें कांहींच मुलबाळ झालें नाहीं. पुढें ती मुलगीहि वारली. नंतर २ मुलगे झाले. पण तेहि अगदीं लहानपणींच वारले. तेव्हां माझ्या आईवडिलांना फार वाईट वाटलें. एके वर्षी (साधारण १९१० सालीं) माझे आईवडिल शिर्डीस बाबांचे दर्शनास आले. माझे वडिलांनीं प्रथम बाबांस नमस्कार केला व मनांत प्रार्थिलें कीं, 'बाबा माझीं मुलें जगूं द्यात; मी माझ्या सर्व मुलांच्या मुंजी शिर्डीसच करीन.' मनांत प्रार्थना करण्याचें कारण कीं बाबांचे समोर बोलण्याची कोणाची प्राज्ञाच होत नसे असें माझे वडील मला सांगत. बाबा त्यांना उद्देशून कांहीं बोलले तरच त्यांचेशीं बोलणें शक्य होतें. अर्थात् कांहीं ठराविक माणसें मात्र बाबांशीं नित्य बोलत माझ्या वडिलांनीं नमस्कार केल्यावर माझ्या आईनीं बाबांस नमस्कार केला आणि माझे वडिलांनीं जी प्रार्थना केली होती तीच प्रार्थना तिनेंहि मनांत केली. ती नमस्कार करून उठते न उठते तोंच बाबांनीं एकदम शिव्यांचा भडिमार सुरू केला. नंतर ते आपणाहून शांत झाले व माझे आईस 'कल्याण होईल' असा आशीर्वाद दिला. माझे आई–वडिलांस आनंद झाला. कारण बाबा ज्यांना शिव्या देत असत त्यांचें खरोखरीच कल्याण होई. ही गोष्ट माझे वडिलांना ठाऊक होती. त्याप्रमाणेंच पुढें झालें. आमच्या वडिलांना नंतर एकंदर तीन मुलगे झाले. मी

शेवटच्या. आमुच्या तिघांच्याहि मुंजी शिर्डीसच झाल्या. पुढें माझें लग्न झालें. दोन मुली झाल्या; परंतु मुलगा नाहीं. तेव्हां आमचे वडिलांस फार वाईट वाटलें. त्यांनीं बाबांस नवस केला कीं, 'माझे मुलास (चित्रांबर) जर मुलगा झाला तर त्याचीहि मुंज मी शिर्डीसच करीन.' त्याप्रमाणें १ वर्षांतच मला मुलगा झाला. १९४८ सालीं तो मुंजीस योग्य झाला होता; परंतु रझाकारांचे गडबडींत आम्हांस येथें येतां आलें नाहीं, व सन १९४९ मध्यें माझे वडिलच वारले. त्यामुळें हें कार्य जें लांबणीवर पडलें तें पडलेंच. शेवटीं मुलाची तब्येत बरी राहीनाशी झाली. तेव्हां कसेंहि करून हा नवस तांबडतोब फेडावा असें वाटल्यावरून आम्हीं या वर्षी योग्य तिथी पाहून मुंज करण्याचें निश्चित केलें. येथें आम्ही ३१-३-५३ रोजीं आलों व १-४-५३ रोजीं मुलाची मुंज करून वडिलांनीं बोललेला नवस फेडला.

★

## (६) प्रार्थनेचा प्रभाव

अंतःकरणपूर्वक बाबांची मनोमनीं प्रार्थना केल्यानें मोठीं वाटणारीं संकटेंहि क्षुल्लक कशीं ठरतात याबद्दलचा श्री. रंगनाथ रावजी रणधीर (धंदा–सराफ–राहणारः ५ शुक्रवार, तुळशीबाग, पुणें नं. २) यांनीं सांगितलेला अनुभव खालीं देत आहों—

आमचे बंधू श्री. पी. बी. रणधीर हे शिर्डीस बाबांचे दर्शनास ता. २८-२-५३ रोजीं प्रथमच गेले होते. त्यांचेबरोबर कांहीं मित्र होते. प्रत्येकानें खर्चासाठीं म्हणून बरोबर स्वतःचे पैसे घेतलेच होते, पण कोणाजवळ किती पैसे आहेत याची एकमेकांस कल्पना नव्हती. मात्र प्रत्येकास वाटलें कीं एकमेकांजवळ पुरेसे पैसे आहेत. आमचे बंधू व त्यांचे मित्र बाबांचें दर्शन घेऊन परत कोपरगांव स्टेशनवर आले. त्यांना अहमदनगरला काम होतें म्हणून तेथें उतरावयाचें होतें. नंतर तेथून ते पुण्यास येणार होते. नगरचीं तिकटें काढण्यासाठीं म्हणून आमचे बंधूंनीं खिशांत हात घातला, तों पुरेसे पैसे नाहींत असें दिसून आलें. फारच थोडे पैसे त्यांचे खिशांत होते. म्हणून मित्रांजवळ मागितले, तर त्यांचीहि हीच स्थिती; त्यांच्या स्वतःच्या भाड्यापुरतेहि पैसे त्यांचेजवळ नव्हते, अगदींच कमी होते. त्यामुळें आतां नगरला कसें जावें ही चिंता त्या सर्वांस लागली. स्टेशनवर पैसे मागणार तरी कोणाजवळ? बरें शिर्डीस ही मंडळी पहिल्या-प्रथमच येत होती त्यामुळें कोणाची नुसती तोंडओळखहि नव्हती.

शेवटीं एकच उपाय राहिला आणि तो म्हणजे साईबाबांची प्रार्थना. आमचे बंधूंनीं मनांतल्या मनांत साईबाबांची अंतःकरणपूर्वक प्रार्थना केली. सुमारें ५।७ मिनिटांनीं प्रार्थना संपल्यावर त्यांना स्टेशनवर एक साधारण वयातीत असे गृहस्थ फेऱ्या घालतांना दिसले. हा वेळपावेतों ते गृहस्थ कांहीं आमचे बंधूस दिसले नाहींत. त्या गृहस्थांना पैशाबद्दल विचारावें असें आमचे बंधूंना वाटलें. पण ते गृहस्थ कांहीं ओळखीचे नव्हते. त्यामुळें विचारावें कीं न विचारावें अशा संभ्रमांत ते जरा वेळ पडले. शेवटीं बाबांचे नांव घेऊन त्यांनीं त्या गृहस्थांस विचारलें, 'आपण कोठें जाणार?'

'पुण्यास' असें त्या गृहस्थांनीं उत्तर देतांच आमचे बंधु त्यांना म्हणाले, 'आपण मला १५ रुपये उसने देऊं शकतां कां? माझें सराफी दुकान पुण्यास आहे. मी दुकानाचा पत्ता देतों. दुकानावर माझे बंधू रंगनाथ आहेत. मी त्यांना चिठ्ठी देतों. ती चिठ्ठी आपण दाखविल्यावर आमचे बंधू तुम्हांस ताबडतोब तुमचे १५ रु. देतील.' आश्चर्याची गोष्ट अशी कीं कांहींहि ओळखदेख नसतांना त्या गृहस्थांनीं कोणत्याहि तऱ्हेचा अनमान न आमचे बंधूस १५ रुपये ताडतोब काढून दिले. पुढें हे गृहस्थ आमचे दुकानीं आले व मीं त्यांना १५ रु. चिठ्ठीप्रमाणें दिले.

या अनुभवांत कदाचित् कोणाला कांहीं चमत्कार दिसणार नाहीं. परंतु खरी गोष्ट अशी आहे की, अगदीं परक्या ठिकाणीं, कांहींहि ओळखदेख नसतां, कोणत्याहि तऱ्हेचा अनमान न करतां अथवा शंकाकुशंका काढत न बसतां ताबडतोब १५ रुपये एखाद्या तिऱ्हाईत इसमास देणें ही कांहीं सामान्य गोष्ट नव्हे. अशा बाबतींत हमखास नकार मिळणें हीच सामान्य गोष्ट होय. परंतु बाबांची लीला मोठी विचित्र आहे. ते कोणास कधी काय प्रेरणा करून आपल्या भक्तांची काळजी दूर करतील हें सांगतां येत नाहीं, असेंच आम्हांस वरील अनुभवावरून वाटतें.

★

## (७) डॉक्टरनीं हार खाल्ली, पण बाबांनीं दया केली

श्री. आर्. वरदराज, राहणार-नं. ३-A, मुन्शी अकबर हुसेन रोड, तासकर टाऊन, बंगलोर नं. १, यांचा अनुभव :—।

'माझें लग्न १९४८ सालांत झालें. आम्हांस लवकर मूल झालें नाहीं व तशांत बायकोची तब्येत फार अशक्त म्हणून मीं तिला आमच्या शहरांतल्या नामवंत डॉक्टरांना दाखविलें. डॉ. जयराम, डॉ. देवराज, डॉ. थॉमस वगैरे तज्ज्ञ मंडळींनीं माझ्या बायकोची प्रकृति तपासून सांगितलें कीं तिचा गर्भाशय योग्य ठिकाणीं नाहीं; ऑपरेशन करून हा दोष सुधारणेंहि शक्य नाहीं; व तिच्या ह्या दोषामुळें आणि अशक्तपणामुळें तिला मुल होणें शक्य नाहीं. त्यांनीं सर्वसाधारण अशक्तपणाबद्दल कांहीं शक्तिवर्धक औषधें लिहून दिलीं, परंतु गर्भाशय योग्य ठिकाणीं येण्याबद्दल कोणतेंहि विशिष्ट औषध घेण्यास सांगितलें नाहीं किंवा त्याकरितां एखादें ऑपरेशन करून घ्यावें असेंहि सूचित केलें नाहीं. तेव्हां अर्थातच मी निराश झालों व सर्वस्वीं श्रीसाईबाबांवर भार टाकून त्यांची अत्यंत एकनिष्ठपणें प्रार्थना करण्यास प्रारंभ केला. प्रार्थना करण्यापूर्वी मीं बाबांस एवढेंच म्हटलें कीं, 'बाबा जर आम्हांस मूल झालें तर मी आपले दर्शनास शिर्डीस जरूर येईन.' बाबांचे कृपेनें आम्हांस ता. १९-८-१९५२ रोजीं मुलगी झाली व आज ता. १७-४-५३ रोजीं शिर्डीस बाबांचे दर्शनास बोलल्याप्रमाणें आलों आहें.'

★

## (८) आश्चर्यकारक अनुभव

**श्री.** आप्पा अनाप्पा मगदुम, गुरुवार पेठ, घ. नं. १३६९ मिरज, (जिल्हा–द. सातारा) यांचा अनुभवः—

'माझे वडील १९५० सालापासून कुरुपांच्या त्रासानें आजारी होते. डाव्या पायास कुरुपें होत होतीं. ह्या कुरुपांमुळें वडिलांना चालतांहि येत नसे. त्यांना फार दुःख होई. शेवटीं हा त्रास वाढत गेला तेव्हां १७ फेब्रुवारी १९५२ रोजीं डॅक्टरांनीं ऑपरेशन केलें. अदमासें १॥ इंच लांब व १॥ इंचें खोलीचें ऑपरेशन करून कुरुप काढून टाकलें. परंतु ४।६ महिन्यांनीं पुन्हां त्याच ठिकाणीं कुरुपें उद्भवलीं व दुसऱ्या जागींहि त्रास होऊं लागला. तेव्हां पुन्हां मी माझ्या वडिलांस डॉक्टरांकडे नेलें. डॉक्टरांनीं सांगितलें कीं आतां ऑपरेशनचा उपयोग नाहीं, कारण ऑपरेशन केलें तरी पुन्हां कुरुपें उद्भवतील. शिवाय वडिलही म्हातारे म्हणजे ६८।६९ वर्षांचे आणि सततच्या दुखण्यानें फार अशक्त झालेले. त्यामुळें यापुढें त्यांना ऑपरेशन सहन करणें शक्य होणार नाहीं, असें डॅाक्टर पुढें म्हणाले. त्यामुळें मी निराश झालों व काय करावें हें सुचेना. वडिलांचा त्रास बघून मला फार दुःख होई.

शेवटीं योगायोग म्हणा कीं बाबांची इच्छा म्हणा, आमचे एक स्नेही श्री. एन्. एस्. निकम हे नुकतेच शिर्डीस जाऊन आले होते. त्यांनीं आपलेबरोबर आणलेली साईबाबांची उदी–अगदींच थोडीशी–मला प्रसाद म्हणून दिली. ती उदी मीं वडिलांच्या कपाळास व अंगास लावली. आश्चर्य असें कीं माझ्या वडिलांना त्यामुळें फार आराम वाटला व कुरुपाचें दुःख पुष्कळसें कमी झालें. तेव्हां मी श्री. निकम यांना पत्ता विचारून बाबांची आणखी उदी शिर्डीहून मागविली. ती उदी मला ऑक्टोबर १९५२ मध्यें (पुण्यतिथीनंतरची) मिळाली. ती उदी मी माझे वडिलांस पाण्यांतून पाजण्यास सुरवात केली. ८ दिवसांत १२ आणे गुण आला; म्हणजे कळा, ठणका वगैरे अजीबात थांबल्या व १ महिन्यानें संपूर्ण दुःख थांबलें व कुरुपें आंतल्याआंत जळून जाऊन तेथली चामडी इतर चामडीसारखी झाली. कांहीं दोष राहिला नाही. ज्या वेळेस शिर्डीहून आलेली उदी मीं माझे वडिलांस पाजण्यास सुरवात केली त्यावेळेस मी बाबांस नवस केला होता कीं, माझे वडिलांस जर बरें केलेंत तर मी आपले समाधीचें दर्शन घेण्यास शिर्डीस येईन व तेथें आपल्या चरणांवर अभिषेक करीन; व हें जोंपर्यंत होणार नाहीं तोंपर्यंत मी अनवाणीच चालेन. बाबांचे कृपेनें माझ्या वडिलांचा पाय साफ बरा झाला व त्यांची आतां बाबांवर इतकी श्रद्धा बसली आहे कीं, ते रोज सकाळीं नियमानें पाण्याबरोबर बाबांची उदी घेत असतात. बाबांचेच कृपेनें माझें शिर्डीसहि येणें झालें व त्यांचे चरणांवर अभिषेक करून बोललेला नवस फेडला. आतां आजपासून (१८–४–५३) मी पायांत पुन्हां पायतण घालूं लागलों आहें.

★

## (९) सुलेमानचा नवस

**श्री.** सुलेमान अलिमहंमद, धंदा–कटलरी, (पत्ता–२८८, अब्दुल रहिमान स्ट्रीट, मुंबई नं. ३) यांनीं श्रीसाईप्रभावाचा खालील अनुभव ता. ३–५–५३ रोजीं सांगितला—

'सन १९४७ मध्यें मी श्री. शेख महंमद मुबारक यांच्या मालकिचें एक घर स्वतःस राहण्यासाठीं म्हणून विकत घेतलें. हल्लीं मी त्याच घरांत रहात आहें. सन १९५२ मध्यें मला असिस्टंट कस्टोडियन मुंबई यांजकडून विचारणा करण्यांत आली कीं, शेख महंमद मुबारक यांचा काय पत्ता आहे. आम्हांस त्यांची कांहीच माहिती नसल्यामुळें मीं असिस्टंट कस्टोडियन यांस कळविलें कीं, 'शेख महंमद मुबारक याचा पत्ता आम्हांस माहिती नाहीं व त्यांच्याबद्दलची कोणतीच माहिती आम्हांस नाहीं.' पुढें असिस्टंट कस्टोडियन यांनीं शेख महंमद यांस पाकिस्तानी नागरिक म्हणून ठरविलें व मीं त्यांचेकडून विकत घेतलेलें घर ही 'निर्वासित मालमत्ता' (Evacuee Property) ठरवून ती सरकारजमा केली आणि मला तें घर खालीं करण्याच्या हुकूम केला. वकिलामार्फत मीं सर्व पुरावे सादर केले व कायदेशीर रीत्या सर्व विधी होऊन हें घर मी शेख महंमद यांजकडून खरेदी केलें असल्याचें सिद्ध केलें. परंतु असिस्टंट कस्टोडियन यांनीं आमचे पुरावे ग्राह्य न धरतां मला तें घर ताबडतोब खालीं करून सरकारच्या ताब्यांत देण्यांस सांगितलें. शेवटीं मीं अपील केलें. अपीलाचा निकाल होईपर्यंत घर ताब्यांत राहूं देण्याची विनंती केली होती ती मान्य करण्यांत आली.

अपीलाची सुनावणी ता. ५।३।५३ला होती. कस्टोडियनपुढें अपील चाललें. सर्व पुरावे सादर करूनसद्धां व वकिलामार्फत केस लढवूनसुद्धां असिस्टंट कस्टोडियननें आमचे विरुद्ध निकाल दिला होता. त्यामुळें अपीलाचा निकाल काय होईल याबद्दल मनास चिंता वाटूं लागली. तेव्हां साईबाबांस नवस करण्याबद्दल कोणीतरी मला सांगितलें. त्याप्रमाणें मीं बाबांस नवस केला कीं, 'बाबा, जर अपीलाचा निकाल माझ्या बाजूनें झाला तर मी तुमच्या तुर्बतीस एक जरीचा गलेफ चढवीन.' बाबा माझ्या नवसास पावले व अपीलाचा निकाल माझ्या बाजूनें झाला. ही सर्व बाबांचीच कृपा होय याबद्दल माझी पूर्ण खात्री आहे. कारण जे पुरावे मीं पूर्वी सादर केले होते तेच याहि वेळेस होते. पूर्वींहि वकील होता आणि अपीलाचे वेळेसहि होता. पूर्वी निकाल माझ्या विरुद्ध गेला. पण मीं नवस करतांच बाबांची कृपा होऊन अपीलांत निकाल माझ्या बाजूनें झाला व मी शेख महंमद यांजकडून विकत घेतलेलें घर माझेंच ठरलें. नतर ता. २–५–५३ रोजीं मीं बाबांना गलेफ घालून बोललेला नवस फेडला.'

★

## (१०) संतकृपेविना दर्शनानुग्रह नाहीं

'**सं**तांच्या इच्छेशिवाय त्यांच्या दर्शनास जाणें कोणासहि शक्य नाहीं' असें श्रीसाईसच्चरित्रांत म्हटलें आहे (श्रीसाई स० ओ. ४८, अ० ३० .

या वचनाची प्रचीती आपणांस कशी आली याबद्दलची हकीकत श्री. मोरेश्वर विश्वनाथ देशपांडे (धंदा–रेल्वे नोकरी, राहणार–घन्ना मिस्त्रीची चाळ, खोली नं. ७, दुसरा माळा, मेथाजी मळा, भुसावळ–जिल्हा पू. खा.) यांनीं आपल्या खालील अनुभवांत सांगितली आहेः—

'आज (२१–४–५३ रोजीं) मी दुसऱ्यांदा शिर्डीस येत आहें. पहिल्यानें १९५० सालीं आलों. त्या वेळचा मी माझा अनुभव सांगत आहे. मला नुकतीच साईबाबांची माहिती कळली होती व माझ्या मित्रांपैकीं कांहींजण शिर्डीस जाऊनहि आले होते. त्यांनीं साईबाबांचें व शिर्डी स्थानाचें फार माहात्म्य मजजवळ वर्णन केलें. तेव्हां आपणहि एकदां शिर्डीस जाऊन बाबांच्या समाधीचें दर्शन घेऊन यावें असें मला वाटूं लागलें व त्याप्रमाणें मी माझ्या मित्रांजवळ बोललों. तेव्हां माझे मित्र म्हणाले, 'ही गोष्ट कांहीं आपल्या इच्छेवर अवलंबून नाहीं. बाबांचीच इच्छा असेल तरच आपलें शिर्डीस जाणें होऊं शकतें, नाहीं तर नाहीं.' मला ही गोष्ट खरी वाटेना. रेल्वेचें तिकिट काढून भुसावळला गाडींत बसायचें व मनमाडला गाडी बदलून कोपरगांवला उतरायचें आणि पुढें मोटारनें शिर्डीस सरळ जावयाचें. ही इतकी सहज व सोपी गोष्ट असतांना बाबांच्या इच्छेचा प्रश्न येतोच कोठें असा माझ्या मनांत विचार आला व मीं माझ्या मित्रांचें बोलणें थट्टेवारी नेलें. नंतर १।२ दिवसांत रजेचा व पी. टी. ऑर्डरचा अर्ज केला. रजा गुरुवारची घेतली होती. बुधवारीं रात्रीं निघून गुरुवारीं शिर्डीस जावें व तेथें दुपारची आरती करून मग लगेच परतावें आणि शुक्रवारीं कामावर हजर रहावें, असा बेत होता. माझ्याबरोबर माझ्या ऑफिसांतील स्नेही श्री. नाथ गोपाळ मोकाशी हेहि येण्यास तयार झाले, व त्याप्रमाणें त्यांनीं गुरुवारची रजाहि काढली. मीं प्रथम त्यांचे घरीं जावें व तेथून पुढें आम्ही दोघांनीं स्टेशनवर जावें असा आमचा बेत ठरला.

त्याप्रमाणें बुधवारीं रात्रीं मी त्यांचेकडे गेलों. ते तयारच होते. जरा वेळ गप्पागोष्टी करीत बसलों व गाडीची वेळ होण्याच्या सुमारास जाण्यास निघालों. श्री. मोकाशी यांनीं दाराबाहेर पाऊल टाकलें असेल नसेल तोंच त्यांचे कुटुंबानें त्यांना हांक मारिली. तेव्हां ते परत घरांत गेले व थोड्याच वेळांत बाहेर येऊन मला म्हणाले, 'देशपांडे, आज कांहीं आपल्याला जातां येणें शक्य नाहीं. माझ्या बायकोस फार त्रास होत असून गर्भपाताचा (Abortion) संभव आहे. तुमच्याहि मदतीची मला जरूर आहे; कारण तिला आतां हॉस्पिटलमध्येंच नेणें भाग आहे. तेव्हां तुम्हीहि जाऊं नका.' तेव्हां मला माझा जाण्याचा बेत अर्थातच रद्द करणें भाग पडलें; कारण मित्राचें मन मोडवेना. या सर्व घटनेचा जेव्हां मी मनांत विचार करूं लागलों तेव्हां बाबांच्या लीलेचें मला कौतुक वाटलें व 'बाबांची इच्छा असेल तरच त्यांचे दर्शनास जाणें शक्य होतें, एरव्हीं नाहीं' या गोष्टीची मला पुरेपूर खात्री पटली.

★

## (११) अखेर बाबांनी अनुग्रह केला

**श्री.** मोरेश्वर विश्वनाथ देशपांडे, भुसावळ, यांचा दुसरा अनुभव—

'बाबांचीच इच्छा असेल तर ते आपल्या भक्तास त्यांच्या येण्याच्या मार्गातील अडथळे दूर सारून आपल्या दर्शनास कसें खेचून आणतात यांचीहि प्रचीती वरील प्रसंगानंतर अवघ्या ८ दिवसांतच मला आली. माझी पी.टी.ऑर्डर १४ दिवस चालत असल्यामुळें अजून वापरतां येण्याजोगी होती म्हणून मीं पुढील गुरुवारीं पुन्हां सुट्टी घेतली व बुधवारीं रात्रीचे गाडीनें भुसावळहून निघालों. या वेळेस मी एकटाच होतों. कोपरगांवास गुरुवारीं सकाळींच आलों. गाडींतून उतरल्यावर शौचास लागल्यामुळें शौचास गेलों व नंतर तोंड धुऊन रेल्वेचे फाटकाबाहेर येतों तों कोणतेंच वाहन दिसेना. चौकशी करतां लोकांनीं सांगितलें कीं, शिर्डीस फक्त एकच मोटार जाते व ती आतां निघून गेली; आतां शिर्डीस जाणें दुरापास्त आहे. इतक्यांत एका बाजूस एक टॅक्सी उभी असलेली मला दिसली. तेव्हां मी धांवतच तिकडे गेलों. परंतु टॅक्सींत बसलेल्या लोकांनीं सांगितलें कीं ती टॅक्सी रिझर्व्ह केलेली आहे. 'मी एकटाच आहें. शिर्डीचें जें काय योग्य भाडें असेल तें देण्यास मी तयार आहें, आपणही शिर्डीसच जात आहात तेव्हां मलाही न्यावयास तुम्हांस हरकत नाहीं, मी कांहीं तुम्हांस जड नाहीं,' वगैरे नाना तऱ्हेनें मनधरणी करून मीं त्यांना मला घेऊन जाण्याबद्दल विनविलें. परंतु त्यांनीं नकार दिला, व ती टॅक्सी निघून गेली. तेव्हां मी स्टेशनवर परत आलों. दुपारीं परत मोटार येणार होती असें कळलें. पण त्या मोटारनें जाऊन दुपारची आरती सांपडणें शक्य नव्हतें, व संध्याकाळच्या गाडीनें कोपरगांवाहून मनमाडास जाण्यास निघणें जरूर होतें, कारण त्या गाडीनें गेलें तरच शुक्रवारीं कामावर हजर रहाणें शक्य होतें. त्यामुळें आतां आपलें शिर्डीस जाणें होत नाहीं असें वाटून मला फार वाईट वाटलें. इतक्यांत एक रिकामी मोटार लॉरी रेल्वे फाटकाजवळ येऊन उभी राहिली. मी तिकडे ताबडतोब गेलों व ड्रायव्हरास ही लॉरी शिर्डीकडे जाते का म्हणून विचारलें. त्यानें नाहीं म्हणतांच पूर्ण निराश होऊन परत प्लॅटफॉर्मकडे वळलों. या वेळेस मात्र अत्यंत अंतःकरणपूर्वक मीं बाबांस मनांत म्हटलें, 'बाबा, तुम्हीच मला येथपर्यंत आणलेंत आणि आतां तुमचें दर्शन घडविल्याशिवाय मला तुम्हीं परत पाठवित आहांत. मी जास्त काय बोलणार? जशी तुमची इच्छा! माझ्या मनांत मात्र तुमचें दर्शन घ्यावें असें फार आहे.' इतकें मी मनांत म्हणतों आहे तोंच त्या लॉरी ड्रायव्हरनें मला परत बोलावलें व कुठें जायचें आहे म्हणून विचारलें. शिर्डीस जावयाचें आहे म्हणून मीं उत्तर दिलें. तेव्हां त्यानें मला 'तुम्हीं केव्हां आलांत, तुम्हांस मोटार कशी मिळाली नाहीं,' वगैरे बरेच प्रश्न विचारले. मीं त्यास सर्व खरी हकीगत सांगितली. तेव्हां त्याला काय वाटलें कोण जाणे, अथवा बाबांनींच प्रेरणा केल्यामुळें की काय, त्यानें मला आपले-जवळ बसण्यास सांगितलें आणि मी लॉरींत चढतांच त्यानें लॉरी भरधाव शिर्डीकडे सोडली. थोड्याच वेळांत नदीच्या पुलाजवळ लॉरीनें टॅक्सीस गांठलें व खुणेनें त्यानें

टॅक्सी थांबविली. नंतर खालीं उतरून त्यानें टॅक्सींतील लोकांस काय म्हटलें कोण जाणे, पण जे लोक मीं कितीही विनवणी केली तरी मला घेऊन जाण्यास तयार नव्हते तेच आतां मला त्यांचे टॅक्सींतून शिर्डीस घेऊन जाण्यास तयार झाले. मग लॉरी ड्रायव्हरच्या सांगण्यावरून मी खालीं उतरलों व टॅक्सींत जाऊन बसलों. लॉरी ड्रायव्हरास मी पैसे देऊं लागलों पण त्यानें ते न घेतां तो तसाच कोपरगांवकडे परतला. नंतर टॅक्सींतून मी शिर्डीस आलों व बाबांचें दर्शन अत्यंत आनंदांत घेतलें. पुढें दुपारची आरतीही साधली; व नंतर भोजनगृहांतून बाबांचा प्रसाद घेऊन मी परतलों. अशा चमत्कारिक रीतीनें व सर्व अडथळे आपल्या लीलेनें सहज दूर सारून बाबांनीं मला त्या वेळेस प्रथमच शिर्डीस आणलें."

★

## (१२) दुःखहर्ते श्रीसाई

श्री. रंगनाथ पांडुरंग पाटील (पत्ता–मु. व पोष्ट वारी, तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर) यांचा अनुभव–

'पूर्वी मी फॅारच नास्तिक मताचा होतों. माझा कोणत्याच देवावर विश्वास नव्हता. परंतु सुमारें चार वर्षांमागें माझ्या पाठीस जी संकटपरंपरा लागली तिनें मी अगदीं जिकीरीस आलों. तशांत माझ्या मुलीचें लग्न होईना. फार खटपट केली; परंतु व्यर्थ! ह्या खटपटीपायीं सुमारें ८।९ शें रुपये खर्च झाले. तेव्हां मुलीचें लग्न कसें होईल याची रात्रंदिवस काळजी वाटूं लागली. इतकें होतें तरी कोणत्या तरी देवास भजावें, नवस करावा, असें कांहीं वाटेना. कारण असल्या गोष्टींवर विश्वासच नव्हता. परिणाम असा झाला कीं माझें मानसिक समाधान नष्ट झालें. चित्तास शांति लाभेना. अशा स्थितींत दैवयोगानेंच येवल्याचे एक साईभक्त श्री. तिलकचंद यांची गांठ पडली. त्यांना मीं माझीं सर्व संकटें सांगतांच त्यांनीं मला धीर देऊन बाबांची माहिती सांगितली व साईबाबा तुमचीं सर्व संकटें एका वर्षांत दूर करतील असें आश्वासन दिलें. नंतर त्यांनीं माझ्या मुलीस रोज साईस्तवन मंजरी वाचण्यास सांगितलें व मला शिर्डीस जाऊन बाबांचें दर्शन घेण्यास सांगितलें.

'त्याप्रमाणें मी शिर्डीस प्रथमच बाबांचे दर्शनास तेव्हां गेलों. नंतर नियमितपणें जाऊं लागलों. बाबांना मीं माझी संकटें सांगत असेंच. माझी मुलगीही स्तवनमंजरी रोज नियमानें वाचीत असे. एके दिवशीं मी समाधिमंदिरांत बसलों असतांना मला कांहीं एक विशेष प्रकारचा उल्हास वाटूं लागला व त्याच दिवशीं बाबांची दुपारची आरती चालू असतांना समाधीवर ठेवलेल्या बाबांच्या फोटोंत मला बाबा न दिसतां त्या ठिकाणीं मला दत्तात्रेयांची मूर्ती दिसली व नंतर शंकराचीही मूर्ती दिसूं लागली. त्यामुळें बाबांवरील माझी श्रद्धा वाढली. पुढें १ वर्षाचे आंतच माझ्या मुलीचें लग्न झालें व माझीं सर्वच संकटें नाहींशीं झालीं. आतां मी बाबांचा अंधभक्त झालों आहे असें म्हटल्यास हरकत नाहीं. जेव्हां बाबा आणतात तेव्हां त्यांचे दर्शनास मी अजूनही येतों.'

★

## (१३) संतसेवेचा प्रभाव

श्री. वसंत हरिश्चंद्र चुरी, (राहणार–माधवनिवास, ३१२ कॅडेल रोड, कॅडेल रोड पोष्ट ऑफिस जवळ, दादर, मुंबई नं. २८), यांचा अनुभव :—

'मला साईबाबांची माहिती जरी बरेच वर्षांपासून होती तरी आषाढ १९५० पासूनच मी त्यांचेकडे विशेष आकर्षला गेलों, व त्यांच्यावर माझी श्रद्धा जडली. घरांत बाबांचा फोटो होताच. १९५१ मध्यें माझे मेव्हणे श्री. आत्माराम व्ही. नाईक हे शिर्डीस बाबांचे दर्शनास कुटुंबासह गेले होते. परत येतांना त्यांनीं तेथला उदीप्रसाद आणला व तो घेण्यासाठीं त्यांनीं मला बोलावलें. तेव्हां त्यांचेच बरोबर मी त्यांचे घरीं दुपारीं ११॥ चे सुमारास गेलों. भितीशीं टेंकून बसलों. जरा अंधार पडल्यासारखा वाटला म्हणून सहज समोरच्या खिडकीकडे पाहिलें तों एक साईबाबांसारखा वेष (डोकीला फडकें, कफनी वगैरे) धारण केलेला फकीर खिडकींत उभा असलेला दिसला. त्याचे हातांत भिक्षेचा एक कटोरा होता. तो त्यानें वर धरला होता. त्याला पाहतांच प्रत्यक्ष साईबाबांनाच पाहिल्यासारखें वाटलें. आमच्या मेव्हण्यांस तर फार आनंद झाला. त्यांनीं लगेच आपले कोटाचे खिशांत हात घातला, तों त्यांत फक्त तीन पैसे निघाले; व सुद्धां त्यांनीं शिर्डीची यात्रा करण्यापूर्वी जे पैसे बरोबर घेतले होते त्यांतलेच उरले होते. आणखी पैसे नव्हते. हे उरलेले पैसेही भिक्षेच्या रूपानें मागण्यासाठींच बाबा आपणांकडे आले असें वाटून अत्यंत आनंदानें त्यांनीं ते तिन्ही पैसे त्या कटोऱ्यांत टाकले. व त्यांनीं नमस्कार केला. लगेच मींहि कांहीं दक्षणा त्या कटोऱ्यांत टाकली व नमस्कार केला. त्याबरोबर बाबांनीं स्मित केलें व ते निघून गेले. इतक्यांत मला आठवण झाली कीं माझ्या बहिणीनें त्या फकिरास–आम्ही त्यांना बाबाच समजतों–नमस्कार करण्याचें राहून गेलें. म्हणून मेव्हण्यांनीं लगेच आपले मुलास त्या फकिरास बोलावण्यास पाठविलें. आमच्या अंदाजाप्रमाणें फकिरबाबा फार तर १०।१५ पावलेंच पुढें गेले असतील असें वाटलें. परंतु त्या मुलानें आजुबाजूस व जरा लांबवर शोधूनही त्या फकिराचा शोध लागला नाही. ते एकदम गुप्त झाल्यागत नाहींसेच झाले.

'या अनुभवाची अशी प्रचीती आली कीं आमचे मेव्हण्यास कांहीं कल्पना नसतां एक फार वरच्या दर्जाची ग्रेड मिळाली व पगारही अर्थातच वाढला. माझ्याही बाबतींत अनुभव आला. तो असा कीं, आमच्या घरांतील नातेवाईक मंडळीमध्यें भांडणांमुळें (पैशाच्या व देण्याघेण्याच्या वरून) आलेली कटुता व असंतोष आपोआप नाहींसा झाला व समाधान खेळूं लागलें. त्यानंतर मी स्वतः १९५२ मध्यें शिर्डीस बाबांचे दर्शनास प्रथमच गेलों व त्यानंतर आतां दुसऱ्यांदा पुन्हां आलों आहे.'

★

## (१४) बाबांच्या अतर्क्य कृपेची नवलकथा

बाबांची आपणांस कांहींच माहिती नसतांना बाबांनीं एका फकिराच्या रूपानें १९२६ सालींच दर्शन देऊन आपणांवर कशी कृपा केली, याची हकीकत श्री. शंकरराव

एकनाथ निकम (पत्ताः—गुजराथ मित्र प्रेस, लक्ष्मीभुवन, सुरत) यांनीं आपल्या खालील अनुभवांत सांगितली आहेः—

'१९२६ सालची गोष्ट. त्या वेळेस मी चौटाबझारमधून जात होतों. वेळ दुपारची होती. एक फकीर—डोक्याला फडकें बांधलेलें, लांब कफनी, व दाढी वाढलेली—मजजवळ आला आणि हिंदींत म्हणाला, 'पान खाऊं घालतोस का?' मी लहानपणापासूनच देवभोळा असल्यामुळें कोणी कांहीं मागितल्यास व तें सहज देतां येण्यासारखें असल्यास मी कोणासही विन्मुख पाठवीत नसें. त्यामुळेंच या फकीरबाबानें साधें पान मागतांच मीं कांहींच अनमान न करतां त्यास पान खाऊं घातलें. नंतर दोन दिवसांनीं त्यांची व माझी पुन्हां त्याच ठिकाणीं भेट झाली. त्या वेळेस त्यांनीं पुन्हां मजकडून पान मागून घेतलें व तें खाल्ल्यावर एक गोल दगड दिला. त्यावर सर्पाकृती होती. त्यांनीं हा दगड खिशांत ठेवण्यास सांगितलें. नंतर त्यांनीं पुन्हां मजजवळून पान मागून घेतलें व ते निघून गेले.

'हा दगड मिळाल्यापासून मला किरकोळ खर्चाची उणीव भासली नाहीं. खिशांत नेहमींच कांहीं ना कांहीं तरी पैसे राहूं लागले. त्यामुळें किरकोळ खर्चासाठीं घरांतून पूर्वी जे मी पैसे मागत होतों ते मीं आतां मागत नसें. याचा अचंबा माझ्या थोरल्या बहिणीस वाटून तिनें मला याचें कारण विचारलें. मीं तिला फकीरबाबानें दिलेल्या दगडाची हकीगत सांगतांच तिनें तो दगड पाहण्यासाठीं म्हणून मागितला. तेव्हां तो दगड मीं तिला दिला. वेळ रात्रीची होती, म्हणून सकाळीं उजेडांत तो चांगला पाहूं असें म्हणून तिनें तो दगड लहान पिशवींत घालून आपल्या उशीखालीं ठेवला व त्यावर ती झोंपली. सकाळीं उठून पाहते तों दगड पिशवींत नाहीं. खूप शोधलें, पण सांपडला नाहीं.

'मग २।३ आठवड्यांनीं ते फकीरबाबा पुन्हां पूर्वीच्याच ठिकाणीं पुन्हां भेटले. त्यांचा माझा पूर्वजन्मींचा काय ऋणानुबंध होता कोणास ठाऊक त्यांनीं माझ्याजवळ पुन्हां पान मागितलें व मीं तें त्यांना देतांच ते आपणहून मला म्हणाले, 'काय दगड हरवलास ना?' तेव्हां मीं त्यांना सर्व हकिगत सांगितली. 'वडिल बहिणीचा मान राखलास हें चांगलेंच केलेंस' असें म्हणून त्यांनीं मला एक लाल मणी दिला व सांगितलें कीं, 'याला सांभाळून ठेव; तुला कांहीं कमी पडणार नाहीं. तुझें लग्न होईल. पहिली मुलगी होईल. ती ८ महिन्यांची होऊन मरेल. तिच्या गळ्यांत हा मणी बांधूं नकोस. मग मुलगा होईल, त्याचे गळ्यांत हा मणी बांध व मग सर्व ठीक होईल.' नंतर फकीरबाबा निघून गेले.

'मणी मिळाल्यापासून पुन्हां पैशाची चणचण बंद झाली. पुढें १९३८ मध्यें माझें लग्न झालें व १९४० मध्यें मला मुलगी झाली. तेव्हां माझ्या आईस फकीरबाबानें दिलेल्या मण्याची आठवण झाली. तो मणी आम्ही रेशमी फडक्यांत गुंडाळून एका डब्यांत ठेवला होता. आईस वाटलें कीं, हा मणी जर मुलीच्या गळ्यांत बांधला तर मुलगी मरणार नाहीं म्हणून तिनें तो मणी काढण्याकरतां म्हणून डबा उघडला. पण रेशमी वस्त्र उलगडतांच आंत मणी नाहीं! तेव्हां तिला मोठा धक्का बसला व तिनें पुष्कळ

शोधून पाहिलें. पण मणी कांहीं तिला दिसला नाहीं किंवा आम्हांसही दिसला नाहीं. म्हणून पुन्हां तें रेशमी वस्त्र जसेंच्या तसेंच गुंडाळून डब्यांत ठेवलें. पुढें मुलगी ७ महिन्यांची होऊन ८ व्या महिन्यांत वारली. नंतर पुढें मला मुलगा झाला. त्या वेळेस तो मणी पाहतां डब्यांतील त्या रेशमी वस्त्रांतच सांपडला. आम्हांस फार आश्चर्य वाटलें. नंतर तो मणी मुलाचे गळ्यांत घातला. ह्या वेळेपासून धंद्यांत माझी प्रगती झाली व आर्थिक परिस्थितिही सुधारली.

'सुमारें दोन वर्षांपूर्वी आमच्या भावाचे एक पार्शी मित्र श्री. डी. डी. ताडीवाला हे शिर्डीस जाऊन आले व त्यांनीं समाधिमंदिरांत जसा बाबांचा फोटो आहे तसा एक फोटो आम्हांस भेट देण्यासाठीं म्हणून आणला. त्या फोटोंतील बाबांना पाहतांच मला पूर्वींच्या फकीरबाबांची आठवण झाली. ते फकीरबाबा म्हणजे दुसरे तिसरे कोणी नसून साईबाबाच होत, याची मला मनोमनीं खात्री पटली; व शिर्डीस जाऊन बाबांचें दर्शन घेण्याची मला फार आतुरता लागली. तो योग प्रथम १९५२ मध्यें आला. आतां पुन्हां एप्रिल १९५३ मध्यें मी त्यांचे दर्शनास आलों आहे. बाबांच्या कृपेनें आम्ही सर्व सुखी आहोंत व आम्हांस कांहीं कमी नाहीं.'

★

## (१५) ही इच्छा बाबांची

श्री. यशवंत गोविंद सुळे, अकौंटंट, युनायटेड कमर्शिअल बँक लि., नौसारी, (राहण्याचा पत्ता–गोविंदभुवन, चिमणाबाई रोड, नौसारी, जिल्हा सुरत) यांचा अनुभवः—

'मला बाबांची नुकतीच माहिती झाली होती. त्यांचा फोटो आणून मी घरांत ठेवला होता व त्या फोटोस नियमानें हार घालीत असें. पुढें मला शिर्डीस जाऊन बाबांच्या समाधीचें दर्शन घेण्याची इच्छा उत्पन्न झाली. परंतु जाणें जमेना. कारण पैशाचा अभाव. मी जरी बँकेंत नोकर आहें तरी आमच्या रोजच्या प्रपंचास पुरेल इतकीच माझी मिळकत आहे. मी लोकांची कांहीं खाजगी कामें पण करतों. असेंच एक काम केल्याबद्दल मला जरा अपेक्षेपेक्षां जास्त रकम मिळाली. तेव्हां बाबांनीं भाड्याची सोय वगैरे करण्यासाठींच म्हणून एवढे पैसे दिले असें मला वाटलें व म्हणून त्या पैशांत मीं शिर्डीस जाण्याचा विचार केला. परंतु त्या वेळेस मीं शिर्डीस जावें अशी बाबांची इच्छा नव्हती. कारण ते पैसे कांहीं ना कांहीं सांसारिक अडचणी येऊन संपून गेले. ह्याच सुमारास आम्हांस बोनस मिळणार होतें; पण तेंही मिळालें नाहीं. तेव्हां मला फार वाईट वाटलें व आपण बाबांशीं प्रतारणा केली असें सारखें वाटूं लागलें. त्यामुळें चित्ताची अस्वस्थता फार वाढली. अशा स्थितींत एक दिवस मला काय वाटलें कोणास ठाऊक, मी बाबांच्या फोटोसमोर उभा राहिलों आणि म्हणालों कीं, शिर्डीस गेल्याशिवाय मी कांहीं सुपारी खाणार नाहीं.

'त्यानंतर थोड्याच दिवसांनीं पुन्हां एकदां एक अचानक खाजगी काम मिळालें व त्याचे पैसे २५ एप्रिलला हातीं पडले. ह्या वेळेस कल्पनेपेक्षांही जास्त पैसे मिळाले. तेव्हां

मी तावडतोब शिर्डीस येण्यास निघालों. येथें २८-४-५३ रोजीं आलों व बाबांच्या समाधीचें दर्शन घेतलें व नंतर सुपारी खाण्यास सुरवात केली.

'बाबांवरच पूर्ण भार टाकल्यामुळें माझें येथें येणें झालें, असें मला खात्रीपूर्वक वाटतें. एकंदरींत बाबा नवसास पावतातच ह्यांत शंका नाहीं.

★

## (६) श्रीसाईंचें दर्शन

श्री. द. वि. गुते (पत्ता–प्रभा प्रेमायसेस, शान्ता वाडी, अंधेरी, मुंबई) यांचा अनुभव :—

'माझ्या चुलत बंधूंची पत्नी सौ. मनोरमाबाई महादेव गुते (जदुयास, किंग्ज सर्कल, माटुंगा) यांचा सुमारें दीड वर्षापूर्वीचा अनुभव असा आहे—

'सौ. मनोरमाबाईंची कन्या सौ. मालती राजे या प्रथम अपत्याच्या वेळीं माहेरीं माटुंग्यास आल्या होत्या. लग्नापूर्वीही तिची साईबाबांवर श्रद्धा होती. प्रसूतीनंतर मुलगा झाला. त्याच्या उशाशीं सतत उदीची पुडी ठेवणें व त्याचे तोंडांत उदी अधून मधून घालणें असा चि. सौ. मालतीचा क्रम होता.

'एके दिवशीं सौ. मनोरमाबाई (सौ. मालतीची आई) रागानें म्हणाली, "साईबाबा, साईबाबा, अष्टौप्रहर काय लावलं आहेस? नि त्या पोराच्या तोंडांत विभूती काय सारखी घालतेस?' सौ. मालतीनें कांहींच उत्तर दिलें नाहीं. ती चूप बसली.

'त्याच संध्याकाळीं दिवेलागणीची वेळ होती. ब्लॉकमध्यें फक्त सौ. मनोरमाबाईच होत्या. इतर सर्व मंडळी बाहेर फिरावयास गेलेली. अशा वेळीं ब्लॉकचा दरवाजा कुणी तरी उघडल्याचा भास झाला. गॅलरींत उभ्या असलेल्या सौ. मनोरमाबाईंनीं मागें वळून पाहिलें. ब्लॉकचा दरवाजा बंद, परंतु कुणी तरी कफनी पेहेरलेला शुभ्र दाढीवाला अन् डोक्यास फडकें गुंडाळलेलें अशा वेषांतील फकीर उभा राहिलेला पाहिला. त्याला पाहून सौ. मनोरमाबाईंच्या अंगावर रोमांच उभे राहिले. त्यांच्या तोंडून शब्द फुटेना. दरवाजा उघडल्याचा आवाज झाला, परंतु दरवाज्यास कडी; अन् हा फकिर आला कोठून? अवघीं ८।१० सेकंद त्या उंच शुभ्र दाढीधारी व्यक्तीकडे सौ. मनोरमाबाई स्तिमित नजरेनें पहात आहेत तोंच ती मूर्ति अन्तर्धान पावली! सौ. मनोरमाबाईंनीं दिव्याचें बटन दाबलें व ब्लॉकमध्यें प्रकाश पडला. क्षणभर त्या प्रकारानें त्यांचें मस्तक सुन्न झालें. त्या स्वयंपाकघरांत गेल्या. स्वयंपाकघरांत चि. सौ. मालती पूजन करीत असलेल्या श्रीबाबांच्या फोटोकडे नजर गेली. होय, तीच मूर्ति! तेच डोळे, तीच शुभ्र दाढी अन् कफनी! सौ. मनोरमाबाईंना सकाळची आठवण झाली व त्यांनीं क्षमायाचनापूर्वक बाबांच्या फोटोला नमस्कार केला.

'अजूनही त्या प्रसंगाची आठवण निवेदन करतांना त्यांच्यावर अंगावर कांटा येतो, डोळ्यांत अश्रू उभे राहतात. या वर्षाच्या आरंभींच त्या शिरडीस गेल्या. आतां त्यांची श्रद्धा वाढत आहे.

★

## (१७) कृपासागर बाबा

श्री. विठ्ठलराव मराठे, शिर्डी संस्थानचे गवई, यांचा अनुभव :—

'१९३५ सालापासून शिर्डी संस्थानांत मी 'गवई' म्हणून काम करीत आहें. तसेंच कीर्तनाचेंहि काम मजकडेच आहे. त्या वेळेस कै. बा. वि. देव हे संस्थान व्यवस्थापक समितीचे एक विश्वस्त होते. ते मला दत्तजयंती उत्सवांत कीर्तनाची साथ करण्याकरतां म्हणून सातारजवळील शिरवळ या त्यांच्या गांवीं दरवर्षी नेत असत. शिरवळ येथें एकमुखी दत्ताचें देऊळ असून त्या ठिकाणीं दत्तजयंतीचा उत्सव मार्गशीर्ष शुद्ध १४ स होत असतो.

'शिरवळास दरवर्षी जावें लागत असल्यामुळें शिर्डी संस्थानांत दत्तजयंतीनिमित्त होणाऱ्या कीर्तनास मला हजर रहातां येत नसे. शिर्डी येथें, इतर सर्वत्र ठिकाणच्याप्रमाणें दत्तजयंतीचें कीर्तन मार्गशीर्ष शु. १५ स होई. परंतु शिरवळ येथेंच, माझें ५।६ दिवस राहणें होई व त्यामुळें शिर्डी येथील दत्तजयंतीचें कीर्तन बाहेरच्या अथवा स्थानिक माणसाकडून करवून घेण्यांत येई. ही गोष्ट संस्थान व्यवस्थापक समितीचे दुसरे एक विश्वस्त कै. भाऊसाहेब धुमाळ यांना आवडत नसे. त्यांचें म्हणणें असें कीं, दत्तजयंतीसारख्या प्रसंगीं संस्थान–गवयानें संस्थान सोडून बाहेर जाऊं नये. आणि या आग्रहांतूनच माझ्यावरील संकट निर्माण झालें.

'१९३८ सालची गोष्ट. दरवर्षाप्रमाणें: कै. बा. वि. देव यांचे सांगण्यावरून शिरवळास जाण्याकरतां म्हणून मीं संस्थानांत रजा मागितली. पण त्या वेळचे संस्थानचे सन्माननीय चिटणीस श्री. सुंदरराव नवलकर, यांनीं कै. भाऊसाहेब धुमाळ यांचे सांगण्या वरून माझी रजा मंजूर केली नाहीं. तेव्हां श्री. देवांनीं नवलकरांशीं पत्रव्यवहार करून त्यांना कळविलें कीं, मार्गशीर्ष शुद्ध १४ स विठ्ठलरावांना शिरवळच्या दत्तजयंतीच्या उत्सवास हजर राहूनही शिर्डी येथें मार्गशीर्ष शुद्ध १५ स दत्तजयंती-निमित्त होणाऱ्या कीर्तनास हजर राहणें शक्य होईल. कारण शिर्डी येथें दत्तजयंतीचें कीर्तन रात्रीं १० वाजतां होतें व शिरवळाहून सकाळच्या ७ च्या मोटारीनें निघाल्यास विठ्ठलरावांना शिर्डी येथें संध्याकाळीं ७।८ चे सुमारास पोंचतां येईल. त्या वेळेस शिरवळाहून सकाळीं ७–७॥ ला निघणारी मोटार ११–११॥ चे सुमारास पुण्यास पोंहचे व तेथून लगेच नगरास जाणारी एक मोटार निघे. ती नगरास दुपारीं २ चे सुमारास येई. नगरहून शिर्डीस जाण्याकरतां एक सर्व्हिसची मोटार ३॥ चे सुमारास निघे व ती शिर्डीस संध्याकाळीं ७–७॥ चें सुमारास येई. (ह्या दुपारच्या मोटारीनंतर नगरहून शिर्डीस जाण्याकरतां दुसरी कोणतीही मोटार नव्हती. स्पेशल मोटार केल्यास गोष्ट वेगळी.) श्री. देवांनीं एवढें लिहिल्यावर चिटणिसांनीं माझी रजा मंजूर केली; पण त्याचबरोबर 'शिर्डी येथील कीर्तनास तुम्हीं हजर असलेंच पाहिजे' अशी समज दिली आणि कळविलें कीं, भाऊसाहेब धुमाळही त्या वेळेस तेथें येणार आहेत व ते स्वतः कीर्तनास हजर राहणार आहेत.

'पुढें मी शिरवळास गेलों व नेहमीप्रमाणें तेथील दत्तजयंतीच्या उत्सवांत देवांच्या कीर्तनास गाण्याची साथ केली. दुसरे दिवशीं म्हणजे मार्गशीर्ष शुद्ध १५ स सकाळच्या ७ च्या मोटारीनें निघावें म्हणून मी लवकरच मोटारस्टँडवर गेलों. पण काय देवगति पहा! रोज ७-७॥ ला निघणारी मोटार त्या दिवशीं ९॥ चे सुमारास स्टँडवरून हलली; म्हणजे सुरवातीसच २ तास उशीर झाला. ती मोटार पुण्यास १२॥ चे सुमारास पोंचली. पण पुण्याहून नगरास जाणारी मोटार अगोदरच आपल्या ठराविक वेळेवर निघून गेली होती. दुसरी एक मोटार १॥ चे सुमारास निघणार होती. पण मला काळजी वाटूं लागली. कारण नगराहून शिर्डीस जाणारी मोटार मिळणें जवळ जवळ अशक्यच होय असें मला वाटूं लागलें. तरी पण एखाद्या क्षणीं वाटे कीं, कांहीं तरी चमत्कारिक घटना घडून नगराहून शिर्डीस जाणारी मोटार आपणास मिळेल. अशा विचारांच्या आंदोलनांत असतांनाच बाबांच्या एक भक्त श्रीमती दुर्गाबाई काफतकर ह्या मला सहजगत्या भेटल्या. त्यांनीं तेवढ्यांत एका करंड्यांत हार व पेढे घालून तो करंडा मजजवळ दिला आणि त्या वस्तू साईदेवांना अर्पण करण्याबद्दल मला सांगितलें. तेव्हां मी त्यांना म्हणालों, 'आतांच फार उशीर झाला आहे व नगराहून शिर्डीस जाणारी मोटार मिळणें बहुतेक अशक्यच आहे. त्यामुळें कदाचित मला नगरासच आजचा मुक्काम करावा लागतो कीं काय समजत नाहीं.' त्यावर त्या म्हणाल्या, 'छे, छे! काळजीचें कारण नाहीं. आज दत्तजयंती आहे. बाबा हा हार आजच घेतील. माझा पूर्ण आत्मविश्वास आहे.' आणि त्यांनीं तो हार व पेढे यांनीं भरलेला करंडा मजजवळ दिलाच.

'पुण्याहून नगरास निघणारी मोटार १॥ ला तर निघाली नाहींच, पण २ लाही नाहीं. २॥ चे सुमारास ती एकदांची हलली. परंतु वाटेंत तिच्यांत कांहीं पोलीस चढले व त्यांना गुन्ह्याबाबत कांहीं तातडीची चौकशी करावयाची असल्यामुळें त्यांनी ती मोटार तळेगांवास (दाभाडें) नेली, त्यामुळें आणखीनच दीडएक तासाची खोटी होऊन शेवटीं ती मोटार नगरास ८ वाजतां आली. कसा तरी मोटारींतून खालीं उतरलों. कारण आमच्या नोकरीची इतिश्री माझ्या डोळ्यांसमोर दिसूं लागली. हातपाय गळून गेले. शिर्डीस जाण्याकरितां नगराहून ४ वाजतां निघणारी कचरू ड्रायव्हरची मोटार केव्हांच निघून गेली होती आणि शिर्डीस दुसरी सर्व्हिसची अशी कोणतीही मोटार नव्हती. अवघे २ तास! पण त्या दोन तासांचा विचार येतांच माझें डोकें सुन्न होऊन गेलें. शिर्डीचें चित्र माझ्या डोळ्यांसमोर राहिलें. 'मंदिरांत कीर्तनास गर्दी जमलेली आहे. कीर्तनाचा सारा साज सज्ज आहे. भाऊसाहेब धुमाळ हे मधूनच दरवाजाकडे तर मधूनच मंदिरांत असलेल्या घड्याळाकडे पहात आहेत, आणि तें घड्याळ भाऊसाहेबांना आपला लांब हात झरझर फिरवून सांगत आहे, 'पहा, दहा वाजायला आले.' त्याबरोबर भाऊसाहेब शेजारच्या माणसास म्हणतात, 'चला, कीर्तनास उभे राहण्याची तयारी करा. विठ्ठलराव आतां कांहीं येत नाहींत. मी त्यांना काढून टाकण्याचा आतांच रिपोर्ट करतों.' हें चित्र डोळ्यांसमोर उभें राहिलें मात्र, माझे पाय लटलटूं लागले. परंतु कुठें तरी मुक्कामास

जाणें जरूर होतें. तेव्हां श्री. नानासाहेब बागडे यांचे घरीं मुक्काम करावा असें ठरवून कसें तरी हमालाच्या डोक्यावर सामान चढविलें आणि बागडपट्टीत जाण्यासाठीं म्हणून आडवाटेनें निघालों मनांतून मात्र मी बाबांस सारखा प्रार्थीत होतों कीं, 'बाबा, माझा सर्व भार आतां सर्वस्वी तुमचेवरच आहे. या संकटांतून निभावणारा आतां आपल्याशिवाय कोणीही नाहीं. आपण समर्थ आहांत; तरी हें संकट आपण तात्बड-तोब निवारण करा.'

'तों काय आश्चर्य! कांहीं कल्पना नसतांना एकाएकीं 'राहता–शिर्डी सीट है' असें कोणी ओरडत असल्याचा भास झाला. म्हणून मी जरा वळून पाहतों तों एक मोटार अगदीं माझ्याच जवळ येत असलेली दिसली. त्या मोटारचा क्लीनर बाहेर उभा राहून वरीलप्रमाणें ओरडत होता. तात्बडतोब मीं मोटारीस थांबण्याची खूण केली आणि आंत चढून पाहतों तों समोरच कोटिलिंगार्चन करणारे ब्रेटावतकर महाराज बसलेले! आमची एकमेकांची ओळख होतीच. त्यांना मनमाडास जावयाचें होतें व त्यांच्याबरोबर त्यांची बरीच मंडळी होती; म्हणून त्यांनी एक स्पेशल मोटार ठरविली. त्यांची मंडळी मावूनही आणखी बऱ्याच सीटस् रिकाम्या होत्या. तेव्हां जमल्यास भाड्याच्या रकमेंत बचत व्हावी म्हणून त्यांनीं मोटार ड्रायव्हरास आणखी कांहीं सीटस् मिळाल्या तर पाहण्यासाठीं म्हणून मोटार शहरांतून फिरवून आणण्यास सांगितलें. सीटस् घेण्यासाठीं म्हणून अशा अवेळीं ती मोटार रस्त्यांतून फिरत होती. महाराजांना मला माहिती विचारल्यावरून मीं त्यांना माझी हकिगत सांगितली. त्याबरोबर त्यांना काय वाटलें कोणास ठाऊक, त्यांनीं ड्रायव्हरास आणली सीट्स् न घेतां तात्बडतोब मोटार भरवेगानें शिर्डीस नेण्यास सांगितलें. हिवाळ्याचें रम्य वातावरण, तशांत पौर्णिमेचें चांदणें व रस्ताही शांत; आणि त्यांत बाबांचीच इच्छा. ड्रायव्हरनें ती मोटार अवघ्या १–१॥ तासांत शिर्डीस आणली. लगबगीनें मीं हारांचा व प्रसादांचा करंडा घेऊन मंदिरांत येऊन पाहतों तों कीर्तनाची गर्दी जमलेली व त्यांत भाऊसाहेब धुमाळ बसलेले, कोणी कीर्तन करीत आहे कीं काय म्हणून मीं भीत भीत नजर फिरविली; पण कीर्तन करण्यास कोणीच उभे असलेले दिसून आलें नाहीं. इतक्यांत भाऊसाहेब धुमाळांनीं मजकडे पाहिलें; मींही त्यांचेकडे पाहिलें आणि मग आम्हीं दोघांनींही घड्याळाकडे पाहिलें. घड्याळ्यांत ९–४५ वाजल्याचें दिसून येतांच माझी स्थिति काय झाली असेल यांचें वर्णन मला करवत नाहीं. सगळ्या अंगावर रोमांच उभे राहिले आणि त्या अतीव आनंदाच्या भरांत मी जवळ जवळ धांवतच समाधीजवळ गेलों आणि बाबांना प्रथम नमस्कार करून म्हटलें, 'बाबा, तुम्हीच मला वांचविलेंत.' आणि नंतर श्रीमंती दुर्गाबाई कारतकर यांनी दिलेला हार बाबांना घातला व प्रसाद त्यांचेसमोर ठेवला. आणि बरोबर १० वाजतां कीर्तनास उभा राहिलों.

'कीर्तनांत ज्या वेळेस मीं ही सर्व हकीगत सांगितली त्यावेळेस भाऊसाहेबांचे दोन्ही डोळ्यांतून पाणी आलें व ते मला म्हणाले; 'विठ्ठलराव, केवळ बाबांच्या

कृपेमुळेंच तुम्ही आज वेळेवर कीर्तनास येऊं शकलांत, आणि त्यांचेमुळेंच पुढील कष्ट प्रसंग टळला.'

★

## (१८) सिगारेटचें व्यसन असें सुटलें

**श्री.** ल. ह. बेणकट्टी (गव्हर्मेंट रेंज फॉरेस्ट ऑफिस, पेण, जिल्हा कुलाबा) यांनीं सांगितलेला अनुभवः–

'माझी ही प्रथमचीच शिर्डीची यात्रा. मी मुंबईहून ता. ५।५।५३ ला रात्रीं निघालों व कोपरगांव येथें ता. ६–५–५३ ला सकाळीं ६॥ वाजतां आलों. शिर्डीस जाणारांची पुष्कळ गर्दी होती. ७ ते ८ पर्यंत ३ बसेस शिर्डीस गेल्या. परंतु गर्दी फार असल्यामुळें व मागचें लोक धकाबुक्की करून पुढें गेल्यामुळें रांगेंत उभें राहून सुद्धां यांपैकीं कोणत्याही बसमध्यें आम्हांस जागा मिळाली नाहीं. रात्रीची झोंप नसल्यामुळें उभें राहणें कंटाळवाणें वाटूं लागलें. ९ वाजले, १० वाजले; तरी मोटार येईना. एक एक मिनिट युगाप्रमाणें वाटूं लागलें. मी व माझ्या कुटुंबांतील मंडळी अगदीं त्रासून गेलों. शेवटीं ११ वाजले; तरीहि मोटार आली नाहीं. इतका वेळ कसातरी सिगारेट ओढीत व लवकरच मोटार येईल या आशेवर काढला. आतां मात्र अगदींच धीर निघेना. तशांत एस्. टी. कंपनीचे कांहीं नोकर व लोकही बोलूं लागले कीं, ३॥ वाजेपर्यंत बस येणार नाहीं. तेव्हा मात्र माझा धीर अजिबात खचला; व आतां आपण बाबांवर भार टाकून त्यांच्या दैवी शक्तीची (Power) प्रचीति पाहूं या, असा मीं मनाशीं निश्चय केला.

'त्या वेळेस माझ्या सिगारेटच्या पाकिटांत एकच सिगारेट उरली होती. ती मीं काढली आणि सावकाश व संथ मनानें पेटविली, आणि बाबांना मनांत म्हटलें, 'साई-बाबा, आपणांत जर खरोखरीच कांहीं दैवी शक्ति असेल तर अवघ्या ५ मिनिटांत शिर्डीस जाणारी बस पाठवून तिची प्रचीति मला दाखवा. ५ मिनिटांत जर बस आली नाहीं तर आपणांमध्यें कांहीं दैवी शक्ति नाहीं असें मी समजेन. परंतु जर खरोखरच ५ मिनिटांत बस आली तर आपणावरील श्रद्धा दाखविण्यासाठीं व या अनुभवाची आठवण सदोदित राहण्यासाठीं म्हणून यापुढें मी मुळींच सिगारेट ओढणार नाहीं.'

'आश्चर्याची गोष्ट अशी कीं, अवघ्या ३ मिनिटांच्या आंतच आमच्या समोर शिर्डीस जाणारी एस्. टी. ची बस उभी राहिली. माझी सिगारेट अर्धीसुद्धां झाली नव्हती. पण आनंदाच्या भरांत मीं ती अर्धवट जळकी सिगारेट तशीच एकदम फेकून दिली. तेव्हांपासून आतांपर्यंत मीं सिगरेट ओढलीच नाहीं. वयाच्या २०।२१ वर्षां-पासून मी सिगरेट्स् ओढीत आहें आणि आज माझें वय ३२ आहे. सामान्य परिस्थितींत माझें सिगारेटचें व्यसन सुटणें शक्यच नव्हतें. परंतु बाबांच्या दैवी शक्तीची अशा रीतीनें प्रचीति आल्यामुळेंच माझें हें व्यसन अवचित सुटलें. आज

४ दिवस झाले, पण बाबांच्या कृपेमुळेंच हें व्यसन सुटल्यामुळें मला कोणत्याच प्रकारचा त्रास झाला नाहीं.'

★

## ( १९ ) 'साईनिवास' ची विलक्षण हकीकत

श्री. राजाराम नारायण नाईक (साईनिवास, भूता दरवाजा, दसरा रोड, महाल, नागपूर) यांनीं ता. १५-५-५३ रोजीं खालील अनुभव सांगितलाः—

"आमच्या घराण्यांत साईभक्ति फार जुनी आहे. रोज बाबांची पूजा तर केली जातेच, परंतु गुरुवारीं विशेष अशी आरतीही केली जाते. १९५० सालची गोष्ट. आम्ही एक घर विकत घेण्याचें ठरविलें व त्याप्रमाणें सौदाही ठरला. अट एवढीच होती कीं, त्यांच्याकडून घर घ्यावयाचें होतें त्यांनीं त्या घरांत असलेला भाडेकरी काढून टाकावा. त्या घरांत एक सरकारी नोकर रहात होता; पण पुष्कळ विनंत्या करूनही तो तें घर सोडण्यास तयार होईना. १।२ महिने वाट पाहिल्यावर मीं श्री. पवार यांना म्हटलें कीं, ज्या अर्थीं भाडेकरी निघत नाहीं त्या अर्थीं आपण आतां घराचा सौदा रद्द करूं. श्री. पवारांना नाहीं म्हणवेना. पण ते मला म्हणाले कीं, एकदां आपण ताजुद्दीन बाबांच्या दर्ग्यास याबाबत विचारूं व त्यानंतर तुम्हांस जें योग्य वाटेल तसें करूं. माझी साईबाबांवर श्रद्धा असल्यामुळें मीं त्यांना म्हटलें कीं, याबाबत आपण साईबाबांनांच विचारूं. तेव्हां ते म्हणाले कीं, 'सर्व संत-फकिर व साधू एकच आहेत असें म्हणतात. तर ताजिउद्दीन बाबांच्या दर्शनास कोणती हरकत आहे? एकदां जाऊन तर पाहूं. मग तुम्ही म्हणाल तसें करूं.' शेवटीं मी ताजुद्दीन बाबांच्या दर्शनास गेलों आणि साईबाबांना स्मरून प्रार्थना केली कीं, श्री. पवार यांचे घरांत राहत असलेला भाडेकरी निघून जावा.

"नंतर ५।६ दिवसांनीं स्वप्नांत मला एक दृष्टान्त झाला. जें घर मीं घ्यावयाचें ठरविलें होतें त्या घराच्या ओट्यावर मी निजलों असून एक पोलिस कॉन्स्टेबल मला सांगतो आहे कीं, 'अंदर सो जाव'. तेव्हां मी त्यास म्हणालों कीं, आंतमध्यें एक सरकारी नोकर रहात असल्यामुळें मला आंत जातां येत नाहीं. 'ओ, ऐसी बात. वो जाता नही क्या? अच्छा!' असें म्हणून त्यानें लगेच खिशांतून एक सरणवही काढली व त्या भाडेकऱ्याचें नांव त्या वहींत टिपून घेतलें. नंतर मी लगेच जागा झालों.

"ह्या दृष्टान्तानंतर माझी पूर्ण खात्री झाली कीं, भाडेकरू ती जागा अगदीं लवकरच नक्की सोडणार. म्हणून मी श्री. पवार यांजकडे गेलों व त्यांना माझा दृष्टान्त सांगितला आणि म्हटलें, 'तो भाडेकरू आपोआप निघून जाईल याची मला पूर्ण खात्री आहे. तेव्हां आपण घराचा सौदा आतां कायद्याच्या दृष्टीनें पक्का करूं.' तेव्हां श्री. पवार यांना आश्चर्य वाटलें. पुढें १।२ दिवसांत घराची रजिस्ट्री केली. घर घेतल्यापासून आठ दिवसांत त्या सरकारी भाडेकरूला अगदीं तातडीचा बदलीचा हुकूम आला. तेव्हां तो तें घर आम्हांस न कळवतांच तसेंच उघडें टाकून (म्हणजे कुलुप न लावतां) चालता

झाला. त्याच दिवशीं मला ही सर्व हकीगत कळली. मग याबाबत पूर्ण चौकशी करून व तो खरोखरच जागा खालीं करून गेला आहे याची खात्री करून घेऊन नंतर मीं त्या घराचा ताबडतोब ताबा घेतला. अशा रीतीनें बाबांच्या लीलेचा मला अनुभव आला. मीं आमच्या नव्या घराचें नांव ' साईनिवास ' असें ठेविलें आहे.

★

## (२०) बाबांची अगाध लीला

भक्ताची आपल्यावर खरोखरच निष्ठा आहे किंवा नाहीं हें पहाण्यासाठीं बाबा एखादे वेळेस कशी परीक्षा घेतात व त्यांच्या कसोटीस उतरल्यास ते कसें साहाय्य करतात याबद्दलची एक जुनी आठवण श्री. रामकृष्ण गणपतराव कोठारे (साईमंझील, १५१, लेडी जमशेटजी रोड, माहीम, मुंबई नं. १६ ) यांनीं नुकतीच सांगितली. ती खाली देत आहे: —

' माझे आईवडील हे बाबांचे भक्त होते. बाबा असतांना त्यांच्या दर्शनास वर्षांतून एकदां तरी जाण्याचा त्यांचा नियम असे; जमल्यास ते वर्षांतून ३–४ वेळेसही जात असत. बाबांनीं देह सोडावयाचे थोडे दिवस अगोदरच ( म्ह० १९१८ सालीं ) माझे आईवडील त्यांचे दर्शनास येऊन गेले होते. त्यामुळें ज्या वेळेस बाबांनीं प्रत्यक्ष देह सोडला त्या वेळेस त्यांचे दर्शनार्थ माझे वडिलांना येणें जमलें नाहीं. नंतर बाबांची समाधि बुटींचे वाड्यांत बांधण्यांत आली. परंतु कांहीं ना कांहीं कारणानें समाधीचें दर्शन घेण्याचा त्यांचा योग लांबणीवर पडत चालला.

' सन १९१९ सालच्या पावसाळ्यांतली गोष्ट. बाबांचें दर्शन घेतल्यास १ वर्ष पुरें होण्याचे बेतांत होतें. तेव्हां कशी तरी सवड काढून बाबांचें दर्शन घेण्यासाठीं म्हणून माझे वडील निघाले. त्यांचेबरोबर आम्हीं मुलें व माझी आई हीं होतों. कोपरगांवास आलों तर मुसळधार पाऊस पडत होता. त्या वेळेस कोपरगांव ते शिर्डी हा प्रवास खटाऱ्यांतून करावा लागे. रस्ता फार त्रासाचा होता. तशांत पाऊस. त्यामुळें आमचे आईवडिलांना शिर्डीस सुखरूप जाणें कसें होईल यांची काळजी वाटूं लागली. ते आपले साईनामाचा सारखा जप करीत होते. स्टेशनचे आसपास एकही खटारा नव्हता. शिर्डीस जाणारे आम्हीच तेवढे होतों. इतक्यांत स्टेशनमास्तर आले व त्यांनीं अशा पावसांत मुलबाळांसकट शिर्डीस न जाण्याचा सल्ला माझ्या वडिलांना दिला. परंतु माझ्या वडिलांचा निश्चय कायम होता. आम्ही तेथेंच बसून राहिलों. माझे आईवडिलांनीं मात्र साईनामाचा जप करण्याचें चालूच ठेवलें.

' इतक्यांत एक मनुष्य आला. अंगानें सडपातळ व उंच, हातांत काठी आणि अंगांत अलपाकाचा कोट होता. त्याची मूर्ति अजूनही माझ्या डोळ्यांसमोर कधीं कधीं उभी राहते. तो आमचे वडिलांना म्हणाला, ' तुम्हीं कशास शिर्डीस जातां ? तो वेडा तर मरून गेला, आतां तेथें काय आहे ? ' हें ऐकतांच माझे वडील त्यास म्हणाले, ' ही वटवट पाहिजे कशाला ? शिर्डीस काय आहे तें आम्हीं तुला विचारलें नाहीं. आम्हांस शिर्डीस जायचेंच; आणि आम्ही आजच कसेंही करून जाणार. बाबा आमची ही इच्छा पूर्ण करतीलच.' आमच्या वडिलांचा हा निश्चय पाहतांच त्या मनुष्यानें ताबडतोब आपला खटारा

आणला व म्हणाला, 'बसा, मी तुम्हाला नेतों.' वाटेनें 'माया,' 'मिथ्या,' 'ब्रह्म' वगैरे कांहींतरी तो म्हणत असे. नदीला फार पूर होता, त्यामुळें नाव चालत नव्हती. म्हणून त्यानें आम्हांस नदीजवळच असलेल्या एका ब्राह्मणाचे घराकडे नेलें व तेथें आम्ही उतरलों. ३ वाजतांच पुराचा जोर कमी होऊन नाव सुरू झाल्याचें आम्हांस कळलें; म्हणून लगबगीनें आम्ही नदीकडे निघालों. आम्हांस कशी काय भुरळ पडली कोण जाणे, पण त्या खटारेवाल्याची आम्हांस आठवणच राहिली नाहीं. अथवा तोहि पैसे मागण्यासाठीं आमचेकडे आला नाहीं, या गोष्टीचें मला अजूनही आश्चर्य वाटतें.

'नंतर आम्ही सर्व शिर्डीस पोंचलों. त्या वेळेस आतांसारखी गजबज नव्हती. परस्थ पाहुण्यांची राहण्याची सोय दिक्षित–वाड्यांत होत असे. आम्हीं आलों तों रात्र झाली होती. दीक्षित–वाड्यांत आम्हीं उतरलों. आजूबाजूस सर्व भयाण वाटे व वाड्यांत सोबतही नव्हती. त्यामुळें आम्हांस व आमचे आईस भीति वाटली. परंतु थोड्याच वेळांत आंतून दळण्याचा आवाज ऐकूं येऊं लागला. चौकशी करतां समजलें कीं, बाबांचें मासिक श्राद्ध ८ दिवसांवर होतें व त्या निमित्त धान्य वगैरे दळण्याकरतां म्हणून ४।५ बायका वाड्यांत काम करीत होत्या. त्या बायका आणखी ४ दिवसांनीं तें काम करणार होत्या, परंतु काम लवकर उरकून घेण्यासाठीं म्हणून त्यांनीं त्याच दिवशीं कामास आरंभ केला. आम्हांस मात्र वाटलें–आणि अजूनही वाटतें–कीं, बाबांनींच आमची भीति नाहींशी करण्यासाठीं सोबत म्हणून त्या बायकांना त्या दिवशींच पाठविलें. दुसरे दिवशीं सकाळीं उठून पाहतों तों एक फार मोठा बैल वाड्याचे समोरच बसलेला दिसला. कै. बापूसाहेब बुटी आईस म्हणाले कीं, 'पहा, बाबा एवढे रात्रभर तुमचे करितां पहारा करीत बसले होते, मग तुम्हांस भीति कशाची?'

'नंतर सकाळींच पुन्हां बाबांच्या समाधीचें दर्शन घेऊन लगेच आम्ही कोपरगांवास परतलों. जातांना कांहींच त्रास झाला नाहीं. नदीजवळ आल्यावर मात्र त्या खटारेवाल्याची व त्यानें केलेल्या मदतीची अत्यंत तीव्रतेनें जाणीव झाली व त्यास आम्हीं कांहींच दिलें नाहीं, इतकेंच नव्हे तर आम्ही त्याची आठवणही हा वेळपावेतों विसरलों म्हणून वाईट वाटलें. तेव्हां नदीपार होतांच आम्हीं मुद्दाम त्या ब्राह्मणाचे घरीं जाऊन त्या खटारेवाल्याची चौकशी केली. आम्हांस वाटलें कीं तो त्यांच्या ओळखीचा असेल. पण उलट त्या ब्राह्मणानेंच आम्हांस म्हटलें कीं, 'अहो तो तुमचा मनुष्य नव्हे का? मी तर त्यास तुमचाच समजत होतों. आम्हांस त्याचा ठावठिकाणा माहित नाहीं.'

'मला तर वाटतें कीं, तो माणूस म्हणजे दुसरातिसरा कोणी नसून प्रत्यक्ष बाबाच होत. व आमच्या आईवडिलांची निष्ठा पाहण्यासाठीं ते स्वतःच बाबांबद्दल वेडेवाकडे बोलले. पण आमच्या वडिलांचा निर्धार व श्रद्धा दिसून येतांच त्यांनीं सर्वप्रकारें मदत केली व आमचा प्रवास सुखकर केला. बाबांची लीला अगाध खरीच!'

---

# स्वदेशी ट्रंक फॅक्टरी अँड शॉप

मालक : महादेव विनायक इंदूलकर

आमच्या फॅक्टरींत हरतऱ्हेच्या मजबूत व टिकावू ट्रंक्स, साध्या व हॉस्पिटल्साठीं लागणाऱ्या कॉटस्, पाळणे, तसेंच होल्डॉल्स्, लेदर सूट केसीस, छत्र्या, रेनकोटस् तयार होतात

आणि

घाऊक व किरकोळ मार्केट भावानें खालील ठिकाणीं मिळतात.

| (१) सरकारी तबेला | (२) फॅक्टरी | (३) विजयनगर |
| --- | --- | --- |
| २५२, गिरगांव | भवानीशंकर रोड | बी. बी. स्टेशन समोर |
| मुंबई ४ | दादरकर वाडी, मुंबई १४ | दादर, मुंबई |

**दिपवाळी जवळ आली चांगल्या फटाक्यांसाठीं अवश्य या.**

# MATUNGA CLEANING WORKS

ESTD. 1934. *Prop.* S. V. PRADHAN

MODI NIWAS, BOMBAY 19

Washers, Dyers and Dry Cleaners.

**A Pleasure to you—a Satisfaction to us**

**Chemical Cleaners, Super Fine Darners**

**Master Dyers**

*FOR*

**Cotton, Woollen, Silken & Jari Whole Cloths**

सर्व तऱ्हेच्या कपड्यांची, धुलाई, रंग व रफू काम

व्यवस्थित करणार

## मा टुं गा क्ली निं ग व र्क्स

( स्थापना १९३४ ) मालक : एस्. व्ही. प्रधान

मोदी निवास, मुंबई १९

# श्री साईबाबा-पुण्यतिथि-महोत्सव

लेखक : जिज्ञासु

शिरडी संस्थानांत होणाऱ्या उत्सवांपैकीं श्रीरामनवमी, श्रीगुरुपौर्णिमा व श्री गोकुळ-अष्टमी या दिवशीं होणारे उत्सव बाबांचे हयातींत त्यांच्याच प्रेरणेनें सुरू झाले. पुण्यतिथि-उत्सव हा सन १९१९ पासून श्रीसाई-भक्तांनीं सुरू केला.

सन १९१८ सालीं ऑक्टोबरचे १५ तारखेला मंगळवारीं दोनप्रहरीं सुमारें २॥ वाजतां बाबांनीं पार्थिव देह विसर्जन केला. हिंदूंच्या पंचांगांतील साडेतीन शुभमुहूर्तांपैकीं एक शुभ मुहूर्त विजयादशमी हा आहे. बाबांनीं हा दिवस आपल्या महाप्रयाणासाठीं निश्चित केला होता असें दिसतें. कारण सन १९१६ सालचे विजया-दशमीला त्यांनीं आपले सर्व कपडे धुनीमाईला समर्पण करून दिगंबरावतार धारण केला होता. जणूं काय दोन वर्षांनीं ' देहरूपी आवरणाचा असाच त्याग करणार ' असें त्यांना सुचवावयाचें होतें ! सन १९१८ सालीं विजयादशमीचेच दिवशीं दुपारीं एकादशी लागली होती. त्यामुळें भागवत धर्माप्रमाणें एकादशीची महा-पर्वणी होती. असा शुभकाल पाहून बाबांनीं आपल्या पार्थिव देहाचें विसर्जन केलें. देहविसर्जनापूर्वी ९ रुपये दान करून नवरात्रोत्सवाचें जणूं पारणें फेडलें; ' मला वाड्यांत न्या ' या शब्दांनीं आपलें समाधिस्थान सुचविलें आणि शांतपणें देह सोडला.

बाबांच्या समाधीनंतर जी व्यवस्था ठरली त्यांत पुण्यतिथीच्या उत्सवाची जबाब-दारी मुख्यत्वें मुंबई-पुण्याकडील भक्तमंडळींनीं अंगावर घेतली. त्याप्रमाणें सन १९१९ सालचे विजयादशमीला पहिल्या पुण्यतिथि-उत्सव झाला. म्हणजे चालू सालीं ( सन १९५३ ) होणारा उत्सव ३५ वा उत्सव आहे.

विजया दशमीला पहांटे कांकडारति होऊन सूर्योदयाबरोबर समाधीवर रुद्राभि-षेकाला सुरवात होते. एक लघुरुद्र पुरा झाल्यानंतर भक्तांचे अभिषेक सुरू होतात. एकेका वेळीं १०।१५ भक्तमंडळी अभिषेक पूजा करतात. प्रत्येक गटाला ५।५ मिनिटें दिलीं तरी २।३ तास हे अभिषेक चालतात. त्यानंतर वाद्यांचे गजरांत समाधीला सुगंधी द्रव्यें, अत्तर, गुलाब वगैरे लावून गंगोदकानें अभ्यंग स्नान घालतात. नंतर समाधि कोरडी करून महापूजा होते व मग महावस्त्र ( गलेफ ) चढवितात. त्यावर फुलांच्या चादरी, हार वगैरे समर्पण करितात. हें सर्व होईतों दुपारचे १२।१२॥ होतात. त्यानंतर कीर्तन सुरू होतें. त्यांत मुख्यतः बाबांच्या लीलांचें वर्णन असतें. हें कीर्तन २॥-३ वाजेतों चालतें.

यति, संन्याशी, साधु पुरुष वगैरेंच्या पुण्यतिथीला 'आराधन' विधि करावा असें शास्त्र आहे. या विधीमध्यें गुरु, परमगुरु, परमेष्ठी गुरु व परात्पर गुरु अशा चार स्थानीं चार ब्राह्मणांची विधिपूर्वक स्थापना करितात. त्यानंतर पादप्रक्षालनपूर्वक त्यांची पुरुषसूक्तानें पूजा करितात. नंतर,

आनंदमानंदकरं प्रसन्नं ज्ञानस्वरूपं निजबोधरूपं ।
योगींद्रवंद्यं भवरोगवैद्यं श्रीमद्गुरुं नित्यमहं नमामि ॥

या श्लोकानें प्रार्थना करितात. नंतर त्यांचें भोजन होतें. भोजन चालू असतांना उपनिषदांतील मंत्रांचें पारायण, प्राकृत पद्यगायन वगैरे होतें. ब्राह्मणांचें भोजन झाल्यावर त्यांना तांबूल, दक्षणा, वस्त्रें वगैरे देतात व मग तीर्थाच्या पूजेला सुरवात होते. तीर्थकलशाची पूजा, आरती वगैरे झाल्यावर ब्राह्मणांना प्रदक्षिणा घालून त्यांना प्रथम तीर्थ देतात व नंतर सर्व भक्तांना तें वांटतात. अशा रीतीनें हा आराधन-विधि पुरा होतो. शिरडीस या विधीप्रमाणेंच आराधन विधि होतो. प्रथम तो कै. बाळासाहेब भाटे करीत; पुढें कांहीं वर्षें श्री. दीक्षित, त्यानंतर श्री. महाजनी हा विधि करीत; त्यानंतर हल्लीं संस्थान-ट्रस्टींपैकीं कोणीतरी हा विधि करितात.

आराधन-विधि पूर्ण झाल्यावर भक्तांचें भोजन वगैरे होतें. रात्रीं रथाची मिरवणूक निघते. ती मिरवणूक परत आल्यावर इतर कार्यक्रम, गायन, वादन, भजन, कीर्तन किंवा नाटक वगैरे होतात.

एकादशीला सकाळीं पुनः समाधीवर अभिषेक वगैरे मोठ्या प्रमाणावर होतात. दुपारीं बाबांना अर्पण केलेल्या जुन्या वस्त्रांचा व इतर वस्तूंचा लिलांव होतो. बाबांच्या प्रेमाची खूण म्हणून भक्त लोक या वस्तू आवडीनें घेतात. रात्रीं पालखी निघून ती शेवटीं बाबा एक दिवसाआड चावडींत झोंपेत असत त्या चावडींत नेतात व तेथें शेजारती होते. समाधिमंदिरांत भजन गायन वगैरे कार्यक्रम चालू असतात.

द्वादशीला दुपारीं काल्याचें कीर्तन होतें. बालगोपालांचे टिपऱ्या, फुगड्या वगैरे खेळ होतात. शेवटीं दहीं-हंडी फुटून उत्सवाची समाप्ति होते.

बाबांचे भक्त सर्व भरतखंडांत पसरले आहेत. त्या सर्वांनाच या उत्सवाला शिरडीस येतां येतें असें नाहीं. अशी मंडळी हा उत्सव आपापल्या गांवींच साजरा करितात. ही प्रथा फार जुनी आहे. मुंबईस श्री. अमीदास मेहता नांवाचे एक बाबांचे निस्सीम भक्त रहात असत. त्यांनीं 'सत्संग' नांवाच्या संस्थेमार्फत शिरडीस होणारे उत्सव मुंबईस करणेंची सुरवात केली होती. पुण्यतिथीचा पहिला उत्सव त्यांनीं मुंबईस माधवबागेंत करविला. गोघडेबुवांचें कीर्तन झालें. या उत्सवाला श्रीउपासनी-बाबा उपस्थित होते असें जुने भक्त सांगतात. या अमीदासांनीं पुढें शिरडीसच देह ठेविला.

त्याचप्रमाणें श्रीसाईसच्चरितांचे लेखक श्री. दाभोळकर हेही वांद्र्यास आपल्या घरीं पुण्यतिथी उत्सव साजरा करींत. इंदुरास श्री. बाबासाहेब रेगे हे बाबांचे अंतरंग-भक्त पुण्यतिथी-उत्सव साजरा करितात. ह. भ. प. दासगणू हे हा उत्सव पंढरपूर-क्षेत्रांत साजरा करितात. या उत्सवांत वेदमंत्रपठण, चक्रीपुराण वगैरे कार्यक्रम असतात. हल्लीं मद्रास इलाख्यांत ही अनेक ठिकाणीं हा उत्सव मोठ्या प्रमाणांत साजरा केला जातो.

पुण्यतिथीसारखे उत्सव म्हणजे भक्तांच्या शुभ वासना, शुभ संकल्प यांना उजळा देण्याची महान् पर्वणीच. प्रत्यक्ष अग्नीवर सुद्धां फुंकर घातला नाहीं तर राख

जमते व त्याचें तेज गुप्त होतें. तसेंच आपल्या शुभ संकल्पांचें आहे. या संकल्पांनो वारंवार उजळा देणें जरूर असतें. तसा तो न दिला तर ते संकल्प विस्मरणाच्या राखेखालीं झाकिले जातात व त्यांचा उजेड आपल्या दैनंदिन जीवनांत दिसेनासा होतो- व जीवन हें उदरंभरणादि क्षणभंगुर विषयांच्या संपादनांतच व्यतीत होण्याचें भय उत्पन्न होतें. तसें तें होऊं नये, आपल्या जीवनाचें ध्येय काय, तें साधण्याकरितां आपण काय करावयाला पाहिजे, या बाबतींत आपल्या गुरुमाउलीची शिकवण काय होती, तिचें आपण कितपत पालन करतों वगैरे गोष्टींचें शांत मनानें चिंतन करण्याची व आपल्या शुभ संकल्पांना दृढ निश्चयाचें जीवन देण्याची सुसंधी या पुण्यतिथिउत्सवानें मिळते. वैयक्तिक जीवनांतील तसेंच सार्वजनिक जीवनांतील अनेक कठीण समस्या सोडवितां बुद्धि गांगरून जावी असे प्रसंग सर्वांवरच असतात. या प्रश्नांत आपणांस श्रीगुरूचें मार्गदर्शन मिळावें अशी नम्र पण निकडीची प्रार्थनाही भक्तजन आपले गुरूपाशीं करतो. त्याशिवाय प्रेमळ गुरुभक्तांच्या गांठीभेटी व विश्रम्भालाप करणेची संधि मिळते. त्यामुळें प्रत्येक सद्भक्तानें आपल्या सद्गुरूची पुण्यतिथि पाळलीच पाहिजे आपणांला शक्य असेल त्या ठिकाणीं उत्सवादि कार्यक्रमांत सामील होऊन त्यांत यथाशक्ति सेवा केली पाहिजे. यांतच आपलें कल्याण आहे. श्रीसाईबाबा आपल्या भक्तांना नेहमीं सन्मार्ग दाखवोत हीच त्यांचे चरणीं प्रार्थना !


॥ श्री साईनाथ प्रसन्न ॥

# भास्कर लक्ष्मण नार्वेकर

नवीन फॅशनप्रमाणें, सोन्या–चांदीचे, कल्चर मोत्यांचे दागिने तयार मिळतील व ऑर्डरप्रमाणें तयार करून दिले जातील. तसेंच श्री. साईबाबांचीं सोनें चांदीचीं लॉकेटस् व चांदीचे तयार फोटो मिळतील. एक वेळ भेट देऊन खात्री करा. दसरा दिवाळी सण जवळ आले; तरी सुंदर फॅशनेबल दागिने तयार करून घ्या.

१८४ ठाकुरद्वार रोड, मुंबई २

# साधूंचे चमत्कार

लेखक : प्रभाकर सुं. आगासकर

साधुसंतांच्या चरित्राचें अभ्यासू वृत्तीनें परीक्षण केलें तर आपणाला असें आढळून येईल कीं, बहुतेक संतांनीं कांहीं ना कांहीं चमत्कार करून दाखविले आहेत. हे चमत्कार ते कां करितात ? हा फार महत्त्वाचा प्रश्न कित्येक भाविक भक्तांना पडतो व त्यामुळें क्वचित् प्रसंगीं त्यांची दिशाभूल होण्याचा संभव असतो. आध्यात्मिक उन्नति व ईश्वराची आराधना करण्याकरितां सर्वसंगपरित्याग करून संन्यास घेतलेल्य सत्पुरुषांना कोणत्याही प्रकारचे चमत्कार करून दाखविण्याची वास्तविक कांहींच जरूरी नाहीं. कोणत्याही सत्पुरुषाच्या चरित्राचें सूक्ष्म दृष्टीनें अवलोकन केलें तर जिज्ञासू विद्यार्थ्याला असें दिसून येईल कीं, खरा सत्पुरुष सहसा आपण होऊन चमत्कार करून दाखविण्याच्या भानगडींत पडत नाहीं. कारण त्याची वृत्ति ही नेहमींच निरभिमानी, प्रामाणिक आणि निःस्वार्थी अशीच असते. कोणाही व्यक्तीकडून त्यांना कशाचहि अपेक्षा नसते आणि चमत्काराचें दिव्य करून त्यांना कोणताही स्वार्थ साधावयाचा नसतो. खरा वस्तुस्थिति अशी असूनही सत्पुरुष चमत्कार करितात, याला तसेंच महत्त्वाचें कारण असलें पाहिजे.

प्रस्तुत प्रसंगीं आपण खऱ्या सत्पुरुषांचे चमत्कारच विचारांत घेतले पाहिजेत. भोंदू साधूंनीं एखाद्याला लुबाडण्याकरितां केलेले हातचलाखीचे, जादूटोण्याचे, नजरबंदीचे चाळे विचारांत घेतां कामा नये. अशा भोंदू गुरूंचे चमत्कार एका कानानें ऐकून दुसऱ्या कानानीं सोडून देण्याइतके कवडी किंमतीचे असतात. प्रत्येक भाविक भक्तानें अशा भोंदू बुवाबाजीपासून सावध राहिलें पाहिजे.

परमोच्च कोटीला पोहोंचलेले सत्पुरुष चमत्कार मुद्दामहून करीत नाहींत; तर ते सहज एखादी कृति करून जातात आणि भक्ताच्या मनावर त्याचा इतका विलक्षण परिणाम होतो कीं, त्याला तो कांहीं तरी मानवी बुद्धीला अगम्य असा चमत्कार घडून आल्यासारखा वाटतो. साधूंच्या नुसत्या नजरेंत इतकें प्रभावी सामर्थ्य असतें कीं, ते आपल्या आत्मबलाच्या जोरावर नुसत्या नजरेनें एखाद्याचा कायाकल्प करून दाखवितात. भक्तावरील प्रेमानें, मातेच्या सहृदयतेनें व एखाद्या विशिष्ट उच्च तत्त्वाची शिकवण देण्याकरितां व दयाघन परमेश्वराच्या अगाध सामर्थ्याची ओळख पटवून देण्याकरितांच सत्पुरुष चमत्काराचा मार्ग स्वीकारतात.

संतांनीं करून दाखविलेल्या चमत्कारांचीं हजारों उदाहरणें दाखवितां येतील. त्या सर्व चमत्कारांचें पृथःकरण आणि त्यांचा खरेखोटेपणा पाहणें मानवी बुद्धीच्या पलीकडचें आहे. आपल्या धर्मग्रंथांत ऋषी-मुनींनीं या विषयावर अधिकार-वाणीनें लिहून ठेवलें आहे. संतांना आध्यात्मिक ज्ञान मिळाल्यानंतर ज्या ऋद्धिसिद्धि प्राप्त होतात त्यांची शक्ति इतकी प्रभावी व अतुल असते कीं, तिच्या जोरावर मानवी बुद्धीला अगम्य अशी कोणतीही अघटित कृति करून दाखवून चमत्कार करून दाखविणें म्हणजे अशा सत्पुरुषांचा नुसता हातचा मळ असतो.

आपल्या हिंदु धर्मातील महान् साधूंनींच मनाला थक्क करून सोडणारे चमत्कार केले आहेत असें नसून इतर सर्व धर्मांतील थोर विभूतींनीं विविध प्रकारचे चमत्कार केले आहेत. श्रीअवधूत दत्तात्रेयांनीं जुनाट शुष्क झालेल्या औदुंबर वृक्षाला नवी पालवी आणून प्रफुल्लित केलें. तुफान सागराला मार्ग हटविण्याची आज्ञा येशू खिस्तानें केली. शम्स तब्रेस नांवाच्या संतानें प्रत्यक्ष सूर्यनारायणाला थोडा खालीं आणून दाखविला. निंबार्कानें तर सूर्याला दिशाबंधन करून आपल्या घरासमोरील लिंबवृक्षाजवळ स्थिर करून ठेवला. विश्वामित्रऋषींनीं त्रिशंकूसाठीं तिसरा लोक उत्पन्न करण्यास ब्रह्मदेवास भाग पाडलें. निरनिराळ्या धर्म-ग्रंथांतील हे चमत्कार त्या व्यक्तींनीं आपल्या अधिकाराच्या आणि सामर्थ्याच्या जोरावर करून दाखविले आहेत. त्याचप्रमाणें संतांनीं घडवून आणलेले चमत्कार मिथ्या होते असें म्हणण्याचें धाडस कोणाही व्यक्तीला करितां येणार नाहीं. ज्ञानदेवानें भिंत चालवून आणि रेड्याकडून वेद म्हणवून दाखविले. श्री रामदासस्वामींनीं आपल्या बाणांनीं घायाळ होऊन मृत झालेली घार मंत्राचें पाणी शिंपडून जिवंत करून दाखविली. मृत माणसाचा आत्मा यमाच्या पाशांतून खेंचून आणून त्याला जिवंत करण्याचा अजब चमत्कार श्री स्वामी समर्थ अक्कलकोट महाराज यांनीं करून दाखविला. श्री सद्गुरु साईबाबा यांच्या जीवनचरित्रांत तर असे चमत्कार इतके विविध प्रकारचे आहेत कीं, कुणाही भाविक भक्ताचें मन ते वाचून प्रेमानें गहिंवरून जातें.

बहुधा संत आपआपल्या धर्माविषयीं आस्था बाळगतात, व त्यांतील गूढ तत्त्वज्ञानाचा खोल अभ्यास करितात. मनुष्यप्राण्याच्या अंतरंगांत काय आहे ? सूक्ष्मसृष्टींत केवढें भांडार भरलेलें आहे ? इत्यादि प्रश्न सोडविण्यासाठीं व सर्व जगाचा नियंत्रणकर्ता जो परमेश्वर त्याचें सदैव चिंतन करण्यासाठीं योगाभ्यासाचे धडे ते धर्मग्रंथांतून व आपल्या गुरुमाउलीकडून घेतात. पायरीपायरीनें स्वतःची प्रगति करून ते स्वतःच साधक बनतात. मानवी अंतरंगाची शास्त्रीय दृष्ट्या त्यांना ओळख पटते. आणि आपल्या भोंवतालच्या अदृश्य सृष्टींशीं समरस होऊन विश्वाचें रहस्य त्यांना उलगडूं लागतें. योगविद्येंतील सूक्ष्मदृष्टी प्राप्त होतांच नैतिक व इंद्रियविज्ञानशास्त्रांतील सर्व प्रमेयें त्यांना प्राप्त होतात. याच स्थितींत ईश्वरोपासना करणाऱ्या मुमुक्षू संताला सिद्धी प्राप्त होतात, आणि या सिद्धींच्या साहाय्यानें सद्गुरु निरनिराळे चमत्कार करून दाखवूं शकतो. आठ स्वाभाविक सिद्धि व दहा गौणिक सिद्धि मिळून एकंदर अठरा सिद्धि आहेत महिमा, लघिमा, प्राप्ति, प्रकाश, ईशिता, वशिता व पत्काम या महत्त्वाच्या अष्ट महासिद्धि प्राप्त झाल्यावर योगसंपन्न साधूजवळ ऋद्धि सिद्धि हात जोडून सेवेला उभ्या असतात.

स्थूल देहाला सूक्ष्म शरीर बनविणें, शरीराचा भार हलका करणें, इंद्रियांचा क्रियाशक्तीशीं संबंध जोडणें, अदृश्य स्वर्गादि स्थानांतले पदार्थ पाहणें, इतर सामान्य माणसाच्या ठिकाणीं गुणांची व शक्तीची प्रेरणा करणें वगैरे विविध प्रकारची दिव्यशक्ति या सिद्धींच्या साहाय्यानें सद्गुरूंना प्राप्त होते. प्रत्यक्ष देह असूनही अशा विदेही स्थितींत साधु

चमत्कार करून दाखवितात. त्यांच्या चमत्कारांत जी विविधता दिसून येते त्याचें कारण म्हणजे तो चमत्कार घडवून आणण्यांत त्या साधूंचा उद्देश व प्रयोजन भिन्न असतें. एखादें उदात्त गंभीर तत्त्व भक्तांच्या मनावर बिंबविण्याकरितांच संत चमत्कारांचा उपयोग करीत असतात.

श्रीसाईबाबांच्या जीवन–चरित्रांत अशा प्रकारचे विविध स्वरूपाचे चमत्कार दिसून येतात. त्या प्रत्येक चमत्काराचें चिकित्सक बुद्धीनें अर्थ लावणें फार अवघड काम आहे. या विषयाचा जितका खोल अभ्यास करूं तितकें त्याचें गांभीर्य व उदात्तपणा जास्त दिसून येणार आहे. एखादा जादुगार किंवा शास्त्रज्ञ आपल्या-पुढें अत्यंत रहस्यमय असा प्रयोग करून दाखवितो. अज्ञानामुळें आपलें मन आश्चर्यचकित होतें. पण थोड्याच वेळांत त्या जादुगारानें त्या प्रयोगाचा खुलासा केल्यानंतर आपणांला त्यांत नवलाची गोष्ट वाटत नाहीं. तसेंच जोंपर्यंत एखाद्या विषयाबद्दल आपण अज्ञानांत आहोंत तोंपर्यंत तें शास्त्र किंवा तो प्रयोग आपणाला कळणार नाहीं. साधूंचें चमत्कार करण्याचें शास्त्र म्हणजे ईश्वराची दृढ उपासना आणि योगविद्येचा अभ्यास. अर्थातच चिकित्सक आणि संशोधक बुद्धीनें योगशास्त्राचा अभ्यास केल्याशिवाय साधूंच्या चमत्कारांतील रहस्य कुणालाही कळणार नाहीं.

---

॥ श्री साईनाथ प्रसन्न ॥

आमचे दुकानीं दर गुरुवारीं श्री साईभक्तांची; पेढ्यासाठीं नुसती झुंबड उडालेली असते.

●

तरी आपणही आपल्याकडे होणारे शुभ–प्रसंग साजरे करण्याकरितां आमच्या दुकानास अवश्य भेट द्या.

●

पौष्टिक खाद्यें व पेयें

श्रीखंड, बासुंदी, मसाला दूध, पेढे, बर्फी, नारळीपाक, मेसूर, सुतर फेणी, श्रीखंड व दुधीवड्या वगैरे स्वादिष्ट मिठाई.

●


आयडियल चिवडा व माव्याचे मोदक हीं आमचीं वैशिष्ट्यें आहेत.

●

लग्न, मुंज व पार्टीच्या शुभ–प्रसंगीं कांचसामान भाड्यानें मिळेल. ऑर्डरीवर संपूर्ण लक्ष दिलें जातें.


श्री साईप्रसाद

१४२, ठाकुरद्वार रोड, मुंबई ४



श्री साईबाबा प्रथम शिरडीस ज्या ठिकाणीं आले तें खंडोबाचें मंदिर

[ फोटोग्राफर-श्री. जी. जी. वेलींग, पुणें. ]



श्री साईबाबा एक दिवस आड ज्या चावडींत झोपत असत ती चावडी.

[ फोटोग्राफर—श्री. जी. जी. वेलींग, पुणें ]

# संताची जात

: लेखक :
खंडेराव ज. त्रिकोलेकर

परमेश्वरा ! तुझी जात कोणती ? भगवंता ! तूं जातीनें हिंदू कीं यहुदी कीं खिश्चन कीं पारशी ? असे मूर्खपणाचे प्रश्न कधीं कोणी देवाला केले आहेत काय ? जी गोष्ट भगवंताची तीच गोष्ट संतांची ! 'आत्मज्ञानें चोखडीं । संत जे माझीं रूपडीं । तेथ दृष्टि पडो आवडी । कामिनी जैसी ॥' १३५३ (ज्ञानेश्वरी अ. १८) हें प्रत्यक्ष श्रीकृष्णाच्या तोंडचें वचन ! तरीसुद्धां संतांची जात विचारणारे महाभाग काय कमी आढळतात ! हा मनुष्यस्वभावाचा मासला कांहीं नवीन नाहीं. श्रीज्ञानेश्वरांच्या काळींदेखील अशीं खुळीं माणसें कांहीं कमी नव्हतीं. अशा लोकांचें अज्ञान दूर करण्यासाठीं श्रीज्ञानेश्वर-महाराजांनीं संतांचें लक्षण सांगितलें कीं, 'तें चालतें ज्ञानाचें बिंब । तयाचे अवयव ते सुखाचे कोंभ । एरव्ही माणुसपण हे भांब । लौकिक भागू ॥' संतांची जात विचारणाऱ्या खुळचट लोकांना श्रीज्ञानेश्वरांनीं संतांचें लक्षण इतकें गर्जून सांगितलें ह्याचें कारण, त्यांना ठाऊक होतें कीं, संतांकडे कशासाठीं जावयाचें आणि संत कसे ओळखावयाचे ह्याविषयीं लोकांत गाढ अज्ञान आहे. एवढ्याकरितां ज्ञानेश्वरींतलि चौथ्या अध्यायांत 'संत हे आनंदाच्या प्रतिमा आहेत, ते परब्रह्माचे पुतळे आहेत' वगैरे संतांचीं लक्षणें इतक्या प्रेमभरानें सांगितलीं कीं, क्षणभर ह्या संतस्तुतीच्या भरांत श्रीज्ञानेश्वरमहाराजांना आपल्या ज्ञानेश्वरीच्या व्याख्यानाचें सुद्धां भान राहिलें नाहीं ! शेवटी श्रीनिवृत्तिनाथांना त्यांना सांगावें लागलें कीं, 'तूं संतस्तवनीं रतसी । ते कथेची से न करिसी ?' तूं संतांचें वर्णन करावयास लागलास कीं, तुला व्याख्यानाचेंही भान रहात नाहीं ! संतांचीं चिन्हें इतकी परोपरीनें–प्रकर्षानें ज्ञानेश्वर-महाराजांनी सांगण्याचें कारण काय ? कारण हेंच कीं, संत कसे ओळखावे व संतांकडे कशासाठीं जावें ह्याविषयीं भाविकांत देखील असलेलें गाढ अज्ञान ! ह्याचें दुसरें अत्यंत महत्त्वाचें कारण म्हणजे संतांच्या जातीवरून त्यांच्या संतपणाची पारख करणाऱ्या गाजरपारखी लोकांना संतदर्शनाची योग्य दृष्टी देणें ही होय. दोषैकदृष्टि ही अत्यंत चीड आणण्यासारखी गोष्ट होय. चीड येणें हा मनुष्याचा स्वभाव–धर्म आहे. पण सज्जनांना सामान्य माणसांसारखी सहसा चीड येत नाहीं. सज्जनांना ज्या वेळीं एखाद्या गोष्टीची चीड येते, त्या वेळीं त्याबरोबरच त्यांना लोकांची कींवही येते. किंबहुना आधीं कींव येते आणि नंतर चीड येते असेंही म्हणण्यास हरकत नाहीं. श्रीसाईसच्चरितांत श्री. हेमाडपंत ऊर्फ दाभोळकर ह्यांना मधून मधून अशीच कांहीं भाविकांची चीड आणि कींव आलेली दिसते. 'साईबाबा हिंदु कीं मुसलमान ?' हा प्रश्न कोणी केला तर श्री. हेमाड-पंतांना त्याची चीड येते. अशा भावनेच्या भरांत संतांच्या जातीचा प्रश्न उपस्थित करणाऱ्या निर्बुद्धांना उद्देशून ते म्हणतातः

धर्माधर्मातीत स्थिति । जयाची शुद्ध आनंद वृत्ति
काय त्यांची पाहणें जाती । परमार्थप्राप्ति धिक् त्याची ॥ ९४ ॥(अ. ३८)

हे प्रकार पाहून चीडही येते आणि कीव ही वाटते. श्रीसाईमहाराजांसारख्या महान् संतांच्या जातीचा वाद घालण्यांत आपण निष्कारण कालापव्यय करून स्वतांची परमार्थहानि करतों, हें अजूनही कित्येकांच्या ध्यानांत येत नाहीं. हा प्रकार कांहीं नवीन नाहीं; हा मनुष्यस्वभावाचा दाखला पुरातन आहे. एवढ्याचकरितां संत ह्या बाबतींत भाविकांना आजपर्यंत इषारा देत आलेले आहेत. ही गोष्ट जनाबाईंच्या अंतःकरणास शल्यासारखी बोंचत होती. ह्या मानवी स्वभावाची चीड आल्यामुळें संत जनाबाईंनीं मोठ्या सात्विक आवेशानें सांगितलें कीं,

चोखामेळा अनामिक । भक्तराज तोचि एक ॥ १ ॥
परब्रह्म त्यांचे घरीं । न सांगतां काम करी ॥ २ ॥
रोहिदास तो चांभार । पाहें मोमिन कबीर ॥ ३ ॥
नेमी जनी नीच दासी । रंगीं वेढी नांगरपिशी ॥ ४ ॥

मनुष्याचा स्वभावच असा आहे कीं, तो बाहेरच्या भपक्यावर भुलून जातो. एखाद्या लेखकाच्या नांवामागें बी. ए., एम्. ए., इत्यादि पदव्यांची जंत्री असली कीं, मनुष्य थक्क होतो ! मग तो लेख कितीही गचाळ असेना. त्या लेखांत काय आहे हें पाहण्याचें तारतम्य सामान्य लोकांना नसतें. उलट अशा लेखकाचा लेख अगदीं गचाळ आहे, असें जरी त्यांना सांगितलें तरी ते लगेच स्मितपणें म्हणतात, ' अहो पण तो लेखक एम्. ए. आहे, बरं का ! '. व्याख्यान–प्रवचनांचीही तीच स्थिति. लोक बाहेरच्या रंगावर आपली फसवणूक करून घेत असतात. अंतरंगाचें स्वारस्य सोडून बाहेरच्या रंगावर भुलून आत्मनाश करणाऱ्या लोकांची चीड येणें आणि त्यांच्याबद्दल कींवही वाटणें साहजिक आहे. अशा ह्या आत्मघातकी मानवी वृत्तीची कींव वाटूनच संत चोखोबांनीं त्यांना उपदेश केला कीं,

ऊंस डोंगा परी रस नोहे डोंगा ॥
काय भुललासी वरिलीया अंगा ॥
× × ×
चोखा डोंगा परी विठ्ठल नाहीं डोंगा ॥
काय भुललासी वरिलीया अंगा ॥

संत कोणत्या जातींत जन्मतात आणि शेवटीं विलीन होतात, हें जातीचें रहस्य ज्ञानेश्वरीच्या १२ व्या अध्यायांत मोठ्या मार्मिकपणें विशद केलें आहे. तें असें :

इंद्रियें न कोंडी । भोगातें न तोडी ।
अभिमान न संडी । स्वजातीचा ॥ ११५ ॥
कुळधर्मचाळी । विधीनिषेध पाळी ।
मग सुखें तुज सरळी । दिधली आहे ॥ ११६ ॥

परि मनें वाचा देहें । जैसा जो व्यापार होये ।
तो मी करीत आहें । ऐसें न म्हणे ॥ ११७ ॥
करणें कां न करणें । हें आघवें तोचि जाणे ।
विश्व चळतसे जेणें । परमात्मेनि ॥ ११८ ॥
उणे या पुरे याचें कांहीं । उरों नेदी आपुला ठायीं ।
स्वजाती करूनि घेई । जीवित हें ॥ ११९ ॥

श्रीज्ञानेश्वरमहाराजांनीं वरील ओंव्यांत श्रीकृष्णानें अर्जुनाला केलेल्या या उपदेशांत 'स्वजाति' हा शब्द ११५ आणि ११९ ह्या दोन ओव्यांत अत्यंत अर्थबोधकतेनें योजिलेला आहे. जन्मजात अशा 'स्वजातीं'तून निःश्रेयस अशा 'स्वजातीं'त जे पदार्पण करितात ते संत.

ज्या जातींत संत जन्मजात ती त्यांची जन्मजात. पण भक्तीच्या द्वारें हीं जातीचीं अविद्यामूलक व मिथ्या बंधनें तोडून ते विश्वात्मक अशा ज्यां 'स्वजातीं'त समरस होतात ती जात कोणती? येथें 'स्वजाति' 'स्वजाति' ह्या शब्दांवर श्लेष आहे. हा श्लेष संतांची जात विचारणाऱ्या लोकांनीं मनन करण्यासारखा आहे. ह्या पारमार्थिक व निःश्रेयसात्मक अशा 'स्वजाति' शब्दांतील 'स्व' या पदावर 'स्व शब्देनैव च सर्वज्ञ ईश्वरो जगतः कारणमिति श्रूयते' म्हणजे 'स्व' शब्दानें सर्वज्ञ, सर्वसमर्थ ईश्वर ह्या जगाचें कारण होय, असें श्रुतिवचन आहे. कारण 'आत्मा एव आत्मरूपः' या सत्याप्रमाणें संत हे नेहमीं परमात्मस्वरूपांतच असतात. ह्याच स्थितीला ज्ञानेश्वरमहाराज आपलें जीवित 'स्वजाति' करून घेणें असें म्हणतात. अशा सच्चिदानंद स्वरूपांत अहर्निश रंगून गेलेल्या संतांची जात विचारणें म्हणजे कमालीचा अप्रबुद्धपणा होय. संतकवि श्रीहिरोबानाथ आंबिये यांच्या सुप्रसिद्ध व रसाळ उक्तीप्रमाणें

हरिभजनावीण काळ घालवूं नको रे ॥ ध्रु० ॥
दोरीच्या सापा भिउनी भवा । भेट नाहीं जीवा शिवा ॥
अंतरींचा ज्ञान दिवा । मालवूं नकोरे ॥ १ ॥

हा एकच संदेश जगाला देणाऱ्या संतांना अनन्य भावानें शरण जाऊन आपल्या जीविताचें सार्थक करण्याऐवजीं संतांच्या जातीचे कसले वाद घालतां? जातीयता अंतर्बाह्य आत्मघातकी आहे. विशेषतः संतसमागमाच्या व कृपेच्या दृष्टीनें ही जातीय दृष्टी निखालस अधःपात करणारी आहे, हें भक्तांनीं केव्हांही विसरतां कामा नये.

~~~~ ✻ ✻ ~~~~

ईश्वराला सोडून ऐहिक वस्तूंच्या मागें लागणें म्हणजे हिऱ्यांची खाण सोडून कांचेचे मणि शोधीत फिरण्यासारखें आहे.

—स्वामी विवेकानंद
~~~~

श्रीसाईभक्तांना खुष-खबर

## दसरा आणि दीपावली

म्हणजे

आनंदोत्सवाचा सुखसोहळा
अशा या आनंदोत्सवांत

## श्रीसाईबाबांसंबंधी

खड्या आवाजांत गाइलेलें गाणें श्रीसाईभक्तांच्या घरांत
आनंदाचा व भक्तिरसाचा मळा अवश्य फुलवील.

मा. हबीब कवाल निझामी

GE 23056 } साईबाबा की लिलायें
शिरडीमें साईनाथ

"HIS MASTER'S VOICE"
*The Hallmark of Quality*

*ISSUED BY:—*

**The Gramophone Co. Ltd.**
**Columbia Graphophone Co. Ltd.**
**Calcutta, Bombay, Madras, Delhi.**

॥ श्री साईनाथ प्रसन्न ॥

# बॉम्बे सिल्व्हर शॉप

टेलिफोन : २६१६२

शुद्ध चांदीचा हरेक तऱ्हेचा माल बनविण्याचें व ऑर्डरप्रमाणें माल करून देण्याचें विश्वासलायक ठिकाण. त्याचप्रमाणें सोन्याचाही माल ऑर्डरप्रमाणें करून देण्यांत येतो. एकदां भेट देण्याची तसदी घेऊन खात्री करून घेण्याची विनंती आहे.

**दसरा दिपवाळी सण जवळ आले, तरी मनपसंत माल तयार करून घ्या**

गिरगांव मांगलवाडी,
श्री धूतपापेश्वर प्रासाद
मुंबई नं. ४

बा. गो. जुवेकर
मालक

• प्रत्येक व्यक्तीच्या मनांत 'मी आणि माझें' हाच विचार प्रामुख्यानें असतो. म्हणून ध्यानपूर्वक आत्मशोध केल्यानेंच सत्याचें-सत्स्वरूपाचें ज्ञान होतें अशी श्री साईबाबांची शिकवण आहे....

# आत्म विद्या

★

: लेखक :

ना. वा. गुणाजी

बेळगांव

★

**प्रास्ताविक**

आत्मविद्या म्हणजे आत्म्याला जाणणें-आत्मज्ञान प्राप्त करून घेणें. इतर विषयांचें ग्रहण करणें, त्यांचें ज्ञान प्राप्त करून घेणें यालाहि ज्ञान म्हणतात; पण हें साधें विषयज्ञान होय. पण आपली दृष्टि उलट फिरवून आपल्या आत्म्याचें ज्ञान प्राप्त करून घेणें याला खरें ज्ञान-विज्ञान असें म्हणतात. आम्हांला जो विचार करावयाचा आहे तो याच खऱ्या ज्ञानाविषयीं होय. श्रीमगवद्गीतेंत या ज्ञानाची महती अशी वर्णन केलेली आहे कीं, द्रव्यमय यज्ञापेक्षां ज्ञानमय यज्ञ श्रेष्ठ आहे; कारण सर्व कर्मांचें पर्यवसान ज्ञानांत होतें; आणि या लोकीं ज्ञानासारखें पवित्र असें दुसरें कांहीं नाहीं.

फार प्राचीनः कालापासून अशी समजूत प्रचलित झालेली आहे कीं, आत्मज्ञानाचा मार्ग फार कठिण व बिकट आहे. 'क्षुरस्य धारा निशिता दुरत्यया दुर्गं पथस्तत्कवयो वदन्ति' (कठोपनिषत्-१-३-१४) आत्मज्ञानाचा हा मार्ग तरवारीच्या धारेवर चालण्यासारखा कठिण आहे असें श्रुति सांगते. 'परमार्थाचा पंथ बिकट हा, ना कळे जना' असें हल्लींहि बहुतेक लोक समजतात, आणि यामुळें हजारों लोकांत एखाद्या हरीचा लाल या मार्गाचा अवलंब करण्यांस सिद्ध होतो.

पण श्रीरमणभगवान असें सांगतात कीं, अशी वस्तुस्थिति असूं शकेल. तथापि याचें कारण या मार्गांत फार कष्ट किंवा प्रयत्न करावे लागतात आणि ते कोणाच्या हातून होत नाहींत हें नसून, अज्ञान हेंच याचें कारण आहे.

म्हणून 'किती सुलभ असे हा मार्ग सच्छिष्यराया' हा श्री बांदकराचा, आणि 'आत्मविद्या (आत्मज्ञान) अति:सुलभ आहे' हा श्रीरमणभगवानाचा संदेश किती स्फूर्तिदायक आहे! तृषेनें अत्यंत व्याकुळ झालेल्यांना जसें जीवन, तसा संसारांत त्रस्त झालेल्या जीवांना हा संदेश अमृतासारखा आल्हादकारक वाटतो.

आतां याविषयीं श्रीसाईबाबांची आणि श्रीरमणभगवानांची मुख्य शिकवण काय आहे हें पाहूं.

श्रीसाईबाबा

मिसेस मनी साहुकार या विदुषी बाईनें नुकताच 'शिरडीचा संत' या नांवाचा एक इंग्रजी ग्रंथ लिहून प्रसिद्ध केला आहे. त्यांत सातव्या अध्यायाचे आरंभीं श्रीसाईबाबांची शिकवण याविषयीं त्या लिहितातः—

'आपल्या ऐहिक लीलामय जीवनयात्रेंत सद्गुरु श्रीसाईबाबा यांनीं आपल्या भक्तांना पुनः पुनः असा उपदेश केला आहे कीं, त्यांनीं आपला आत्मा जाणण्यांत, आपला सर्व वेळ, सर्व शक्ति आणि सर्व विचार खर्च केले पाहिजेत. आत्म्यामध्यें स्थिर आणि युक्त राहणें—सदा आत्मनिष्ठ राहणें याचाच त्यांनीं नेहमीं प्रचार (उपदेश) केला आहे. प्रत्येक व्यक्तीच्या मनांत, शेवटीं 'मी आणि माझें' हाच विचार प्रामुख्यानें असतो. म्हणून ध्यानपूर्वक आत्मशोध केल्यानेंच सत्याचें—सत्स्वरूपाचें ज्ञान होतें अशी श्रीसाईबाबांची शिकवण आहे. 'मी कोण' याचा विचार करा असें त्यांनीं पुनः पुनः बजाविलें आहे. एकदां एका भक्ताला ते म्हणाले कीं, 'आधीं आपण आत्म्याला जाणलें—आत्मज्ञान प्राप्त करून घेतलें कीं, बाकी सर्व गोष्टींचा साक्षात्कार होतो.'

श्रीसाईसच्चरितांत (अध्याय ४४) असाच उपदेश आहे—

'विना अभिमान' अणुप्रमाण। मज हृदयस्था यावें शरण। होईल अविद्या तात्काळ निरसन। श्रवणकारण संपेल ॥ १६० ॥ अविद्या प्रसवे देहबुद्धि। देहबुद्धिस्तव आधिव्याधि। तीच कीं लोटी विधिनिषेधीं। आत्मसिद्धीविघातक ॥ १६१ ॥ म्हणाल आतां मी आहें कोठें। आतां मी तुम्हां कैसा भेटें। तरी मी तुमचिया हृदयींच तिष्ठें। विनाकष्टें सन्निकट ॥ १६२ ॥ म्हणाल हृदयस्थ कैसा कोण। कैसें काय त्याचें लक्षण। ऐसी काय तयाची खूण। जेणें त्या आपण जाणावें ॥ १६३ ॥ तरी व्हावें दत्तावधान। परिसा तयाचें स्पष्ट व्याख्यान। जयालागीं जाणें शरण। तो हृदयस्थ कोण हें आतां ॥ १६४ ॥ नाना नामें नाना रूपें। सृष्टामाजीं भरलीं अमूपें। जयांचीं कवणा न करवती मापें। मायेचीं स्वरूपें तीं अवघीं ॥ १६५ ॥ तैसेंच सत्व–रज–तम–गुण। तयां त्रिगुणां ओलांडून। सत्तेचें जें स्फुरण। तें रूप जाण हृदयस्थाचें ॥ १६६ ॥ नामरूपविरहित पण। उर्वरित जें तुझें तूंपण। तेंच हृदयस्थाचें लक्षण। जाणूनि शरण त्या जावें ॥ १६७ ॥ मीच तो तूं ऐसें पाहतां। हीच दृष्टी पुढें विस्तारतां। भूत मात्रीं ये निजगुरुता। ठाव न रिता मजविना ॥ १६८ ॥ ऐसा अभ्यास करितां करितां। अनुभवा येईल माझी व्यापकता। मग तूं मजसी पावुनि समरसता। पूर्ण अनन्यता भोगिसील ॥ १६९ ॥ चित्स्वरूपीं अनुसंधान। लाधेल होशील शुद्धांतःकरण। घडेल हें तुज गंगास्नान। गंगाजीवन न्हातळतां ॥ १७० ॥ प्रकृतिकर्माचा अभिमान। जेणें पावे दृढबंधन। तया विलगूं न देती सज्ञान। अंतरीं सावधान सदैव ॥ १७१ ॥ स्वस्वरूपीं मांडून ठाण। चळे न तेथून अणुप्रमाण। तया समाधि वा उत्थान। नाहीं प्रयोजन उभयांचें ॥ १७२ ॥'

श्रीसाईबाबांचा हा उपदेश पाहिला आणि श्रीरमणभगवानांचाहि (पुढें देण्यांत येणारा) उपदेश पाहिला म्हणजे हे दोन्ही उपदेश सारखेच—एकाचेच आहेत असें वाटतें. श्रीसाईलीलेच्या मागील (वर्ष ३०, अंक २ रा) एप्रिल, मे, जून १९५३ च्या

अंकांत 'बाबांच्या प्रतिमेंत रमणमहर्षींचें दर्शन' हा श्रीमती सुशिलादेवी मत्कल यांचा एक लेख प्रसिद्ध झाला आहे (पान १३). त्यांत 'रमणमहर्षि व साईबाबा एकच होत' असें मद्रासकडील दोन गृहस्थ भक्तांचें म्हणणें आणि शिरडीस गुरुपादुकेंजवळील शंकराच्या पिंडीमागें असलेल्या बाबांच्या फोटोंत प्रत्यक्ष रमणमहर्षींचेंच दर्शन झालें असा श्रीमती सुशिलादेवी मत्कल यांचा अनुभव प्रसिद्ध झाला आहे.

आम्हांलाहि असें वाटतें कीं, श्रीसाईबाबा आणि श्रीरमणभगवान हे दोघे देहानें जरी भिन्न दिसले तरी ते आपल्या सत्स्वरूपानें—आत्मस्वरूपानें एकच आहेत. आतां पुढें दिल्या जाणाऱ्या श्रीरमणभगवानांच्या आत्मविद्येवरून कोणीहि याविषयीं आपली खात्री करून घ्यावी.

## आत्मविद्यापंचश्लोकांची निर्मिति

श्रीरमणभगवानांच्या आत्मविद्येंत अवघे पांच श्लोक आहेत. हें प्रकरण कसें निर्माण झालें ही कथा मनोवेधक आहे. श्री मुरुगनार नांवाचे त्यांचे एक तामिल कविभक्त ध्यानमंदिरांत एकदां त्यांचेसमोर हातांत एक कागदाचा चिटोरा घेऊन बसलेले होते. त्या चिटोऱ्यावर एकदोन ओळी लिहिलेल्या असून त्यांकडे ते पहात विचारमग्न झालेले दिसले. अपार दयेनें प्रेरित होऊन भगवानांनीं त्यांना विचारलें कीं, त्या चिटोऱ्यावर काय लिहिलेलें आहे ?

'ऐय्ये अतिसुलभं आत्मविद्ये—ऐय्ये अतिसुलभम्' असें एका ओळीचें ध्रुवपद त्यावर लिहिलेलें होतें. पण कितीहि प्रयत्न केले तरी त्यापुढें त्यांची लेखणी चालेना. म्हणून ते तसेच विचारमग्न व निरुत्साह होऊन बसलेले होते. भगवानांनीं तें ध्रुवपद पाहिलें. त्यांना तें फार आवडलें आणि लगेच अत्यंत प्रासादिक आणि अर्थपूर्ण असे पांच श्लोक रचून त्यांनी ही पंचश्लोकी आत्मविद्या तयार केली.

आत्मविद्या जर इतकी सुलभ आहे तर हे पांच श्लोक तरी रचा आणि लिहा कशाला ? असा प्रथम आक्षेप कोणीहि वाचक घेईल. हा आक्षेप योग्य व विचारार्ह आहे. त्या तामिल कविभक्ताला 'अतिसुलभ' वाटलेल्या आत्मविद्येबाबत पुढें कांहींच लिहितां येईना, यावरून ही गोष्ट वाटते तितकी सोपी नाहीं म्हणून पंचश्लोक रचावे लागले हें सांगणें जरूर आहे.

मूळ पंचश्लोक देण्यापूर्वी दुसऱ्या कांहीं आक्षेपांविषयीं आणि प्रास्ताविक गोष्टींविषयीं विचार करूं.

आत्मा हा एकच आहे हें जर खरें, तर आत्मा एक, आत्मविद्या दुसरी आणि ती विद्या जाणणारा तिसरा ही काय भानगड आहे ? यावर भगवानांचें म्हणणें असें आहे कीं, यांत भानगड कांहीं नाहीं. खरोखर याला विद्या असें म्हणतां येणार नाहीं. पण एकदां आम्हीं आपलें मौन सोडलें आणि त्या एकमेवाद्वितीय अशा अनिर्वचनीय आत्म्याला व्यक्त करण्याचा विचार केला कीं, मायेचें प्रथम पटल किंवा आवरण तयार झालें असें समजावें. मौन सोडून विचाराच्या किंवा कल्पनेच्या चेंडूला एकदां आम्हीं गति दिली कीं, त्याला आपल्या 'गोल'ला—ध्येयाला पोंचविलें पाहिजे. याकरितांच या पंचश्लोकांची आवश्यकता आहे.

सद्वस्तु किंवा आत्मा आहे कीं नाहीं असा विचार आमच्या मनांत येतांच आम्हीं आमच्या उच्च अगर मूळ पदावरून खालीं येतों, आणि अस्तिपक्ष किंवा नास्ति पक्ष सिद्ध करूं लागतों. सद्वस्तूचें अस्तित्व शब्दांनीं सिद्ध करूं पाहणाऱ्याला आपण काय म्हणतों याची योग्य जाणीव नसते; आणि तिचा अभाव शाबित करूं पाहणारा तर स्वतःचें हांसें करून घेतो. कारण अभाव शाबित करण्याच्या प्रयत्नांतच तो स्वतःचें –आत्म्याचें अस्तित्व सिद्ध करतो. एवंच सद्वस्तु म्हणजे आत्मा इतका प्रत्यक्ष आहे कीं, त्याच्याविषयीं यत्किंचित्‌हि शंका घेण्याचें कारण नाहीं.

आतां आपण मूळ पंचश्लोकांचा थोडक्यांत विचार करूं. ध्रुवपदांत प्रथम असें सांगितलें आहे कीं, सद्वस्तु ही इतकी प्रत्यक्ष व समीप आहे कीं, त्या मानानें हस्तामलक–तळहातावरील आंवळाहि मिथ्या होईल. कारण हस्तामलकाचें ज्ञान अनेक गोष्टींवर अवलंबून आहे. प्रथम आंवळा धारण करणारा हात पाहिजे आणि त्या हाताचे स्नायु व मज्जातंतू सशक्त व कार्यक्षम पाहिजेत, आंवळा दाखविणारा प्रकाश हवा, तसेंच आवळ्याचे आणि तत्सम पदार्थांचे गुणधर्म ,माहित असले पाहिजेत. इतक्या सर्व गोष्टी ठाकठीक जमल्या तर हस्तामलकाचें यथार्थ ज्ञान होईल. पण आत्म्याचें ज्ञान होण्याला इतक्या उपाधि नकोत. आपल्या अस्तित्वाची जाणीव नसणारा असा कोणीतरी इसम तुम्हीं पाहिला आहे काय ? स्वतःची जाणीव सर्वांना–लहान मुलांनाहि असतेच. 'मी' हें जाणीवेचें केंद्र असून तो अर्भकाचे तोंडींहि प्रथम येतो. म्हणून ध्रुवपदांत सांगितलें आहे कीं, कितीहि लहान क्षुद्र प्राणी असो, त्याला आपल्या स्वतःचें–आत्म्याचें इतकें ज्ञान असतें कीं, त्या मानानें हस्तामलकहि मिथ्या म्हणतां येईल. यावरून भगवानांच्या मतें मनुष्य प्राणी, मग तो कितीहि लहान अगर क्षुद्र असो, आत्मज्ञानाचा अधिकारी आहे.

यावर कोणी असें विचारील कीं, जर आत्मा इतका प्रत्यक्ष, सत्य आणि समजण्यास सुलभ आहे तर प्रत्येकजण आत्मज्ञानी कां नाहीं ? याचें उत्तर पहिल्या श्लोकांत दिलेलें आहे. तें असें कीं:–आत्मा हा नित्य, सत्य व अविनाशी असला तरी त्याला विचार किंवा वृत्ति झांकून टाकितात. येथें हें लक्ष्यांत ठेविलें पाहिजे कीं, विचार किंवा वृत्ति ही मिथ्या आहे, आणि ही मिथ्या वृत्ति देह व जगत् या मिथ्या द्वन्द्वाला उत्पन्न करिते, आणि नंतर देह आणि जगत् हे सत् ( नित्य शाश्वत ) म्हणून मिरवूं लागतात. वृत्तीची उत्पत्ति तमांतून– अज्ञानांतून होते आणि तमाचा पूर्ण निरोध झाला म्हणजे आत्मा हीच काय ती नित्य शाश्वत वस्तु–सद्वस्तु आहे असा अनुभव येतो. येथें हेंहि नीट ध्यानांत ठेविलें पाहिजे कीं, तम हें मिथ्या आहे व याची योग्य कल्पना येण्यासाठीं या श्लोकांत आत्म्याला हृदयाकाशादित्याची उपमा दिलेली आहे. येथें हृदयाकाशादित्य हा सामासिक शब्द म्हणून वापरलेला नसून तो एकच शब्द आहे असें समजावें. हृदय–आकाश–आदित्य हे शब्द समानार्थी असून त्यांचा अर्थ आत्मा असा आहे. आदित्याचा–सूर्याचा उदय झाला कीं, तम— अज्ञान राहणें शक्य नाहीं. सूर्य अंधार दूर करितो ही भाषाहि योग्य नाहीं. कारण सूर्य,

अंधार हे दोन पदार्थ एके ठिकाणीं येणें किंवा असणें शक्य नाहीं. तेव्हां हृदयाकाशादित्य हा पूर्वी असलेल्या तमाला–तिमिराला दूर करितो हें म्हणणेंहि बरोबर नाहीं. खरें पहातां तमाला–तिमिराला खरें अस्तित्व नाहीं.

दुसऱ्या श्लोकांत मिथ्या तमोभावाचें स्पष्टीकरण केलें असून हृदयाकाशादित्याचा अनुभव कसा येतो हें सांगितलें आहे. तम किंवा अज्ञान याची सर्व मदार किंवा भर 'मी हा मांसमय देह आहें' या भावनेवर आहे. हा 'मी' एका गूढ अनिर्वचनीय तऱ्हेनें या जड शरीराला जखडून घेतो. मी किंवा अहंवृत्ति ही प्रत्येक विचाराची जननी असते. इतकेंच नव्हे, तर सर्व विचार मालेंतील सूत्राप्रमाणें एका अहंवृत्तीवर उभारलेले असतात. विचारांची अनंत परंपरा आपल्या काबूंत ठेवितां येणार नाहीं म्हणून घाबरण्याचें कारण नाहीं. 'मी कोण' व 'आलों कोठून' याचा शोध करीत त्याला–'मी'लाच घट्ट पकडावें असा इषारा येथें देण्यांत आलेला आहे. विचारांचा मूळ उगम जो 'मी' त्याला एकाग्र मनानें पकडून ठेवणें हाच खरा शोध होय. मनानें या 'मी'लाच धरून ठेविल्यानें इतर सर्व विचार आपोआप मावळतात, आणि यानंतर 'अहंस्फूर्ति' उदयास येते, आणि हीच सद्वस्तु होय असा अनुभव येतो. या अवस्थेंत मनाचें अस्तित्व नसतें. यालाच खरें मौन म्हणजे खरी चित् असें म्हणतात.

तिसऱ्या श्लोकांत सांगितलें आहे कीं, आत्मज्ञान हें सर्वांत श्रेष्ठ ज्ञान आहे. मुख्य गोष्ट ही कीं, ज्ञाता किंवा द्रष्टा म्हणजे मीच कोणताहि पदार्थ जाणणारा आहे, म्हणून 'मी'चें ज्ञान–आत्मज्ञान हेंच महत्त्वाचें आहे. ज्याचेकरितां इतर सर्व पदार्थ आहेत त्याचा म्हणजे द्रष्ट्याचा अनुभव आल्यावर त्याला सोडून इतर क्षुल्लक गोष्टीं-मागें कोण लागणार? भिन्न भिन्न प्राण्यांमध्यें व्यक्त होणारी ही अभिन्न–म्हणजे एकच शक्ति–आत्मशक्ति होय. परमात्म्याच्या कृपेनें ही व्यापक दृष्टी प्राप्त होते; म्हणून त्याच्या कृपाविलासाचा उल्लेख या श्लोकांत केलेला आहे. या व्यापक दृष्टींत अहंनाशाचा समावेश होतो. अहंकार हा सर्व दुःखाचें कारण असल्या-मुळें त्याचा नाश झाला म्हणजे सर्व दुःखांचा परिहार होऊन शाश्वत सुखाचा–सुखविकासाचा अनुभव येतो.

चवथ्या श्लोकांत प्रथम सांगितलें आहे कीं, कर्मबंध तोडण्याला आणि जन्मपरंपरा नाहींशी करण्याला अहंविनाशाचा हा मार्ग सर्वांत सोपा आहे. दुसऱ्या श्लोकांत सांगित-लेल्या 'आत्मविचार'–साधनाशिवाय कोणत्याहि साधनांचा अभ्यास करणाऱ्या साधकाला 'अहं'ची जरूरी असते. इतर सर्व साधनांत 'मी' ची आवश्यकता असते, किंवा 'मी' त्यांत मुख्य असतो. आत्मविचारांत असें नसतें. तेथें मूळ बीजाचा म्हणजे अहंकाराचा नाशच होतो. येथें मन किंवा अहंकार म्हणून कांहीं शिल्लक राहत नाहीं. अर्थात् जेथें 'मी' नाहीं तेथें कांहीं कर्तव्यहि नाहीं. 'वाङ्मन काय' याचें कोणतेंहि कार्य करितां येत नाहीं आणि करण्याची जरूरीहि नाहीं. येथें आपण आहों तसें शांत व स्वस्थ रहावें म्हणजे झालें. ('न कल्पित उगीच रहा'–बांदकर) म्हणून हा मार्ग सर्वांत सोपा अतिसुलभ नाहीं काय? खरोखरच हा मार्ग सर्वांत श्रेष्ठ आणि प्रभावशीलहि आहे.

कोणत्याहि कर्मावर आत्मविचार अवलंबून नसल्यामुळें त्याचें फलहि दुसऱ्या कशावर अवलंबून नसतें. म्हणून आत्मानुभव म्हणजे नित्यानुभूति यांत (अहंस्फूर्तींत) द्वैताचा –द्वैतभावनेचा संपर्कहि नसल्यामुळें येथें मतीला मुळींच वाव नाहीं. नित्यानुभूति म्हणजे अभयतेची प्राप्ति, आणि हींच आनंदसागराची भरती.

पांचव्या श्लोकांत आत्म्याला चक्षूची–मनश्चक्षूची आणि आकाशाची–मनाकाशाची उपमा दिली आहे. पहिली चित्स्वरूपाची आणि दुसरी सत्स्वरूपाची उपमा होय. चक्षुशिवाय इतर पदार्थ दिसत नाहींत; पण चक्षूच्या मागें मन तत्पर व कार्यक्षम असल्याशिवाय चर्मचक्षु काम करीत नाहीं. म्हणून मन हें चक्षुरिंद्रियाचें चक्षु होय. येथें सर्व इंद्रियांचा प्रतिनिधि म्हणून चर्मचक्षूचा उल्लेख केलेला आहे. चक्षुरादि इंद्रियांमुळें आकाशांतील सर्व पदार्थ दृग्गोचर होतात. ज्याप्रमाणें पदार्थ दृग्गोचर होण्याला आकाशतत्त्व आहे, त्याप्रमाणें मनाचे व्यापार (चित्ताकाश) दृग्गोचर होण्याला हृदयाकाश (चिदाकाश) असतें. या हृदयाकाशाचा (स्वयंप्रकाश अरुणाचलात्म्याचा) अनुभव मन हृदयांत लीन व स्वस्थ झाल्यावर येतो; म्हणजे आत्मा व परमात्मा हे एकच आहेत, आत्मा तोच परमात्मा असा प्रत्यय येतो. असा अनुभव येण्याला परमात्म्याच्या कृपेची आवश्यकता आहे. कठोपनिषदांत सांगितल्याप्रमाणें परमात्मा ज्याला पसंत करील त्यालाच तो आपल्या स्वरूपाचा अनुभव देतो. म्हणून परमात्म्याच्या भक्तीनें त्याची कृपा संपादन करून आनंदानुभव मिळवा.

इतका सर्व प्रास्ताविक संकेत (अर्थ) लक्ष्यांत आणून आत्मविद्या–पंचश्लोकी अवश्य पहावी.

## श्री रमण भगवानकृत आत्मविद्या

(अनुवादक : श्रीरामकवि)

(चाल—यशोदे, बाळ तुझा कान्हा)

अति अति सुकरचि आत्म्याची।
विद्या बघ रे मोक्षाची।
अति मंद तरी मूढांना।
आत्मा प्रत्यक्षचि त्यांना।
करतळिं आंवळा डोलतसे।
उपमे घेतां भ्रम भासे।
सच्चिद्घन हा नित्य जरी।
आत्मा तेवी अविकारी।
मिथ्या जग तनु कुठुनि तरी।
यंठनि भासति स्वप्नापरी।

नाशी मिथ्या तमभाव ।
आत्मा प्रगटे स्वयमेव ।
सच्चिदानंद हा पूर्ण असा ।
हृदयाकाशरवी रविसा ।
नाशी तिमिरा दुःखविकारा
सुखसागरा भरती येई लाटांची ।
विद्या बघ रे मौलाची ॥ १ ॥

देह मांसमय मीच्चि असे ।
अशी भावना मनीं वसे ।
सूत्रीं यांच्च विचारांची ।
ग्रथिली माळ जणुं पुष्पाची ।
अंतरि शोधें बुडुनि जरी ।
कोण ? कुठुनि ? मी अशा परी ।
विचार सारे मावळती ।
आत्मज्ञानाची स्फूर्ती ।
'मी मी' म्हणुनी प्रगटतसें ।
हृत्कुहरी जी नित्य वसें ।
हें मौन असीम । हें एक व्योम ।
हें पर सुखधाम । वार्ताहि नसे दुःखांची ॥
विद्या बघ रे मौलाची ॥ २ ॥

आत्मा वगळुनि इतरांतें ।
कांय जाणुनि फळ मिळतें ।
जरी जाणिलें आत्म्याला ।
कांय उरे जाणण्या तुला ।
भिन्न प्राण्यांमध्यें वसे ।
अभिन्न वस्तु एक रसें ।
स्वांतरिं जरि तो वस्तु दिसे ।
स्वप्रभ आत्मा तळपतसे ।
हा कृपाविलास । हा अहंविनाश ।
हा सुखविकास । प्रभा उजळी चित्सूर्याची ॥
विद्या बघ रे मौलाची ॥ ३ ॥

कर्मबंध हा तोडाया ।
जन्ममृत्युहीं नाशाया ।
बहुत मार्ग हे असति जरी ।

अति सोपा हा मार्ग परी।
वाणी तनु मन, कर्मांचा।
यदा नुरे अंशहि त्यांचा।
केवळ राहे शांत सदा।
आत्मस्थित अविकारी तदा।
हृदयिं स्फुरतसे चित्स्फूर्ती।
आत्मज्योतीची दीप्ति।
ही सदानुभूति। नच रुव भीति।
सदैव भरती। स्वानंदामृत सिंधूची॥
विद्या बघरे मोलाची ॥ ४ ॥

मनोदृष्टिची जी दृष्टि।
चक्षुरादि इंद्रियसृष्टि।
ज्याच्या तेजें प्रकाशती।
या आत्म्याची चिज्ज्योति
भूमि अनल जल वायु नभा।
तीच होउनी मन-आकाश।
प्रगटवी सारा विश्वविकाश।
केवळ नर जरि असे तसा।
निवातिं राहे दीप जसा।
दवडुनि सारे अन्य विचार।
स्वरूप स्वाभाविक अविकार।
नित्य उषा आनंदाची।
अरुणाचल स्वप्रभ रविची।
हा कृपा करी। जरी भक्ति बरी।
मग अमित करीं। करी उषा आनंदाची।
विद्या बघ रे मोलाची ॥ ५ ॥

**आत्मज्ञानाचा अधिकारी**

आत्मविद्या, आत्मज्ञान हा विषय इतका पवित्र आणि महत्त्वाचा आहे, तर त्याविषयीं अधिकारी :कोण, त्याची कसोटी काय असा प्रश्न विचारतां, श्री रमणभगवानांनीं उत्तर दिलें कीं :—

देहनश्वरताबुद्धे वैराग्याद्विषयेषु च ॥
एताभ्यामेव लिंगाभ्यां ज्ञेया स्वस्याधिकारता ॥

—श्रीरमणगीता. ७–११

अर्थ :– देहाच्या ठिकाणीं नश्वरबुद्धि आणि विषयाविषयींचें वैराग्य या दोन लक्षणांवरून आपला अधिकार आपण ओळखावा.

शेवटीं हा विषय इतक्या महत्त्वाचा असल्यामुळें श्रुतीनेंही याविषयीं संदेश दिला आहे, तो सांगून हा विषय संपवितों.

' आत्मानं वा विजानथ अन्या वाचो विमुंचथ '

— मुंडकोपनिषत् ( २-५ )


अर्थ :– आत्म्याला जाणा,–आत्मज्ञान प्राप्त करून घ्या–इतर वायफळ गोष्टी सोडून द्या.

काळ जातो क्षणक्षणा । मूळ येईल मरणा ॥
कांहीं धांवाधांव करी । जंव तो काळ आहे दुरी ॥
मायाजाळीं गुंतलें मन । परी हें दुःखासी कारण ॥
सत्य वाटतें सकळ । परि जातां बाहीं वेळ ॥
रामीरामदास म्हणे । आतां सावधानी होणें ॥

## लेखकांना आग्रहाची विनंती

श्रीसाई लीलेकरतां कसलाहि मजकूर पाठवितांना तो कागदाच्या एकाच बाजूला सुवाच्य लिहून पाठवावा. दोन्ही बाजूस लिहिलेला मजकूर छपाईसाठीं पाठवावयाचा असला म्हणजे तो पुन्हां लिहून काढावा लागतो व हें काम त्रासाचें होऊन बसतें. यासाठीं आपला लेख एकाच बाजूला लिहून पाठविण्याची सर्व लेखकांना आग्रहाची विनंती आहे.

॥ श्रीसाईनाथ ॥



आमचे येथें सर्व प्रकारचे आधुनिक पद्धतीचे चष्मे, माफक किंमतींत तयार करून मिळतात. एकदां आमचे दुकानीं येऊन खात्री करून घेण्याची विनंती आहे.

शेंडे आणि कंपनी, चष्म्यांचे व्यापारी

बोरभाट लेन, गिरगांव, मुंबई ४,

श्री साईबाबा प्रसन्न

## नाडकर्णी आणि कंपनी

( स्थापना १८९६ )

महाराष्ट्रांतील सर्वांत पहिलें खेळांच्या वस्तूंचें दुकान

- भारतीय व परदेशी खेळाचें साहित्य या दुकानीं मिळतें.
- मुंबई राज्यांतील बहुतेक शाळा–कॉलेजांना, आम्हीं क्रीडा–साहित्य पुरवितों.
- या दुकानांत खरेदी म्हणजे उत्कृष्ट माल आणि एकंदरींत पैशाची बचत यांची ग्वाही.
- मालाच्या किंमतींचा कॅटलॉग ( घाऊक व किरकोळ ) मागणी केल्यास पाठविला जाईल.

आल्हा चेंबर्स

टेलि. नं. २३०८१ धोबी तलाव, मुंबई

## आर. एन्. शिंदे ॲण्ड सन्स्

चष्म्यांचे व्यापारी

मुख्य दुकान : २०७, गिरगांव रोड, मुंबई ४

शाखा : [ १ ] चामार बाग रोड परळ, मुंबई १२.

[ २ ] मुकुंद मॅनशन न. चिं. केळकर रोड, दादर, मुंबई २८

## शंकर आणि कंपनी

व

## प्रभात प्रोसेस स्टुडिओ

लाईन, हाफ्टोन, कलर ब्लॉक मेकर्स ॲण्ड स्टीरीओ–टाईप मॅन्युफॅक्चरर्स

टेलीफोन नं. २७४६७ ] धोबीवाडी, ठाकुरद्वार रोड, मुंबई २

# संतांचा हास्यविनोद

लेखक : द. पां. खांबेटे

ईश्वरी साक्षात्कार झालेले संत अथवा सिद्ध पुरुष हे कसे असतात यांचीं वर्णनें अनेक ग्रंथांत दिलेलीं आहेत. पूर्णत्वाला पावलेल्या महत्म्यांची समत्वबुद्धि, सदयता, विषयविन्मुखता इत्यादि अनेक गुणांचें वर्णन आपल्याला आढळतें. परंतु त्यांच्या एका मोठ्या गुणाचा उल्लेख मात्र फार क्वचित् आढळतो. तो म्हणजे त्यांची विनोदप्रियता....

साक्षात्कारी पुरुष म्हटला म्हणजे, तो पहाणाऱ्याच्या अंतःकरणांत धाक उत्पन्न करणाऱ्या मुद्रेचा, गंभीर वृत्तीचा व सदैव अर्धोन्मीलित दृष्टीचा असला पाहिजे, अशी कल्पना पुष्कळदां आपल्या मनांत घर धरून असते. परंतु अनेक सिद्ध पुरुषांच्या बाबतींत ही कल्पना अगदीं चुकीची ठरलेली आढळून येते. त्यांच्या सहवासांत घालविलेला प्रत्येक क्षण हा जणूं निर्भेळ आनंदानें भरलेला असतो. तुम्हांला न समजणाऱ्या आणि रुक्ष वाटणाऱ्या भाषेंत ते बोलत नाहींत. ते असें बोलतात कीं, एका बाजूला तुमच्या अंतःकरणाला गुदगुल्या होत असतात तर दुसऱ्या बाजूला एखाद्या चिरंतन महत्त्वाच्या तत्त्वाचा ठसा तुमच्या चित्तावर उमटत असतो. सांच आणि मवाळ। मृदु आणि रसाळ। शब्द जैसे कल्लोळ। अमृताचे॥ अशी त्यांची संभाषणपद्धति असते.

श्रीसाईबाबांच्या चरित्रांत ही आनंदकर विनोदप्रियता आढळते. सहजगत्या चेष्टा करीत, स्वतः हंसत आणि दुसऱ्याला हंसवीत, एखाद्या गूढ तत्त्वाचा उपदेश इतक्या समर्पक रीत्या करतांना ते आढळतात कीं मन थक्क होऊन जातें.

**त्याला ब्रह्म हवें होतें**

उदाहरणार्थ मला त्या ब्रह्म पाहूं इच्छिणाऱ्या माणसाची गोष्ट आठवते. हा गृहस्थ घरचा चांगला खाऊनपिऊन सुखी असा होता. त्याच्या एकदां मनांत आलें कीं, साईबाबा हे मोठे ब्रह्मज्ञानी आहेत; तेव्हां आपण त्यांच्या दर्शनाला जावें आणि ब्रह्मज्ञानाची त्यांच्याकडे याचना करावी. असें ठरवून हा 'ब्रह्मार्थी' शिरडीस आला. बाबांचें दर्शन घेऊन तो त्यांच्या पायां पडला व म्हणाला, 'बाबा मला ब्रह्मदर्शनाची इच्छा आहे! खूप लांबून आलों आहे मी. प्रवासाचा अत्यंत शीण झाला आहे. पण आपल्या कृपेनें जर मला ब्रह्मप्राप्ति झाली तर माझा सर्व शीण नाहींसा होऊन मी कृतकृत्य होईन.'

बाबांनीं त्याचे हे शब्द ऐकून म्हटलें, 'अरे, कांहीं काळजी करूं नकोस तूं. तुला आतां या क्षणाला ब्रह्म दाखवितों. अगदीं रोखठोक, इथें उधारीची गोष्ट नाहीं. अरे! तुझ्यासारखे ब्रह्म मागणारे आहेत कुठें? येतात लोक ते कोणी पैसा मागतात, कोणी आपला रोग नाहींसा करा म्हणतात, कोणाला कीर्ति हवी असते, तर कोणाला मोठ्या वैभवाची हांव असते. मागतात ते सगळे सुख मागतात. नुसत्या ऐहिक सुखाच्या लालचीनें लोक शिरडीला धांव घेतात, आणि माझ्यासारख्या फकिराच्या भजनीं लागतात ब्रह्म मात्र कोणीहि मागत नाहीं. सुखार्थी माणसांचा इथें सुकाळ आहे. दुष्काळ आहे तो तुझ्यासारख्या ब्रह्मजिज्ञासूंचा. खरें सांगूं! मला अशा ब्रह्मजिज्ञासूंच्या भेटीची आस लागून राहिलेली असते. त्यामुळें तुझ्या येण्यानें आज मोठी पर्वणी लाधल्यासारखें मला वाटतें...'

बाबा हें बोलत असतांना त्यांचे सतेज डोळे मिस्किलपणानें चमकत होते काय? त्यांच्या मुद्रेवर बहुधा उमटलेल्या हास्यरेखेचा अभिप्राय इतरांच्या ध्यानांत आला होता काय? इतर माणसें म्हणजे अगदीं सामान्य आणि आपण कोणीतरी विशेष कोटींतील अशी भावना, बाबांच्या त्या शब्दांनीं निर्माण होऊन तो ब्रह्मार्थी आपल्या मनाशीं अगदीं सुखावून डौलानें आजूबाजूला पाहूं लागला असेल काय? असे अनेक विचार हा प्रसंग वाचीत असतांना माझ्या मनांत येऊन जातात!

बाबा पुढें म्हणाले, 'अरे ब्रह्मच काय, ज्यामध्यें ब्रह्माचा मूळ गाभा अथवा गुंडाळें आहे तेंच मी तुला दाखवितों. ज्याच्या गुंतागुंतीनें मन गुंगून जातें तें रहस्य मी तुला संपूर्ण उकलून दाखवितों.'

असें म्हणून बाबा थांबले. नंतर क्षणभर त्या गृहस्थाला दुसऱ्या कसल्या तरी गोष्टींत त्यांनीं गुंतविलें. क्षणभर त्याचा तो प्रश्न विसरून गेल्यासारखें त्यांनीं त्याला भासविलें. मग सहजगत्या त्यांनीं एका मुलाला हांक मारून म्हटलें, 'अरे! त्या नंदू मारवाड्याकडे जा आणि त्याला सांग कीं बाबांना पांच रुपये उसने हवे आहेत. फार निकड आहे म्हणून सांग आणि घेऊन ये.'

मुलगा त्या निरोपाप्रमाणें गेला आणि थोड्याच वेळांत परत येऊन म्हणाला, 'नंदूच्या घरीं गेलों. पण त्याच्या घराला कुलुप आहे. घरीं कोणी भेटलें नाहीं मला.'

बाबा म्हणाले, 'असें? मग बाळा वाण्याकडे जा. त्याला सांग माझा निरोप आणि झटकन् पांच रुपये घेऊन ये.'

पण त्या मुलाची ही फेरीहि फुकट गेली. बाळा वाणीहि नेमका त्या वेळीं घरीं नव्हता. मग बाबांनीं त्या मुलाला आणखी एकदोन ठिकाणीं धाडलें; परंतु त्या मुलाचे सगळे हेलपाटे फुकट गेले, व पैसे कुठेंच मिळाले नाहींत. अंतर्ज्ञानी बाबांना हें असें होणार हें काय माहीत नव्हतें? पण त्या ब्रह्मार्थी माणसाच्या डोळ्यांत अंजन घालण्यासाठीं व त्याच्या उदाहरणानें इतरांना बोध करण्यासाठीं त्यांचा हा सारा खटाटोप होता. बाबा इकडे उसन्या पैशांसाठीं त्या मुलाला हेलपाटे

घालायला लावीत होते; व त्यांत वेळ चाललेला पाहून इकडे या गृहस्थाचा जीव अधीर झाला होता. तो अखेर उतावळा होऊन म्हणालाच,

'बाबा! मग मला दाखवितांना ब्रह्म?'

बाबा हंसून म्हणाले, 'अरे! इतका वेळ तुला बसल्या जागीं ब्रह्म दाखविण्या-साठीं मीं एवढी खटपट केली ती कळलीच नाहीं का तुला?'

तो ब्रह्मार्थी चमकून उद्‌गारला, 'आं? ती कशी काय?'

बाबा म्हणाले, 'ब्रह्मप्राप्तीसाठीं पंचप्राण, पंचेंद्रियें, अहंकार, बुद्धि, मन या सर्व्यांचें समर्पण करावें लागतें. तुला पांच रुपये अर्पण करण्याची बुद्धि झाली नाहीं! संपूर्ण अनासक्ति, पूर्ण विरक्ति ही तर ब्रह्मप्राप्तीच्या मार्गावरील पहिली पायरी. तिचें पुसटसेंही दर्शन ज्याला झालें नाहीं त्याला ब्रह्मदर्शन कसें होणार?'

त्यानंतर बाबांनीं ब्रह्मप्राप्तीच्या मार्गाचा उपदेश केला. तो मूळ श्रीसाईसच्चरिता-तून अवश्य वाचण्यासारखा आहे.

**कोणी कोणाचा मुका घेतला?**

तशीच ती अण्णा चिंचणीकर आणि मावशीबाई यांची गोष्ट. एकदां दोन प्रहरीं मशिदींत, डाव्या कठड्यावर हात ठेवून बाबांची स्वारी बसली होती. बाहेर उभें राहून अण्णा बाबांचा डावा हात चेपीत होते. उजव्या बाजूस वेणूबाई कौजलगी या बाबांचें पोट चेपीत होत्या. या वेणूबाईंना सगळेजण मावशीबाई म्हणत व बाबा त्यांना आई म्हणून हांक मारीत असत. अण्णांची पन्नाशी उलटून गेलेली. तोंडांत एक दांत शिल्लक नव्हता. मावशीहि वयस्कर आणि पोक्त. हीं दोघें अशी सेवा करीत असतांना एक लहानसा 'अपघात' झाला. म्हणजे असें झालें कीं, अण्णा हात चेपीत उभे होते व मावशीबाई पोट चेपीत असतांना त्यांचें डोकें वर-खालीं होत होतें. पोट चेपतांना एकदम मावशीबाईंचा जरा झोंक गेला आणि त्यांचें तोंड अण्णांच्या तोंडानजीक आलें. मावशी-बाई सांवरून बसल्या व फटकळ विनोदानें म्हणाल्या, 'काय हो अण्णा? मुका मागतां का माझा? पण अरे पिकल्या केसांची तरी आठवण असूं दे!'

अण्णा सरळ! ते एकदम रागावले व म्हणाले, 'मी इतका हा म्हातारा. मी काय वेडाखुळा का आहे? कांहीं तरी कुभांड घेतां तें!'

दोघांचें हें भांडण पाहून बाबा हंसून म्हणाले, 'अरे अण्णा! कां कातावतोस एवढा? काय झालें घेतलास मुका म्हणून?—आईच ना ती?'

दोघेंहि विरमलीं. आजूबाजूच्या लोकांमध्यें हा प्रकार पाहून व बाबांचे शब्द ऐकून एकच हास्यकल्लोळ उठला.

श्रीसाईसच्चरितकारांनीं हा प्रसंग बहारीनें वर्णन केला आहे. मावशीबाई बाबांच्या पोटाचें मर्दन कसें करीत होत्या? तर सच्चरितकार सांगतात :—

**पाठीमागून निरणावेरी। धरूनि बाबांस दोहीं करीं। दावदावून घुसळण करी। जैसी डेरी ताकाची॥** या प्रसंगांतील बोधहि सच्चरितकारांनीं

घालायला लावीत होते; व त्यांत वेळ चाललेला पाहून इकडे या गृहस्थाचा जीव अधीर झाला होता. तो अखेर उतावळा होऊन म्हणालाच,

'बाबा! मग मला दाखवितांना ब्रह्म?'

बाबा हंसून म्हणाले, 'अरे! इतका वेळ तुला बसल्या जागीं ब्रह्म दाखविण्यासाठीं मीं एवढी खटपट केली ती कळलीच नाहीं का तुला?'

तो ब्रह्मार्थी चमकून उद्गारला, 'आं? ती कशी काय?'

बाबा म्हणाले, 'ब्रह्मप्राप्तीसाठीं पंचप्राण, पंचेंद्रियें, अहंकार, बुद्धि, मन या साऱ्यांचें समर्पण करावें लागतें. तुला पांच रुपये अर्पण करण्याची बुद्धि झाली नाहीं! संपूर्ण अनासक्ति, पूर्ण विरक्ति ही तर ब्रह्मप्राप्तीच्या मार्गांवरील पहिली पायरी. तिचें पुसटसेंही दर्शन ज्याला झालें नाहीं त्याला ब्रह्मदर्शन कसें होणार?'

त्यानंतर बाबांनीं ब्रह्मप्राप्तीच्या मार्गाचा उपदेश केला. तो मूळ श्रीसाईसच्चरितांतून अवश्य वाचण्यासारखा आहे.

**कोणी कोणाचा मुका घेतला?**

तशीच ती अण्णा चिंचणीकर आणि मावशीबाई यांची गोष्ट. एकदां दोन प्रहरीं मशिदींत, डाव्या कठड्यावर हात ठेवून बाबांची स्वारी बसली होती. बाहेर उभें राहून अण्णा बाबांचा डावा हात चेपीत होते. उजव्या बाजूस वेणूबाई कौजलगी या बाबांचें पोट चेपीत होत्या. या वेणूबाईंना सगळेजण मावशीबाई म्हणत व बाबा त्यांना आई म्हणून हांक मारीत असत. अण्णांची पन्नाशी उलटून गेलेली. तोंडांत एक दांत शिल्लक नव्हता. मावशीहि वयस्कर आणि पोक्त. हीं दोघें अशी सेवा करीत असतांना एक लहानसा 'अपघात' झाला. म्हणजे असें झालें कीं, अण्णा हात चेपीत उभे होते व मावशीबाई पोट चेपीत असतांना त्यांचें डोकें वर-खालीं होत होतें. पोट चेपतांना एकदम मावशीबाईंचा जरा झोंक गेला आणि त्यांचें तोंड अण्णांच्या तोंडानजीक आलें. मावशीबाई सांवरून बसल्या व फटकळ विनोदानें म्हणाल्या, 'काय हो अण्णा? मुका मागतां का माझा? पण अरे पिकल्या केसांची तरी आठवण असूं दें!'

अण्णा सरळ! ते एकदम रागावले व म्हणाले, 'मी इतका हा म्हातारा. मी काय वेडाखुळा का आहे? कांहीं तरी कुभांड घेतां तें!'

दोघांचें हें भांडण पाहून बाबा हंसून म्हणाले, 'अरे अण्णा! कां कातावतोस एवढा? काय झालें घेतलास मुका म्हणून?—आईच ना ती?'

दोघेंहि विरमलीं. आजूबाजूच्या लोकांमध्यें हा प्रकार पाहून व बाबांचे शब्द ऐकून एकच हास्यकल्लोळ उठला.

श्रीसाईसच्चरितकारांनीं हा प्रसंग बहारीनें वर्णन केला आहे. मावशीबाई बाबांच्या पोटाचें मर्दन कसें करीत होत्या? तर सच्चरितकार सांगतात :—

**पाठीमागून निरणावेरी। धरूनि बाबांस दोहीं करीं। दाबदाबून घुसळण करी। जैसी डेरी ताकाची॥** या प्रसंगांतील बोधहि सच्चरितकारांनीं

मार्मिकपणें सांगितला आहे. बाबांना असें सांगायचें होतें कीं, 'मायलेकांत जैसी प्रीति। प्रेमबुद्धि उभयतांत असती। तेथें ही कळ उद्भवली नसती। क्रोधवृत्ति उठतीच ना ॥

साक्षात्कारी श्रेष्ठ संतांचा सहवास म्हणजे, सच्चरितकारांच्या शब्दांत सांगायचें तर, 'थट्टाविनोदाचीच रससोई' असते. पण सामान्य संसाऱ्यांचा विनोद आणि संतांचा हास्यविनोद यांत एक महत्त्वाचा फरक असतो. संसाऱ्यांच्या विनोदांत बोचकारे असतात, ज्याची थट्टा होते त्या माणसाच्या अंतःकरणाचे पुष्कळदां वाभाडे निघतात. तसा संतांचा विनोद नसतो. त्या विनोदाच्या पोटीं अनुकंपा आणि तत्त्वबोध असतात. 'दिसाया विनोद करमणूक। परी ती अत्यंत बोधदायक। अभ्यासील जो भक्त भाविक। परम सुख पावेल ॥ असा या विनोदाचा प्रकार असतो.

**केशव? केशव? गोपाळ! गोपाळ!**

बाबांच्या या गोष्टींवरून श्रीरामकृष्ण परमहंसांच्या एकदोन गोष्टी मला आठवतात. श्रीरामकृष्णांचें आसमंत सदैव भक्ति व हास्य या रसांनीं भरलेलें असे.

एकदां प्रसिद्ध कादंबरीकार श्री. बंकिमचंद्र हे श्रीरामकृष्णांना भेटायला आले होते. परत जातांना ते रामकृष्णांना म्हणाले, 'आपण आमच्या घरीं पायधूळ झाडण्याची केव्हां तरी कृपा करावी, अशी आपल्याला विनंती आहे.'

रामकृष्ण म्हणाले, 'हो! ईश्वराची इच्छा असल्यास मी येईन केव्हांतरी.'

बंकिमचंद्र म्हणाले, 'आमच्या इथेंहि भक्तांचें दर्शन होईल तुम्हांला.'

श्रीरामकृष्ण—(हंसून) 'होय? कशा तऱ्हेचे भक्त? गोपाळ गोपाळ! केशव केशव! म्हणणाऱ्या भक्तांसारखे नव्हेत ना?'

एका भक्तानें याचा अर्थ विचारला तेव्हां रामकृष्ण हंसून सांगूं लागलेः—

'एका गांवांत एक सोनाराचें दुकान होतें. त्या दुकानांत काम करणारे सगळे सोनार मोठे धार्मिक वैष्णव म्हणून प्रसिद्ध होते. गळ्यांत रुद्राक्षांच्या माळा, कपाळावर गंधाचे पट्टे आणि हातांत रुद्राक्ष मण्यांच्या स्मरण्या असलेल्या पिशव्या असा त्यांचा नेहमीं थाट असे.

'लोक त्यांना साधू समजत असत. 'चरितार्थासाठीं त्यांना सोनाराचा धंदा करावा लागतो एवढेंच, एरवीं ते अत्यंत भाबडे भक्त' असा त्यांचा लौकिक होता. त्यांच्या या धर्मशीलपणाचें आकर्षण पडून गिऱ्हाइकांची नेहमीं त्याच दुकानावर गर्दी असायची. गिऱ्हाइक येऊन बसलें रे बसलें कीं, आंतल्या बाजूचा एखादा सोनार गर्जे, 'केशव! केशव! केशव!' थोड्या वेळानें बाहेरचा दुसरा एखादा सोनार म्हणे, 'गोपाळ! गोपाळ! गोपाळ!' थोडा वेळ गिऱ्हाईकाशीं संभाषण झाल्यावर तिसरा म्हणे, 'हरि! हरि! हरि!' तर तेवढ्यांत दुसरा परत ओरडे, 'हर! हर! हर!'

'गिऱ्हाइकांना हें सर्व भक्तिप्रेम पाहून अचंबा वाटे आणि ते त्या भाविक सोनारांचें मनांतल्या मनांत कौतुक करीत. आपला इथला व्यवहार अगदीं चोख

होणार आणि आपल्याकडून हे धार्मिक सोनार एकहि वावगा पैसा घेणार नाहींत अशी त्यांची खात्री पटे.

'पण या सगळ्या नामगजर्नाचा अर्थ काय होता, माहीत आहे का? 'केशव! केशव!' म्हणणाऱ्या माणसाला हें विचारायचें असे कीं, 'गिऱ्हाईक कसें आहे?' म्हणजे 'चलाख आहे कीं निर्बुद्ध?' दुसरा माणूस गिऱ्हाइकाच्या रागरंगाचा अंदाज घेऊन सांगे, 'गोपाळ! गोपाळ!' म्हणजे 'अगदीं गुरें हांकणारा, तेव्हां त्याला लुबाडायला कांहीं हरकत नाहीं.' मग तिसरा विचारी कीं, 'हरि! हरि!' म्हणजे 'मग फसवूं का याला?' त्यावर उत्तर मिळे, 'हर! हर!' म्हणजे 'घे हरण करून—मिळेल तें लुबाड!'

रामकृष्ण पुढें म्हणाले, 'म्हणून मीं म्हटलें कीं, तिथले भक्त कशा प्रकारचे आहेत? 'गोपाळ! गोपाळ!' म्हणणारे नाहींत ना?'

समाजांतील दंभ आणि खऱ्या कळकळीचा अभाव यांचीं उदाहरणें देतांना श्रीरामकृष्ण अशा अनेक गमतीच्या गोष्टी सांगत असत. श्रीरामकृष्णांना कोणाची नक्कल करणेंहि चांगलें साधत असे. एकदां एका कीर्तन करणाऱ्या बाईची ते नक्कल करून दाखवीत असतां त्यांच्या पाल्टू नांवाच्या शिष्याला हंसें न आवरून तो जमिनीवर गडबडां लोळूं लागला! रामकृष्ण नंतर त्याला म्हणाले होते, 'हें बघ! आतांच्या या प्रसंगाचें वर्णन घरीं करून सांगूं नकोस! आधींच तुझ्या वडिलांना माझ्याविषयीं आदर यथातथाच. त्यांत तूं या गोष्टी सांगितल्यास म्हणजे त्यांचा माझ्याविषयींचा उरलासुरला आदरहि नष्ट होऊन जाईल!'

स्वामी विवेकानंदांमध्येंहि मोठ्या प्रमाणांत विनोदबुद्धि होती. युरोपांतील प्रवासाचीं टिपणें लिहितांना त्यांनीं अनेक ठिकाणीं गंमतीदार वर्णनें केलीं आहेत. कलकत्त्याहून बोटीनें ते निघाले असतां गंगामुखांतून धोक्याच्या जागेतून त्यांची बोट सुखरूप बाहेर पडली. त्यावेळचें वर्णन करतांना विवेकानंद म्हणतात :—

**गंगेला बकऱ्याचे बळी**

'आपल्या काळदाढेंतून सुखरूप बाहेर सोडल्याबद्दल गंगामातेला मी प्रणाम करतों. आपला बंधु 'टी' याला मीं असें म्हटलें तेव्हां तो मला म्हणाला, 'नुसत्या नमस्कारानेंच काय होणार? एखादा बकरा तरी बळी द्या.' यावर मीं म्हटलें, 'अरे एकच दिवस बळी दिल्यानें काय होईल? असा एखादा बळी रोज दिला पाहिजे.' दुसऱ्या दिवशीं आम्ही जेवायला बसलों असतां मीं त्याला म्हटलें, 'गंगामातेला बकऱ्याचे बळी कसे चालले आहेत पाहिलेंस?' माझ्या म्हणण्याचा अर्थ त्याच्या लक्षांत आला नाहीं. तो म्हणाला, 'म्हणजे काय?' तेव्हां उत्तरादाखल मीं पुढील कथा त्याला सांगितली:—

"एकदां कलकत्त्यांतील एक तरुण मनुष्य आपल्या सासुरवाडीस गेला होता. ह गांव गंगेपासून पुष्कळ अंतरावर होतें. जेवणाची तयारी झाली तेव्हां त्याची सासू त्याला म्हणाली, 'जेवायला बसण्याच्या आधीं थोडें दूध घ्या!' तिथला हा कांहीं रिवाज असेल असें समजून त्या तरुणानें थोडेंसें दूध घेतलें. इतक्यांत

आजूबाजूची मंडळी ढोलकें पिटून नाचूं लागली. सासूबाई म्हणाल्या, 'तुम्ही गंगेच्या तीरावर राहतां. त्याअर्थी गंगेचें पाणी तुमच्या पोटांत असलेंच पाहिजे. तुम्हांला जें दूध मीं दिलें त्यांत तुमच्या सासऱ्याच्या अस्थींची पूड होती. आपल्या सासऱ्याला आपल्या पोटांतल्या गंगेंत मुक्ति देऊन आपलें नातें तुम्हीं आज खरें केलें आहे!' आपल्या या बोटीवर कलकत्त्यांतले तरुण आहेत आणि बोटीवरील मांसांच्या पदार्थांवर ते यथेच्छ ताव मारीत आहेत. म्हणून मी म्हणतों कीं, त्यांच्या पोट-गंगेंत बकऱ्याचे बळी दिले जात आहेत!' पण आपला चेहरा सदोदित गंभीर राखण्याची कला 'टी' ला इतकी साधली आहे कीं, माझ्या या गोष्टीचा परिणाम त्याच्या मनावर काय झाला हें मला कांहींच कळलें नाहीं."

महाराष्ट्रांतील जुन्या संतांच्या अनेक गोष्टींत हा विनोद-बोध दिसून येतो. गोऱ्या कुंभाराकरवीं नामदेवाच्या डोक्यावर थापटणें मारून त्याला त्याच्या अपूर्णत्वाची जाणीव करून देण्याचा प्रसंग असाच विनोदानें बोध करणारा होता. ज्ञानेश्वर, तुकाराम यांच्या लिखाणांत विनोद-प्रियतेचे अनेक पुरावे आढळतात. तुकाराम म्हणतात तें बरोबर आहे—

संतांचा उदीम उपदेशाची पेठ। प्रेम सुखसाटी देती घेती॥

बालस्तावत्क्रीडासक्तस्तरुणस्तावत्तरुणीरक्तः।
वृद्धस्तावच्चिन्तामग्नः परे ब्रह्मणि कोऽपि न लग्नः॥

भावार्थः—लहानपणीं खेळांत मन रमलेलें असतें, तरुणपणीं स्त्रीवर चित्त जडलेलें असतें; म्हातारपणीं काळजीनें अंतःकरण व्यग्र झालेलें असतें. परब्रह्माचें चिंतन कधींच होत नाहीं.

—श्री शंकराचार्य

ए. आर. सावंत ॲन्ड ब्रदर्स
३६३, मंगळदास मार्केट समोर, मुंबई नं. २
होजियरी ❀ तयार कपडे ❀ फर्निशिंग फॅब्रीक्स
व इतर सर्व तऱ्हेच्या कापडाचे व्यापारी
रिटेलर्स व होलसेलर्स
टे. नं. २२८४४

# वाचकांचे विचार

श्री. गंगाधर रामचंद्र भट, खाडिलवाला, वसई हे लिहितात :—

'एका भक्ताच्या बाबतींत बाबा त्वरेनें धांवून येऊन त्याचें संकटनिवारण करतात आणि दुसऱ्या एखाद्या भक्ताच्या प्रार्थनेकडे बहिरे कान करून त्याला दुःखांत खितपत ठेवतात, एवढेंच नव्हे तर एकाच भक्ताला बाबा कधीं पावतात, तर कधीं पावत नाहींत, या विसंगतीचा अर्थ काय ?' असा एका भक्तानें विचारलेला प्रश्न जूनच्या 'श्रीसाईलीला' अंकांत आपण वाचकांपुढें ठेवला आहे.

या बाबतींत श्रीसाईसच्चरिताचे अध्याय १८ (साठ्यांची गुरुचरित्रकथा) व अध्याय १९ (हेमाडांची अनुग्रहकथा) हे अध्याय जरूर मननपूर्वक वाचावेत त्यांत सर्व साईसच्चरिताचें सार आहे. हेमाडपंतांच्या मनांत नेमका हाच विकल्प उद्भवला होता कीं, साठ्यांनीं केलेल्या गुरुचरित्राच्या एकाच पारायणानें बाबा प्रसन्न होऊन त्यांच्यावर अनुग्रह करतात व मी इतकीं वर्षें गुरुचरित्राचें पारायण करित असून माझ्यावर त्यांचा अनुग्रह कां नसावा ? ही अशी विसंगती कां ? त्याचें उत्तर पुढील अध्यायांत (१९ व्या) शामरावांच्या तोंडीं खाशाबा देशमुखाची आई राधाबाई हिनें अन्नपाणी वर्ज्य करून साईबाबांपासून कानमंत्र घेण्यासाठीं जें उपोषण केलें त्या गोष्टींत आहे. श्री साईबाबांनीं त्या बाईला केलेला उपदेश ऐकून हेमाडांचा विकल्प नाहींसा झाला व त्यांना साईकृपेचें यथार्थ ज्ञान झालें.

संत हे ईश्वर व मानव यामधील दुवा आहेत. त्यांच्या सहवासाचा व आशीर्वादाचा अंतिम लाभ पारमार्थिक आहे. संत हे पारमार्थिक प्रवासाचे वाटाडे आहेत. दुःखी, संकटग्रस्त व तळमळणाऱ्या अंतःकरणाला—आत्म्याला—ओलावा देऊन तें स्थिर करण्याचें सामर्थ्य संतांपाशीं आहे.

संत म्हणजे सर्व ऐहिक दुःखांचा संहार करणारें यंत्र किंवा इंजेक्शन नव्हे.

सामान्य माणसांच्या बाबतींत संकटांचे पाहुणे त्यांचे घरीं नेहेमीच येत असतात. प्रारब्धभोग व त्याचा शेवट अटळ असतो. कधीं मनाप्रमाणें तर कधीं मनाविरुद्ध, आशा—निराशांच्या लाटांवर प्रारब्धाचें संचलन नेहेमींच चालू असतें. श्रीसद्गुरुसाईबाबा एक महान् संत आहेत. त्यांच्या चरित्रांत त्यांनीं असंख्य लोकांचीं संकटें निवारण केल्याचें दिसून येईल. पण त्यांत कुठल्याही एका भक्ताच्या, त्याला आजन्म आलेल्या सर्व संकटांचें साईबाबांनीं निवारण केल्याचा दाखला नाहीं. आणि म्हणून साईसच्चरिताच्या १८ व्या व १९ व्या अध्यायांत बाबांनीं जो अमोल उपदेश केला आहे त्याचें जर आपण मनोभावें आचरण केलें तर आपल्या सुखदुःखाच्या कल्पना पार बदलून मन निश्चित वैराग्याचा मार्ग क्रमूं लागेल. बाबांचा हा उपदेश म्हणजे, 'निष्ठा आणि सबूरी.' आणि म्हणून बाबांपाशीं मागणें काय मागावें, तर 'हे

सद्गुरु राया, साईबाबा, मला सद्बुद्धि द्या. अहोरात्र तुमची आठवण–म्हणजेच निष्ठा–कुठल्याही व कसल्याही प्रसंगीं होऊं दे. व कुठल्याही प्रसंगाला–प्रामाणिकपणें तोंड देण्याचें धैर्य–म्हणजेच सबुरी–'द्या.

निष्ठा किंवा भक्ति ही सकाम असतां नये. प्राक्तनानुसार किंवा पूर्वसंचितानुसार येणारीं कुठलींही संकटें किंवा दुःखें मला कर्मभोग म्हणून भोगलींच पाहिजेत. कुठलेंही संकट येवो, ' माझे साईबाबा समर्थ आहेत. माझ्या संकटाची काळजी त्यांना आहे.' याचा अर्थ, माझी त्यांचे ठिकाणीं–आलेल्या संकटाचा कसाही शेवट होवो–पूर्ण निष्ठा आहे व मला ते संकटाला तोंड देण्यासाठीं जरूर ती सबुरी–धैर्य देवोत, एवढीच माझी त्यांना कळकळीची प्रार्थना आहे. निष्ठेची बैठक अशा तऱ्हेनें घट्ट केली कीं संकटांपासून उत्पन्न होणारें भय व चिंता यांची तीव्रता कमी होऊन तीं सुसह्य होतात, व त्यापासून होणारे परिणाम निश्चल मनानें सहन करतां येतात. आणि म्हणून श्रीसद्गुरु साईबाबां-सारख्या सत्पुरुषांच्या ठिकाणीं निष्काम निष्ठा व भक्ती ठेवल्यानें कुठल्याही प्रसंगाला प्रामाणिकपणें तोंड देण्याचें धैर्य म्हणजेच सबुरी प्राप्त होते व त्यायोगें माणसाचें मानसिक व आत्मिक बळ वाढीस लागतें. व अशा पुष्कळशा संकटांचा मार खाऊनही निष्ठा अविचल व कायम राहिली तर मन निश्चिंत वैराग्याचा मार्ग क्रमूं लागेल व आयुष्याचें दुसरें टोंक जें मृत्यू तो शांतपणे येऊन आत्मा साईचरणीं विलीन होईल.

अर्थात् हा एक महान् अभ्यास आहे. पण तो साध्य होण्यास सद्गुरूच्या कृपे-शिवाय दुसरा मार्ग नाहीं. निष्काम निष्ठा हेंच गुरुकृपेचें साधन आहे. ' जया मनीं जैसा भाव। तया तैसा अनुभव ' निष्ठा जितक्या अंशांनीं निष्काम असेल त्याप्रमाणांत फळ मिळेल–फळ म्हणजे कामनापूर्ती नव्हे; तर फळ म्हणजे निष्ठेच्या पोटीं उत्पन्न होणारें धैर्य सबूरी–कीं ज्यायोगें मनुष्याचें आत्मिक बळ वाढीस लागतें.

श्रीसाईचरितांचें जर अभ्यासपूर्वक वाचन केलें तर मनामध्यें उत्पन्न होणाऱ्या असंख्य विकल्पांचें निरसन होऊन मन हळूहळू सुस्थिर होतें, निष्ठा वृद्धिंगत होत जाते. ती जास्तीत जास्त निष्काम करण्याचा आपण प्रयत्न करावा व त्याप्रमाणें बाबांची मनोभावें प्रार्थना करावी व निष्ठा व सबूरी प्राप्त करून घेण्याचा प्रयत्न करावा. ती दोन्ही सद्गुरूच्या कृपेनें ज्या प्रमाणांत साध्य होतील त्या प्रमाणांत आत्मोन्नतीचा मार्ग सांपडेल.

अशाच आशयाचीं पत्रें श्री. ग. ना. जुवेकर, मुंबई, श्री. अ. पां. शीलत इत्यादि वाचकांकडून आलीं आहेत.

* * *

हां पहा इकडे एक भक्त ईश्वरापुढें थरथरां कांपत उभा आहे. अरे मूर्खा। तूं इतका कोणाला भितोस? मी तर त्याच्या गळ्याला दोरी बांधून तिचें टोंक माझ्या हातांत सदैव वागवीत असतों. मी जिकडे जातों तिकडे मी त्याला ओढून नेतों. ही दोरी कशाची आहे हें तुला ठाऊक आहे काय? ही भक्तीची–प्रेमाची दोरी आहे.

—श्रीस्वामी विवेकानंद

# धि सेंट ऑफ् शिरडी'

[लेखिका—श्रीमती मणी साहुकार, प्रकाशक—हिंद किताब लि., मुंबई, पृष्ठें—६८ किंमत—अडीच रुपये]

"The Saint of Shirdi"—'शिरडीचे संत' (श्रीसाईबाबा) या नांवाचा एक इंग्रजी छोटासा ग्रंथ मिसेस मणी साहुकार या भक्त व विदुषी बाईनें लिहून ऑगष्ट १९५२ ला प्रसिद्ध केला आहे. मद्रासचे सुप्रसिद्ध साईभक्त श्री. बी. व्ही. नरसिंहस्वामी, प्रेसिडेंट ऑल इंडिया साई समाज, यांनीं या ग्रंथाला छोटासा उपोद्घात लिहिला आहे. हा ग्रंथ छोटा असला तरी त्याची भाषा सोपी व चांगली असून विषयांची मांडणीहि सुरेख आहे.

'शिरडीचे संत' असा या ग्रंथाचा मथळा किंवा नांव या ग्रंथकर्त्या बाईनें दिलेलें असलें तरी पुढें या ग्रंथांत पांचव्या अध्यायांत या बाईनें संतकोटी व अवतारकोटी यांची मीमांसा केली आहे आणि असें ठरविलें आहे कीं, (पान ३१) श्रीसाईबाबा हे साधाण संत नव्हते, तर प्रत्यक्ष खिस्त, कृष्ण आणि बुद्ध यांचे सारखे अवतार होते. असें जर ग्रंथकर्त्रीचें मत आहे, तर आपल्या समजुतीप्रमाणें व मताप्रमाणें 'शिरडीचा देव किंवा ईश्वर' असें अन्वर्थक नांव आपल्या ग्रंथास दिलें असतें तर तें अधिक शोभलें असतें.

ग्रंथाच्या १ ल्या अध्यायांत पूज्य श्रीनरसिंहस्वामीजी हे १९४२ सालीं एका मित्राच्या मध्यस्थीनें आपल्या घरीं कसें आले आणि त्यांनीं आपणास श्रीसाईभक्तीची दीक्षा कशी दिली हें सांगितलें आहे. दुसऱ्या अध्यायांत श्रीसाईबाबांच्या शिरडींतील आगमनाविषयीं हकीकत दिली आहे. शिवाय श्रीबाबांच्या सत्स्वरूपाविषयीं थोडेसें विवेचन (पान ८–९) केलेलें आहे. 'मी शिरडींत आहे असें जे समजतात त्यांना खऱ्या श्रीसाईबाबांची ओळख नाहीं, कारण आपण निराकार आणि सर्व व्यापी आहों' असें बाबांचें वचन दिलें आहे. आणि श्रीरमणभगवानांप्रमाणें आत्म्याच्या सत्स्वरूपाविषयीं विचार करण्यास प्रोत्साहन दिलें आहे.

तिसऱ्या अध्यायांत साधनाविषयीं विचार केला आहे, आणि गुरूवर दृढ व अचल श्रद्धा ठेवून त्याला पूर्ण शरण जाणें हेंच मुख्य साधन होय असें प्रतिपादन केलें आहे आणि श्रीसाईसच्चरित अध्याय ३२ येथें सांगितलेली गुरु आणि ईश्वर यांचे शोधार्थ श्रीसाईबाबांनीं सांगितलेली हकीकत दिलेली आहे. 'शिरडीचें महत्त्व' हा चवथा अध्याय असून त्यांत साधक किंवा भक्त शिरडीस गेला आणि तेथें बाबांचीं सर्व स्थानें पाहून निरीक्षण करूं लागला, कीं त्याला बाबांच्या अस्तित्वाची जाणीव झाल्याशिवाय रहात नाहीं इत्यादि; विवेचन केलेलें आहे. पांचव्या अध्यायांत श्रीबाबांच्य लीलांचें वर्णन आहे. आरंभीं (पान २८) येथें असें सांगितलें आहे कीं, श्रीबाबांसारख्या

विभूतीचें या पृथ्वीवर अस्तित्व व जीवन हाच मोठा चमत्कार होय. इतर लीलांचें आणि पंचमहाभूतांवरहि सामर्थ्य यांचेंहि वर्णन असून, पुढें पा. (३५) एक आधुनिक लीला वर्णिली आहे. ती अशी—बाबांचे भक्त होमोपाथ डॉक्टर रुस्तमजी हे एकदां आर्थिक संकटांत सांपडले. बँकेंत तेवढी शिल्लक नसतां निष्काळजीपणानें त्यांनीं रु. ३०० चे चेक मुंबईत एका मित्राला दिले. पुढें त्यांना समजून आलें कीं, आपली एवढी रकम शिल्लक नाहीं, तेव्हां आपला चेक पटणार नाहीं आणि त्यामुळें आपणावर संकट येईल. ते अशा काळजींत असतां आणि बाबांची प्रार्थना करीत असतां, एक साधारण ओळखीचे गृहस्थ डॉ. रुस्तुमजीला भेटले आणि त्यांनीं ३०० रु. च्या नोटा असलेलें एक पाकिट त्यांना वापरण्यास दिलें. यामुळें ते या संकटांतून पार पडले. पुढें त्या गृहस्थाचें पाकिट (नोटा) परत द्यावे म्हणून त्यांनीं खटपट केली तरी त्याचा पत्ता लागला नाहीं. मंगळवेढेकर दामाजीपंताकरितां 'विठु महार' यांनीं जशी बादशहापाशीं रशीद भरली तसाच हा आधुनिक प्रकार भासतो. याप्रमाणें अनेक लीला वर्णन करून शेवटीं (पान ३७) असें सांगितलें आहे कीं, बाबांचें **अंतर्ज्ञान** हा एक मोठा चमत्कारच होय. या अंतर्ज्ञानाचें वर्णन बाबांनींच एका दुपारच्या आरतीच्या वेळीं केलें तें असें :—'तुम्हीं कोठेंहि असा, आणि कांहींहि करा; पण हें नेहमीं लक्ष्यांत ठेवा कीं, तुम्हीं जें कांहीं करितां किंवा म्हणतां तें मला सदा माहीत असतें.' या चमत्काराचीं किती तरी उदाहरणें देतां येतील. सहाव्या अध्यायांत श्रीबाबांच्या शिरडींतील ६० वर्षें जीवनचरित्राचें आणि त्यांच्या दक्षिणासंस्थेचें—ते दक्षिणा कां मागत, कोणाकडे मागत, त्याचा परिणाम काय होत असे आणि दक्षिणेची रकम कशी विल्हेवाट करीत असत, इत्यादिकांचें वर्णन आहे. सातव्या अध्यायांत श्रीबाबांची शिकवण दिली आहे. थोडक्यांत ती अशी (पान ४८) कीं, साधकांनीं आपला आत्मा जाणण्यांत, आपला सर्व वेळ, सर्व शक्ति आणि सर्व विचार खर्च केले पाहिजेत. सदा आत्मनिष्ठ राहावें असा त्यांनीं उपदेश केलेला आहे. प्रत्येक व्यक्तीच्या मनांत 'मी आणि माझें' हाच विचार प्रामुख्यानें असतो. म्हणून ध्यानपूर्वक आत्मशोध केल्यानेंच सत्स्वरूपाचें ज्ञान होतें, म्हणजे 'मी कोण' याचा नेहमीं विचार करा, असें त्यांनीं पुन्हांपुन्हां बजावलें आहे. गुरूला आणि ईश्वराला पूर्णपणें शरण गेल्यानें आत्मशोधाला बरीच मदत होते. असें त्यांचें सांगणें होतें. पण कर्मकांडाचे दुसरे प्रकार विग्रह, [ मूर्ति ] पूजा भाक्ति इत्यादि गोष्टीचाही त्यांनीं पुरस्कार केला आहे. शेवटच्या [ आठव्या ] अध्यायांत श्रीबाबांच्या निर्याणाची हकीगत सांगून हा ग्रंथ पुरा केला आहे.

ग्रंथाच्या शेवटीं कठीण शब्दांचा एक लहान कोश दिलेला आहे. त्यांत कांहीं शब्दांचे अर्थ बरोबर नाहींत असें वाटतें. उदाहरणार्थ :—

1 Akalkote Maharaj :-The Ruler of Akalkote–formerly an Indian state in Maharashtra महाराष्टांतील जुन्या एका इंडियन संस्थानचे राजे. हा शब्दशः अर्थ झाला. पण अक्कलकोट महाराज हा शब्द श्री दत्तावतारी विभूतीला लावितात—श्रीसाईबाबा हे अक्कलकोट महाराजांचे पुढील चालू अवतार

असें मानण्यांत येते. [ श्रीसाईसच्चरित अध्याय ४ यांतील भगवन्तराव क्षीरसागराची गोष्ट, अध्याय २६ यांतील हरिश्चंद्र पितळे यांच्या गोष्टी पहा. ) याचप्रमाणें आरती, चपाती, दक्षिणा, कर्म इत्यादि शब्दांचे अर्थ अव्याप्ति अथवा अतिव्याप्ति या दोषांनीं युक्त दिसतात. पुस्तकाच्या पुढील आवृत्तींत या शब्दांचा, त्यांच्या व्याख्यांचा योग्य विचार होऊन अवश्य ती दुरुस्ती होणें जरूर वाटतें.

—गाधिज

★

## धि स्पिरिच्युअल सिंफनी आफ् श्रीसाईनाथ ऑफ् शिरडी

(लेखक व प्रकाशक—श्री. हर्षद पी. मेहता, बडोदा कॅम्प. पृष्ठें—१६२, किंमत साडेतीन-रुपये )

हा इंग्रजी ग्रंथ रावसाहेब हर्षद पी. मेहता, बी.ए., एल्एल्.बी. बडोदा. कॅंप यांनीं लिहून गेल्या वर्षी प्रसिद्ध केला आहे. ग्रंथाची भाषा उठावदार व भारदस्त दिसते. यापेक्षां असले ग्रंथ सोप्या, सर्वांना समजण्याजोग्या भाषेंत लिहितां आले तर बरें असें वाटतें.

या ग्रंथांत श्रीसाईबाबांच्या यशाचें आणि लीलांचें वर्णन आहे, हें सांगणे नलगे. 'बाबांच्या शुद्ध यशाचें वर्णन। प्रेमें तयाचें श्रवण। होईल भक्त कश्मलदहन। सोपें साधन परमार्थी'॥ (श्रीसाईसच्चरित, अ. ३–४९ ) श्रीबाबांचें यशोगान हें परमार्थाचें सोपें साधन असल्यामुळें तें सर्वांना सहज समजेल अशा भाषेंत लिहलें पाहिजे. दुसरी एक महत्त्वाची गोष्ट लक्ष्यांत ठेविली पाहिजे ती ही कीं, श्रीबाबांच्या लीला अतिशय महत्त्वाच्या असल्यामुळें त्या ठीक व बरोबर वर्णन केल्या पाहिजेत; त्यांत कांहीं चूक किंवा कमतरता असतां कामा नये. श्रीसाईनाथांच्या कथेविषयीं श्रीसाईसच्चरितांत असा उल्लेख केला आहे कीं 'टाळोनि भवरे खडक। सागरी नावा चालाव्या तडक। म्हणोनि जैसे लाल भडक। दीप निदर्शक लाविती॥ (३–४५) तैशाच साईनाथांच्या कथा। ज्या गोडीने हिणवितील अमृता। भवसागरींचे दुस्तर पंथा। अति सुतरता आणितील (३, ४६).

पहिल्या प्रकरणांत (पृष्ठ ७) लेखक लिहितोः—लग्नाच्या वऱ्हाड मंडळीच्या गाड्या शिरडीच्या वेशींत आल्या आणि गोड सनई आणि ताशे यांचें वादन सुरू झालें. पण राजकीय थाटांत आणि ऐषआरामांत आलेले संत (साईबाबा) या लोकांच्या गर्दीतून आणि धांदलींतून निसटले आणि ते खंडोबाच्या देवळांत शिरले.

ही कथा वास्तविक खरी नसून काल्पनिक दिसते. लग्नाची वराडी मंडळी आली ती खटाऱ्या गाड्यांतून आली. आणि गांवाबाहेर श्रीखंडोबाचे देवालयासमोरील खुल्या जागेंत उतरली. या वेळेस सनई वाजंत्रींचें काम नसून ती मंडळी गांवांत जाऊन बिऱ्हाडीं राहिल्यावर आणि त्यानंतर लग्नसोहळे सुरू झाल्यानंतर सनई, ताशे—वाजंत्र्यादि काम सुरू झालें असावें साईबाबा खंडोबाच्या देवळांत शिरलें हेंहि खरें नसावें. कारण—

खंडोबाचे देऊळापाशीं । म्हाळसापतीचिया खळियासी । आरंभीं बाबा वऱ्हाडा-निशीं । उतरल्या दिवशीं हें (साईसंबोधन) पडलें ॥ आरंभी तें भगताचें खळें । पुढें तें अमीनभाईचें झालें । वऱ्हाड लग्नाचें जें आलें । येथेंच उतरलें वडातळीं ॥ गाड्या सर्व सुटल्या खळ्यांत । खंडोबाचे पटांगणांत । बाबाहि तथ वऱ्हाडासमवेत । सर्वासमवेत उतरले । हे बाळ फकीर गाडीतून उतरले । प्रथम भगताचे दृष्टीस जें पडले । 'या साई' म्हणून सामोरे गेले । नाम तें पडलें तेथून ॥ ३, २६-२९

असें श्रीसाईच्चरितांत म्हटलें आहे.

पान ८-९--आरंभीं श्रीबाबांचे आरतींतील एक चरण दिलेला आहे. त्याला आरति हें नांव न देतां 'बॅलड'—लावणी किंवा पोवाडा म्हटलें आहे. प्रकरण २-पान १३ 'Shri Gnaneshwar had to throw away his monumental work in the welcoming waters of the flowing river' हा उल्लेख खरा नव्हे. श्रीज्ञानेश्वराला आपला अमोलिक ग्रंथ नदींत टाकावा लागला नाहीं. हा उल्लेख श्रीतुकारामाच्या अभंगाच्या वहीबद्दल असावा. तसाच यापुढील योगी श्रीरामकृष्ण यांचेविषयीं उल्लेख संदिग्ध वाटतो. अधिक खुलासा केला असता तर बरें झालें असतें. पान १९ व २१ येथें श्रीबाबांच्या शयनाबद्दल उल्लेख किंवा माहिती आहे, ती अशी—

'मशीदींत किंवा द्वारकामाईत श्रीबाबा नेहमीं निजत असंत, आणि म्हाळसापति आणि तात्या पाटील हेहि म्हणजे तिघे मिळून न चुकतां तेथें निजत असत.'

ही गोष्ट पूर्ण सत्य नाहीं. कारण श्रीबाबा एक दिवसाआड चावडींत निजत असत. 'एक रात्र मशीदींत । दुजी क्रमीत चावडीप्रत । ऐसा हा क्रम बाबांचा सतत । समाधीपर्यंत चालला ॥' श्रीसाईचरित (अ. ३७-२१७) शिरडीमध्यें श्रीबाबांचीं पंच महास्थानें आहेत.

(१) श्रीखंडोबा देवालयासमोरील पटांगण—येथें प्रथम लग्नवऱ्हाड—मंडळीसोबत श्रीबाबा आले.

(२) त्यांच्या श्रीगुरुपदकांचें स्थान (साठेवाड्यालगत)—गुरुवारीं आणि शुक्रवारीं या ठिकाणीं ऊद जाळीत असतात. (श्रीबाबांच्या आदेशाप्रमाणें.)

(३) श्री द्वारकामाई (मशीद)—हें बाबांचें निवासस्थान व शयनस्थान.

(४) चावडी—येथेंहि श्रीबाबा एक दिवसा आड निजत असत. १९०९ डिसेंबर पासून बाबांचें अर्चन पूजन भजन होऊं लागलें, आणि वाजत गाजत मोठ्या समारंभानें बाबा तेथें जात असत. हा समारंभ अद्यापहि दर गुरुवारीं चालू आहे.

(५) श्रीबाबांचें समाधिमंदीर (बुटीवाडा)—

याप्रमाणें चावडीचें महत्त्व आहे. तिचें वर्णन किंवा नुसता उल्लेखहि या ग्रंथांत दिसत नाहीं. ही उणीव पुढील आवृत्तींत अवश्य भरून काढावी,

पान ७०—येथें जर्मन तत्त्ववेत्ता शोपेनहार यांचा उपनिषदांविषयीं अभिप्राय दिला आहे. पण तो देतांना In far off and remote France असा लेख आहे. तो चुकीचा वाटतो. कारण हा तत्त्ववेत्ता फ्रेंच नसून जर्मन होता.

बाकी भागांत श्रीबाबांच्या अनेक लीला आणि ग्रंथकर्त्यांच्या आतेष्ट मंडळींना आलेले हल्लींचे अनुभव यांचें वर्णन आलेलें आहे, तें सर्व वाचण्याजोगें आणि मनन करण्याजोगें आहे. वर ज्या कांहीं चुका किंवा दोष दाखविण्यांत आले त्यांचा पुनर्मुद्रणाच्या वेळीं योग्य विचार होऊन श्रीबाबांविषयींचा हा ग्रंथ निर्दोष आणि सुंदर व्हावा अशी अपेक्षा आहे.

—गाधिज

तेथ इच्छा हे कुमारी जाली । मग ते कामाचिया तारुण्या आली
तेथ द्वेषेंसी मांडिली । वराडिक ॥
तया दोघांस्तव जन्मला । ऐसा द्वंद्व मोह जाला ॥
मग तो आजेयानें वाढविला । अहंकारें ॥

भावार्थः—कामाला इच्छा हीं कन्या आहे. ती उपवर झाली म्हणजे द्वेषाशीं तिचें लग्न लागतें. नंतर या दंपत्यापासून द्वंद्व व मोह हीं अपत्यें जन्माला येतात. आणि अहंकार आजोबा त्यांचे लाड करून त्यांना वाढवितात ।

—श्रीज्ञानेश्वर

× × ×

# लेखकांसाठीं सूचना

(१) लेख पानाच्या एकाच बाजूला सुवाच्य अक्षरांत शाईनें लिहिलेला असावा. डाव्या बाजूला भरपूर मार्जिन सोडावी.

(२) लेख, कविता वगैरे साहित्य प्रसिद्धीकरितां स्वीकारणें किंवा न स्वीकारणें अगर त्यांत थोडाफार बदल करणें हा अधिकार सर्वस्वीं संपादकांचा आहे. न स्वीकारलेले लेख परत पाहिजे असल्यास पुरेसें पोष्टेज पाठवावें. नापसंत लेख तीन महिन्यांनंतर निकालांत काढण्यांत येतील.

(३) लेखकानें आपलें पूर्ण नांव व पत्ता कळवावा. टोपण नांवानें लेख प्रसिद्ध करावयाचा असला तरीही पूर्ण नांव व पत्ता ऑफिसच्या माहितीकरतां कळविणें जरूर आहे.

—संपादक




## जून १९५३—

या महिन्यांत श्रींचे दर्शनास येणाऱ्या भक्तांची रीघ नेहमींप्रमाणेंच होती. अनेक भक्तांकडून श्रींस देणग्या व वस्तू अर्पण करण्यांत आल्या. अभिषेक, पूजा, आरती, अर्चन वगैरे भक्तांचे धार्मिक विधी संस्थानतर्फे यथासांग केले गेले.

### नृत्य, गायन, वादन इ० :—

**नृत्य**—कु. कल्पना कर्णिक (वय. ७ वर्षे) मुंबई.

**गायन**—श्रीमती शामला माजगांवकर, हिराबाई जव्हेरी, शामबाई (मुंबई); श्री. मारुतीराव दौंदेकर, अनंतराव वेलिंकर; सौ. विमल मुळे व कु. मधुबाला जव्हेरी आणि कु. कुमु प्रधान.

**वादन**—गुगघ्या सनईवाला, मद्रासी पद्धतीचें सनई वादन.

**भजन**—श्री. ललितकुमार देवप्रश्न जोशी आणि पार्टी यांचें संगीत गुजराती भजन.

**कीर्तन**—ह. भ. प. विष्णुपंत ताराबागकर!

नेहमींप्रमाणें एकादशीस संस्थान गवयी यांचीं कीर्तनें झालीं.

सातारा जिल्ह्याचे कलेक्टर श्री. पाटील हे या महिन्यांत श्रींचे दर्शनास येऊन गेले. शिर्डीसही पावसाळ्यास उशीराच सुरवात झाली. आतांपर्यंत पाऊस बरा पडला. हवेंत थंडपणा आला आहे. हल्लीं शिर्डींचें हवापाणी उत्तम आहे.

## जुलै १९५३—

श्रींचे दर्शनास येणाऱ्या भक्त लोकांची रीघ मागील महिन्याप्रमाणें याहि महिन्यांत चालूच होती. भक्तांकडून श्रींस देणग्या व वस्तू अर्पण करण्यांत आल्या. भक्तांचे धार्मिक विधी संस्थानतर्फे यथासांग पार पाडले गेले. नेहमींप्रमाणें एकादशीस संस्थान गवई यांचीं कीर्तनें झालीं. बऱ्याच कलाकार भक्तांनीं आपापल्या कलेची बाबांसमोर हजेरी दिली. आषाढ शु॥ ११ (महाएकादशी) निमित्त श्रींच्या पालखीची मिरवणूक गांवां-

ल निघाली. जिल्ह्यांत कॉलऱ्याची साथ असल्यामुळें प्रतिबंधक उपाय म्हणून संस्थान-र्फे नोकरवर्ग व भक्त-लोक यांना कॉलराप्रतिबंधक लस टोंचण्यांत आली. या योजनेचा फायदा ग्रामस्थ मंडळींनींहि घेतला. शिवाय संस्थान हद्दींतील व गांवांतील विहिरींत स्थानतर्फे रोज जंतुघ्न औषधें टाकण्यांत येऊन पाणी निर्जंतुक केलें जाई. तसेंच खोल्यांतून व इतर राहण्याच्य ठिकाणींहि नियमानें डी. डी. टी. चे फवारे मारण्यांत येत होते. त्यामुळें कॉलऱ्याचा उपद्रव संस्थानांत झाला नाहीं.

याच महिन्यांत श्रींचा गुरुपौर्णिमा उत्सव संस्थानतर्फे साजरा झाला. त्याची हकीगत पुढील पानावर दिली आहे.

# बोधामृत-तुषार

*निंदक नियरे राखिए, आँगन कुटी छवाय ।*
*बिनपानी साबुनबिना, निर्मल करै सुभाय ॥*

भावार्थः—आंगणांत एक झोंपडी बांधून तेथें निंदकाला राहूं द्यावें. कारण तो साबण किंवा पाणींहि न वापरतां आपल्या मनाचा मल स्वच्छ धुऊन टाकतो !

—कबीर

× × ×

*एतन्निर्विद्यमानानामिच्छतामकुतोभयम् ।*
*योगिनां नृप निर्णीतं हरेर्नामानुकीर्तनम् ॥*

भावार्थः—हे राजा, ईश्वराचें नामसंकीर्तन, हें सर्व कामना पूर्ण करणारें, ज्ञानेच्छूंना ज्ञानप्राप्ति करून देणारें व मुमुक्षूंना मोक्षप्राप्ति करून देणारें निर्भय साधन आहे, असा शास्त्रांचा सिद्धान्त आहे.

—श्रीमद्भागवत

× × ×

* देव दोन वेळां हंसतो. रोग्याच्या आईला वैद्य जेव्हां म्हणतां कीं 'आई ! घाबरूं का तुम्ही. मी खास तुमच्या मुलाला बरा करतों' तेव्हां देव हंसतो व म्हणतो, 'मी याचे प्राण हरण करणार आहें व हा माणूस मोर सांगतो आहे कीं आपण याला वांचविणार आहों.' दोन भाऊ हातांत दोरी घेऊन आपली जमीन वांटून घेतात. एकजण दुसऱ्याला म्हणतो, 'ही बाजू माझी आणि ती तुझी !' हें ऐकून देव हंसतो आणि म्हणतो, 'हें सर्व विश्व माझ्या मालकीचें आहे. पण हे मोरे हा माझा नि तो तुझा अशी वांटणी करीत आहेत.

—श्रीरामकृष्ण परमहंस

# श्रीसाई लीला 'त्रैमासिक' मिळण्याचीं ठिकाणें

(१) श्री. बाबुराव डी. बागवे,
चीफ एजंट, खटाव बिल्डिंग, गिरगांव नाका, मुंबई ४.

(२) श्री. बोवलेकर, दादर बी. बी. स्टेशन समोर, मुंबई.

(३) श्री. सावळाराम खंडू दांगट, बोरीबंदर, मुंबई.

(४) श्री. इ. आर. मालपेकर,
दागिन्यांचें दुकान, जितेकर चाळ, ठाकूरद्वार, मुंबई २.

(५) श्री. भाऊ मोरोबा ठगे,
टोप्यांचे व्यापारी, ठाकूरद्वार, मुंबई २.

(६) मेसर्स मनोहर बुक डेपो,
गोखले सोसायटी लेन, पोयबावडी, परेल, मुंबई १२.

(७) मेसर्स ठकार आणि कंपनी,
कोहिनूर सिनेमा समोर, रानडे रोड, दादर, मुंबई २८.

(८) धी बॉम्बे बुक डेपो, गिरगांव. मुंबई ४,

(९) मेसर्स सारंग बुक डेपो.
मुनीम हाऊस, चिंचपोकळी, मुंबई १२.

(१०) मेसर्स दातार आणि पुरोहित,
वैद्यवाडा, बॉम्बे रोड, ठाणें.

(११) मेसर्स मंगला वस्तु भांडार,
अहिल्याबाई चौक, कल्याण.

(१२) पनवेल न्यूज पेपर स्टॉल, पनवेल.

(१३) श्री. भाऊसाहेब लोंबर,
४०७।४०८ बुधवार पेठ, पुणें २.

(१४) श्री साईप्रसाद मिना फोटोचा कारखाना.
३३६, बुधवार पेठ, पुणें २.

(१५) नाडकर्णी आणि कं.
खेळाच्या वस्तूंचे व्यापारी, धोबीतलाव, मुंबई, २.

(१६) श्री बाबुराव अण्णाराव चौघुले,
२५२ टळकवाडी, बेळगांव.

(१) साईलीला 'त्रैमासिक' अंक इतर अनेक ठिकाणीं विक्रीस ठेविले जातात, पण जागेच्या अभावी त्यांचीं नांवें दिलीं नाहींत.

(२) बाहेरगांवीं एजंट्स नेमणें आहे, तरी मुंबई ऑफिसच्या पत्त्यावर पत्रव्यवहार करावा.

---

[ महत्त्वाची दुरुस्ती—पृष्ठ ४९ वर लेखकाचें नांव चुकून खंडेराव ज. त्रिकोलेकर असें पडलें आहे. तें 'खंडेराव स. त्रिलोकेकर' असें वाचावें—संपादक]

दादर भागांत फॅशनेबल व टिकाऊ शिलाईचे कपडे
व्यवस्थित व किफायतशीर दराने शिवून मिळण्याचें
: प्रख्यात ठिकाण :

## —रावल टेलरिंग फर्म—

मोहमद बिल्डिंग, चित्रा सिनेमाजवळ, व्हिन्सेंट रोड,
दादर, मुंबई १४

## RAWAL TAILORING FIRM

TAILORS & OUTFITTERS

Mohamad Building (Near Chitra Cinema)
Vincent Road, Dadar, Bombay 14.

FOR BEST STYLES AT MODERATE RATES
BOOK YOUR ORDER FOR DASSERA--
DIWALI FESTIVALS

## जाहिरातींचे दर

| | कव्हर पेज २ रें–३ रें | कव्हर पेज ४ थें | आंतील पान |
|---|---|---|---|
| पूर्ण पान एकाच वेळेस | रु. ६० | रु. ७५ | रु. ४० |
| अर्धें ,, ,, ,, | रु. ३५ | रु. ४० | रु. २५ |
| ¼ ,, ,, ,, | रु — | रु. — | रु. १५ |
| पूर्ण पान एक वर्षाकरितां | रु. २०० | रु. २५० | रु. १३५ |
| अर्धें ,, ,, ,, | रु. १२० | रु. १३५ | रु. ८५ |
| ¼ ,, ,, ,, | रु. — | रु. — | रु. ५० |

वि. सू.:—जाहिरात देतेवेळीं ५ टक्के आगाऊ पाठविण्याची विनंती

टे नं. ४२५३८

सर्व तऱ्हेचें कापड
मिळण्याचें ठिकाण

# धी जनाना
ॲंड
# मर्दाना क्लॉथ स्टोअर्स

एक वेळ येऊन खात्री करून घ्यावी.

★

प्रार्थना समाज
मुंबई नं. ४

मुद्रक : ह. ना. साप्रे, [illegible]